सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर रविवार, दि. २४ ऑगस्ट २०२५ वर्ष - तिसरे अंक १४२ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## भाजपात बृहद कुटुंबाचा विचार करणारे लोक - फडणवीस

मुंबई, २३ ऑगस्ट - राखीची जात, धर्म, प्रांत, भाषा काय आहे विचारायचं नाही. भाषा, जात, प्रांत प्रेमाचा आहे. त्याच्यात निरपेक्ष प्रेम आहे अशा प्रकारची राखी आहे. आम्ही परिवार, कुटुंबं मानणारी लोकं आहोत. भाजपात काम करत असताना आपण बृहद कुटुंबाचा विचार करणारे लोक आहोत, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

महाराष्ट्र भाजप महिला मोर्चाच्या वतीने दादरच्या योगी सभागृहात राखी प्रदान सोहळा आयोजित करण्यात आला होता. यात मुख्यमंत्री फडणवीस यांची विशेष उपस्थिती होती. राज्यातील महिलांनी पाठवलेल्या हजारो राख्या यावेळी मुख्यमंत्र्यांना प्रदान करण्यात आल्या. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, महिला मोर्चा अध्यक्ष आमदार चित्रा वाघ, मंत्री आशिष शेलार यांसह प्रमुख पदाधिकारी, नेत आदी उपस्थित होते.

फडणवीस पुढे म्हणाले की, ज्ञानेश्वरांचा विचार सांगणारे आपण आहोत. ज्यांच्या पाठीमागे इतक्या बहिणींचं प्रेम, माया आहे त्यांचं कोण काय बिघडवणार. कोणत्याही शस्त्र, अस्त्रापेक्षा प्रेमाचे आशीर्वाद अधिक ताकदवान असतात. त्यामुळे आज सर्वांच्या आशीर्वादाने पुन्हा एकदा सेवा करण्यासाठी मुख्यमंत्रीपदाची जागा मला मिळाली. याच्या शिल्पकार लाडक्या बहिणी आहेत. अनेकजण निवडणूक संपल्यावर योजना बंद होतील असं म्हणत होतं. पण पाच वर्ष आपली एकही योजना बंद होऊ देणार नाही. पाच वर्षांने तुमच्या आशीर्वादाने सरकार आलं तर पुढचं पाच वर्षही असेल असंही त्यांनी म्हटलं आहे.

लखपती दीदीच्या कार्यक्रमात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे. आतापर्यंत २५ लाख बहिणी लखपती दीदी झाल्या असून, २५ लाख होणार आहेत. एक कोटी बहिणींना लखपती दीदी केल्याशिवाय राहणार नाही, असा निर्धार फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी लखपती दीदीचा कार्यक्रम जाहीर केला तेव्हा अनेकांना प्रश्न पडला होता. एकदा लाख रुपये किंवा तशी स्थिती झाली तर लखपती दीदी म्हणायचं का? तर असं नाही. जी महिला स्वत:च्या पायावर उभं राहून दरवर्षी वर्षाला एक लाखांपेक्षा जास्त कमवेल तिला लखपती दीदी म्हणता येईल. त्यासाठी वेगवेगळ्या योजना सुरु केल्या.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या देशाच्या विकासाचं जे स्वप्न पाहिलं, त्यात त्यांनी एकच गोष्ट सांगितली की विकासाचं स्वप्न पूर्ण करायचं असेल तर लोकसंख्येचा ५० टक्के हिस्सा या स्वप्नाचा भाग होत नाही तोपर्यंत ते पूर्ण होणार नाही. महिला लक्ष्यित योजनांच्या माध्यमातून विकास मोदींनी सुरु केला. महिला केंद्रीत विकास हे मॉडेल या देशात मोदींनी सुरु केलं आणि बेटी बचाओ, बेटी पढाओचा जो प्रवास सुरु झाला तो लखपती दीदीपर्यंत पोहोचला आहे. आपल्या पायावर उभ्या राहिलेल्या बहिणी पाहायला मिळाल्या. आपल्याला किती अभिमान वाटता जेव्हा ऑपरेशन सिंदूर सुरु असताना पाकिस्तानाला धूळ चारतोय हे सागंणाऱ्या दोन भगिनी टीव्हीवर यायच्या. ज्याप्रकारे आपल्या सैन्याचा पराक्रम आणि भारताची दैदीप्यमान कामगिरी आमच्यापुढे मांडायच्या त्यावेळी हा नावा भारत आहे लक्षात यायचं. हा मोदींनी तयार केलेला भारत आहे.

आमची भगिनी घरात

## भारत-पाकिस्तानची हवाई क्षेत्रं २४ सप्टेंबरपर्यंत एकमेकांसाठी बंद

नवी दिल्ली : भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, दोन्ही देशांनी एकमेकांच्या विमानांसाठी आपले हवाई क्षेत्र २४ सप्टेंबर २०२५ पर्यंत बंद ठेवले आहे. ही बंदी खासगी, व्यावसायिक तसेच लष्करी उड्डाणांवर देखील लागू आहे.

जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे २२ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ हिंदू नागरिकांची जिहादी दहशतवाद्यांनी टार्गेट किलींग केल्यानंतर , भारताने पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर ऑपरेशन सिंदूर अंतर्गत कारवाई केली होती. त्यानंतर भारत सरकारने पाकिस्तानी विमानांसाठी भारतीय हवाई क्षेत्र बंद केले. ही बंदी सुरुवातीला २४ मेपर्यंत होती, मात्र नंतर ती महिन्यागणिक वाढवण्यात आली आहे. भारत सरकारने नव्याने जारी केलेल्या नोटीस टू एअरमॅन (एनओटीएएम) अनुसार, पाकिस्तानी नोंदणीकृत किंवा त्यांच्या एअरलाइन्स/ऑपरेटरद्वारे चालवली जाणारी कोणतीही उड्डाणे २३ सप्टेंबर रात्री ११.५९ वाजेपासून २४ सप्टेंबर सकाळी ५.३० वाजेपर्यंत भारतीय हवाई हद्दीत प्रवेश करू शकणार नाहीत.

दुसऱ्या बाजूला, पाकिस्ताननेही २० ऑगस्ट रोजी एनओटीएएम जारी करून भारतीय विमानांसाठी आपले हवाई क्षेत्र २४ सप्टेंबरपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया देताना, भारत-पाकिस्तान मुद्द्यावर कोणतीही बाह्य मध्यस्थी स्वीकारली जाणार नसल्याचे स्पष्ट केले. दोन्ही देशांमध्ये सुरू असलेल्या हवाई क्षेत्र बंदीमुळे आंतरराष्ट्रीय उड्डाणांवरही परिणाम होण्याची शक्यता आहे.

## न्यूयॉर्कमध्ये भारतीयांना घेऊन जात असलेल्या बसला अपघात, पाच ठार



न्यूयॉर्क : अमेरिकेतून एक दुःखद बातमी आली आहे. न्यूयॉर्क राज्य महामार्गावर एका बसचा अपघात झाला. नायगरा धबधब्याला भेट देऊन परतत असलेल्या पर्यटकांना घेऊन जात असलेल्या बसला अपघात झाला. बसमध्ये ५४ जण होते त्यापैकी पाच जणांचा अपघातात मृत्यू झाला. अपघात बफेलो शहराच्या पूर्वेला सुमारे ४० किमी. अंतरावर झाला.

बसमध्ये प्रामुख्याने भारत, चीन आणि फिलिपिन्स या तीन देशांचे नागरिक होते. यापैकी अपघातात नेमक्या कोणाचा मृत्यू झाला हे अद्याप समजलेले नाही. प्राथमिक वृत्तानुसार चालकाने नियंत्रण गमावल्यामुळे बस दरीत कोसळली. अपघातात जखमी झालेल्यांना तातडीने उपचार करण्यासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल केले आहे. घटनास्थळी पोलीस आणि वैद्यकीय पथक मदतकार्यात गुंतले आहे. आठ हेलिकॉप्टरच्या मदतीने सर्व जखमींना तातडीने रुग्णालयात नेण्यात आल्याची माहिती पोलीस प्रशासनाने दिली.

बस अपघातात ठार झालेल्यांमध्ये एकही मुल नाही. सर्व वयस्क पर्यटक आहेत. बस अपघात प्रकरणी पोलीस चालकाची चौकशी करत आहेत. अपघात प्रकरणी तपास सुरू आहे.

## भारतीय कृषी पद्धती व देशी गोवंशपालनामुळे स्वयंपूर्णता साध्य होईल - डॉ. मोहन भागवत




छत्रपती संभाजीनगर, दि. २३ ऑगस्ट : भारतीय शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून तसेच पशुपालनासह मिश्र शेतीचा अवलंब केल्यास शेतकऱ्यांना अधिक फायदा होईल. जागतिक पातळीवरील अनिश्चितता आणि आव्हानांचा विचार करता कृषी क्षेत्रात स्वयंपूर्ण होणे अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केले. ज्येष्ठ पशुवैद्य प्रतिष्ठानच्या २८ व्या वर्धापन दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर येथील तापडिया नाट्य मंदिरात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

पशुवैद्यक शास्त्रात सर्वोच्च गुण प्राप्त करणारे विद्यार्थी व विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कार्यकर्त्यांनाही गौरविण्यात आले. तसेच प्रतिष्ठानची स्मरणिका प्रकाशनही यावेळी झाले. या प्रसंगी डॉ. अशोक दिवाण (अध्यक्ष, ज्येष्ठ पशुवैद्य प्रतिष्ठान) व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमात पशुसंवर्धन क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या पशुपालक व पशुवैद्यकीय पदवीधरांना आदर्श पशुपालक, आदर्श गोपालक, उत्कृष्ट पशुवैद्य, आदर्श प्राध्यापक अशा पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. आदर्श पशुपालक पुरस्कार - सौ. वैशाली भाऊसाहेब चव्हाण, देवणी गोवंश आदर्श गोपालक - रामकृष्ण नामदेव दरगुडे, कै. खंडेराव जाधव आदर्श शेळीपालक पुरस्कार - राहुल लक्ष्मण पुऱ्हे, गुणवंत विद्यार्थी - डॉ. कु. ईश्वरी जोशी (तीन पुरस्कार), यशवंत विद्यार्थी सुवर्ण पदक पुरस्कार - डॉ. वैभव विष्णुदास हरडे, गुणवंत विद्यार्थिनी - डॉ. कु. शारदा ढाकरके, आदर्श पशुवैद्य डॉ. अनिल कौसडीकर, पशुवैद्य भूषण डॉ. नरेश गीते, जीवनगौरव पुरस्कार - डॉ अरविंद मुळे, आदर्श प्राध्यापक डॉ. प्रफुल्लकुमार पाटील, उत्कृष्ट पशुवैद्य सहदेव पुरस्कार - डॉ. आनंद राजशेखर दडके, उत्कृष्ट पशुवैद्य नकुल पुरस्कार - डॉ. विजय ढोके, उत्कृष्ट पशुवैद्य पुरस्कार- डॉ.प्रमोद रतनलाल दोशी, आदर्श प्राध्यापक डॉ. विश्वंभर पाटोदकर यांना पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

संस्थेची सुरुवात प्रतिकूल परिस्थितीत झाली. अनेक सहकाऱ्यांच्या योगदानामुळे आज संस्थेची क्षमता वाढली असून विविध पुरस्कार प्रदान करण्याइतपत कामकाज विस्तारले आहे, असे अध्यक्षांनी सांगितले.

डॉ. भागवत पुढे म्हणाले, ज्याला बोलता येत नाही, उपचार करताना जो विरोध करतो, त्याचेही दुःख समजून त्याला बरे करण्याची कला आपल्याकडे आहे. शालिहोत्र या प्राचीन पशुवैद्याने घोड्याचे वय व गुणवत्तेचे शास्त्र सांगितले होते. आपली ही परंपरा अभिमानास्पद आहे. शेतीत पाश्चात्त्य तंत्रज्ञान व आधुनिकता आवश्यक तिथे स्वीकारून, भारतीय पद्धतीनुसार शेती व पशुपालनाचा समन्वय साधला तर शेतकऱ्याला लाभ होईल. देशी गोवंश व पारंपरिक शेती पद्धतीबाबत लोकांचा विश्वास वाढत आहे. भारतीय शेतीची आधुनिक रूपे विकसित करूनच आपण कृषी स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करू शकतो.

## राधाकृष्ण विखे पाटील यांची मराठा समाजाच्या मंत्रिमंडळ समितीचे नवीन अध्यक्ष म्हणून नियुक्ती

मुंबई: भाजपच्या नेतृत्वाखालील 'महायुती' सरकारने जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची मराठा समाजाच्या मुद्द्यांवरील मंत्रिमंडळ समितीचे नवीन अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली आहे. त्यांनी ज्येष्ठ भाजप नेते चंद्रकांत पाटील यांची जागा घेतली आहे, जे आता समितीचे सदस्य म्हणून काम करतील.

चंद्रकांत पाटील यांचे वरिष्ठत्व आणि २०१४-२०१९ या काळात समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी बजावलेली भूमिका पाहता, हे नेतृत्व बदल एक महत्त्वाचे पाऊल मानले जाते. समितीमध्ये चार नवीन सदस्यांचाही समावेश करण्यात आला आहे.

अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसचे माणिकराव कोकाटे, मकरंद जाधव आणि बाबासाहेब पाटील, तसेच भाजपचे शिवेंद्र राजे भोसले या चार नवीन सदस्यांचा समितीमध्ये समावेश करण्यात आला आहे. २०१९ च्या राज्य विधानसभा निवडणुकीपूर्वी भाजपमध्ये सामील झालेले विखे-पाटील, समितीमध्ये एक नवीन दृष्टीकोन आणतील अशी अपेक्षा आहे. त्यांची पार्श्वभूमी आणि शांत स्वभाव इतर नेत्यांशी दुवा साधण्यास मदत करू शकते.

ही समिती मराठा समाजासाठी राज्य उपक्रमांवर देखरेख ठेवण्यासाठी, ओबीसी श्रेणीतून आरक्षणाशी संबंधित कायदेशीर मुद्द्यांचा पाठपुरावा करण्यासाठी आणि न्यायमूर्ती (निवृत्त) संदीप शिंदे समितीशी समन्वय साधण्यासाठी जबाबदार आहे.

## अनिल अंबानी पुन्हा अडचणीत, ईडीनंतर अंबानींच्या सहा ठिकाणांवर सीबीआयचे छापे

मुंबई : अनिल अंबानी पुन्हा एकदा अडचणीत आले आहेत. अंमलबजावणी संचालनालयाने धाड टाकल्यानंतर आता सीबीआयने देखील उद्योगपती अनिल अंबानी यांच्या सहा ठिकाणांवर छापे टाकले आहेत. याआधी कर्ज घोटाळाप्रकरणी ईडीने काही दिवसांपूर्वी छापे टाकले होते.

त्यानंतर आज सीबीआयने अनिल अंबानी यांच्या जवळपास सहा ठिकाणी छापे टाकल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे अनिल अंबानी पुन्हा एकदा अडचणीत आले आहेत.

यामध्ये येस बँकेनं दिलेल्या १७ हजार कोटींच्या कर्जाचा घोटाळा केल्याचा आरोप असून अनिल अंबानींनी मंजूर कर्ज अन्य कंपन्यांत वळवल्याचा आरोप आहे. याबाबत अनिल अंबानींनी कागदपत्रे देण्यास १० दिवसांचा वेळ मागितला होता.

दहा दिवसांचा वेळ न देता सीबीआयकडून आज ६ ठिकाणांवर छापेमारी करण्यात आली आहे. अनिल अंबानींच्या रिलायन्स कम्युनिकेशन्स आणि अन्य निगडीत ठिकाणी छापे टाकण्यात आले आहेत.

या कारवाईमध्ये अनेक कागदपत्रे, आर्थिक व्यवहार, डिजिटल रेकॉर्ड आणि इतर पुरावे ताब्यात घेण्यात आले आहेत अशी माहिती मिळत आहे. केंद्रीय तपास यंत्रणेचा आरोप आहे की रिलायन्स ग्रुपच्या अनेक कंपन्यांनी येस बँकेकडून कोणतीही पुरेशी हमी न घेता मोठी कर्जे घेतली आणि शेल कंपन्यांद्वारे पैसे इतर कामांवर खर्च केले गेले. यापूर्वी, या प्रकरणात सीबीआयने दोन एफआयआर दाखल केले होते, त्यानंतर ईडीने तपास सुरू केला. सध्या या कारवाई प्रकरणी तपास सुरु आहे.

## कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या कुलगुरूंचे निधन



मऊ : कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू हरेराम त्रिपाठी यांचे अपघाती निधन झाले. ते मऊ कुशीनगर, उत्तरप्रदेश येथे जात असताना शनिवार २३ ऑगस्ट २०२५ रोजी पहाटे अपघात झाला. अपघात झाला त्यावेळी त्यांच्यासोबत त्यांची पत्नी बदामी त्रिपाठी यांचेही निधन झाले. त्रिपाठी यांचा चालक वैभव मिश्रा गंभीर जखमी आहे, त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. प्रा. हरेराम त्रिपाठी हे भारतीय दर्शनशास्त्र, नव्यन्याय आणि न्यायशास्त्राचे विद्वान होते. होते. त्यांनी सात जून २०२३ रोजी कुलगुरुपदाची सूत्रे स्वीकारली होती. त्यांच्या काळात त्यांनी विद्यापीठासाठी ७० कोटी रुपयांचे अनुदान मिळवले. तसेच संशोधन प्रकल्प आणि कार्यशाळांसाठीही त्यांनी अनुदान मिळवले. त्यांच्या काळात वारंगा आंतरराष्ट्रीय परिसरातील डॉ. हेडगेवार शैक्षणिक भवनाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या हस्ते एक ऑगस्ट २०२५ रोजी झाले. याशिवाय संशोधन छात्रावास आणि डॉ. तोतडे सभागृह देखील त्यांच्या काळात पूर्ण झाले. त्यांनी कालच सहा प्राध्यापकांना पदोन्नतीचे पत्र दिले होते. त्रिपाठी श्री लालबहादूर शास्त्री राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठात प्राध्यापक होते. त्यांनी संपूर्णानंद संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरुपदही भूषवले होते. त्यांना भारत सरकारतर्फे महर्षी बादरायण राष्ट्रपती पुरस्कार, शांकर वेदान्त पुरस्कार आणि पाणिनी सन्मान असे अनेक पुरस्कार मिळाले होते. तसेच उत्तर प्रदेश संस्कृत संस्थेने त्यांना विशिष्ट सेवा पुरस्काराने सन्मानित केले होते.

## गणेश भक्तांसाठी मोफत प्रवास!

मुंबई: गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या भाविकांसाठी मुंबई भाजपने ३५० मोफत बसेस आणि विशेष रेल्वे सेवांची व्यवस्था केली आहे. आज मुंबई भाजपचे अध्यक्ष आणि राज्याचे सांस्कृतिक मंत्री ड. आशिष शेलार यांनी बस सेवेला हिरवा झेंडा दाखवला, ज्यामुळे उत्सवासाठी घरी जाणाऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण प्रवासाची मदत मिळेल. दरवर्षी, मुंबई भाजप गणपती बाप्पाच्या भक्तांना प्रवासाची मदत करते, आणि या वर्षीच्या उपक्रमाचा लक्षणीय विस्तार केला आहे. या ३५० बसेस मुंबईतील विविध ठिकाणांहून कोकणाकडे रवाना होतील. या सेवेचे सुरळीत कामकाज सुनिश्चित करण्यासाठी, बीकेसीमध्ये एक समर्पित नियंत्रण केंद्र स्थापन करण्यात आले आहे. ड. आशिष शेलार यांनी पुष्टी केली की, भाजप कोकण रहिवाशांना आणि भक्तांना मदत करण्यास कटिबद्ध आहे. बसेस व्यतिरिक्त, प्रवाशांसाठी एक विशेष ट्रेनही सुरू करण्यात आली आहे. उत्सवातील गर्दी हाताळण्यासाठी केंद्रीय रेल्वे मंत्र्यांच्या समन्वयाने आणखी रेल्वे सेवांची योजना आखली जात आहे.



# राक्षसणीची पुजा करणारे गाव पारध - उद्यापासून हेडंबामाता यात्रेस प्रारंभ

तभा वृत्तसेवा
पारध / प्रतिनिधी

भोकरदन तालुक्यातील पारध शाहुराजा येथे दि २४ रोजी रविवार पासुन हेडंबा यात्रेसप्रारंभ होणार आहे. ही यात्रा दि २४, व २५ ऑगस्ट दोन दिवस यात्रा चालते. भोकरदन तालक्यातील पारध बु. येथे विविधता नांदत असलेल्या हिंदुस्थानात पूर्वापार धार्मिकतेला महत्व दिले गेले आहे. संस्कृती परंपरेनुसार देव-धर्म केला जातो. विविध धार्मिक स्थळावर देवी देवताना पूजल्या जात असल्याचे चित्रा आपण सर्वत्र पाहतो मात्र मराठवाड्यातील पारध शाहूराजा येथील ग्रामस्थ चक्क रक्षणीची पुजा-अर्चा करत आहेत. ही पारध वासीयांसाठी काही नवलाची गोष्ट नसली तरी ज्यांना हा इतिहास माहीत नाही त्यांच्या साठी अश्यार्याची बाब ठरते.

शेकडो वर्षापासून भाद्रपद शुद्ध द्वितीयेला महर्षी पराशर महारांजा सोबतच बलवान भिमाची पत्नी हिडिंबा ( राक्षस ) ची सुद्धा यात्रा भरते. उद्या दि.२४ रविवारी या यात्रा महोत्सवाला सुरुवात होणार असून असून या उत्सवात मराठवाडा ,खान्देश आणि विदर्भातून भक्तगण सहभागी होत हिडिंबाचे दर्शन घेतात .देशात पारध हे पहिलेच असे गाव आहे की तेथील गावकरी राक्षसनीला देव मानून तिची यात्रेच्या निमित्ताने भक्तीभावे पूजा अर्चा करून नवस देखील बोलतात.

पारध हे विदर्भाच्या सीमेपासून अगदी पाच सहा किलोमीटर अंतरावर रायघोळ नदीच्या तीरावर वसलेले गाव आहे.





जालना जिल्ह्यात येत असलेतरी तेथील नागरिकांची बाजारपेठेच्या दृष्टीने बुलढाणा तालुक्यातील धाड गावाशी नाळ जुळलेली आहे. या गावाला सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे याठिकाणी महाकवी व्यासाचे पिताश्री महर्षि पाराशर यांचे जागृत देवस्थान आहे. ७५ फूट उंच मंदिरावर आकर्षक नक्षीकाम केले आहे. श्री गुरुदत्त भगवान व रामचंद्राचेही मंदिर आहे डाव्या बाजूला विठ्ठल-रुक्मिणी आणि ज्ञानेश्वर माऊलींचे मंदिर आहे महर्षी पाराशर यांनी या भागात वास्तव्य केल्याचे पुरावे अनेक पुरातन ग्रंथात आढळतात याच ठिकाणी त्यांची अवतार समाप्ती झाल्याची नोंद आहे त्यांच्या नावावरून व छत्रपती शाहू महाराजांच्या पहिल्या विजयाच्या साक्षी मुळेच या पुण्यभूमीत चे नाव पारध ( शाहूराजा ) पडले आहे अशी आख्यायिका आहे .महर्षी पाराशरांची समाधी रायघोळ नदीच्या पात्रामध्ये असून त्या ठिकाणी त्यांच्या पवित्र पादुका ठेवलेल्या आहेत .पुरातन काळात हा भाग दंडकारण्याचा असल्याने या भागात मायावी राक्षस हिंडिंबेचे काही काळ वास्तव्य होते .याच वेळी पाच पांडव सुद्धा वनवासात होते आरसपानी सौंदर्यवतीचे रूप धारण करुन तिने बलशाली भीमाला मोहिनी घातली व त्याच्या सोबत विवाह केला पुत्र प्राप्ति नंतर त्यांनी मुलाचे नाव घटोत्कच ठेवले पुढे हिंडिंबा पुत्र घटोत्कच याने महाभारताच्या रणसंग्रामात अर्जुनाला जीव वाचवून महाभारताला वेगळी कलाटणी दिली विर पुत्राच्या मातेला म्हणजेच हिंडिंबा देवी मानले गेले आहे . असा उल्लेख शास्त्रात आहे.देवत्व प्राप्त झाल्यानेच हिडिम्बाची मनोभावे पूजा करून दर्शन घेतात यानिमित्त भाद्रपद शुद्ध द्वितीयेला म्हणजे दि.२४ ऑगस्ट रवीवारी महर्षी पाराशर महाराजा बरोबरच हीडिंबा देवीची यात्रा आहे तीन दिवस चालणाऱ्या या यात्रेत पहिल्या दिवशी हिडिंबाची भव्य मिरवणूक काढली जाते नवस फेडण्यासाठी हजारो भाविक येतात भजनी मंडळ टाळमृदुंगाच्या निनादात भजन व भारुडे गातात सळसळत्या रक्ताची तरुण लाठ्या-काठ्या तसेच मुगदलाच्या कसरती सादर करतात , यावेळीं नवीनच महाबली हनुमान यांचा देखावा सादर करण्यात येणार आहे हे आयोजन आसरामाता मित्र मंडळ यांनी आयोजीत केले,तसेच या यात्रेसाठी प्रत्येक गावकरी आपले योगदान देतो. मिरवणुकीनंतर महाशक्तिशाली भिमाच्या स्मरणार्थ कुस्तीचा आखाडा ही भरतो यामध्ये मराठवाडा खानदेश व विदर्भातून नच नव्हे तर पश्चिम महाराष्ट्रात लिही नामवंत मल्ल सहभागी होतात.

## संक्षिप्त

### यशोदाबाई शर्मा यांचे निधन



तभा वृत्तसेवा
परतूर / प्रतिनिधी

शहरातील जेष्ठ नागरिक यशोदाबाई जगन्नाथजी शर्मा (उपाध्याय) यांचे शुक्रवारी सकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. त्या ८१ वर्षांच्या होत्या.त्यांच्या पश्चात दोन मुले, पाच मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.शनिवारी सकाळी त्यांच्या पार्थिवावर कैलासधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी समाजातील सर्व स्तरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पत्रकार केदार शर्मा त्यांचे चिरंजीव होत.

### सन ऑफ आंबेडकर ग्रुप परतुरच्या पाठपुराव्याला यश



तभा वृत्तसेवा
परतुर / प्रतिनिधी

परतुर शहरांमधील गावभागात बैल पोळ्यानिमित्त हनुमान मंदिर परिसरात मोठ्या संख्येने बैलपोळा हा सण साजरा करण्यात येत असून हा बैलपोळा सण साजरा करण्यासाठी परतुर शहरातील शेतकरी बांधव व नागरिक हजारोच्या संख्येने येत असतात मात्र शहरातील हणुमान मंदीर परिसरात पाऊसाचे पाणी साचलेले असल्याने मोठ्या प्रमाणावर परिसरात घाण साचलेली त्या ठिकाणी पावसामुळे खूप चिखल झाला होता हे सन ऑफ आंबेडकर ग्रुप परतूरच्या लक्षात आल्यानंतर तात्काळ त्यांनी न. प परतूरचे कर्तव्यदक्ष मुख्याधिकारी दयानंद गोरे यांना फोनद्वारे संपर्क साधला असता त्यांनी तात्काळ आपल्या कर्मचाऱ्यासहित जेसीबी द्वारे त्या हणुमान मंदिरपरिसराची स्वच्छता करून दिल्या बद्दल त्यांचे सन ऑफ आंबेडकर ग्रुप परतूर च्या वतीने मनापासून आभार माणण्यात आले .

### देशी-विदेशी दारूसह इसम पोलिसांच्या जाळ्यात; ६२,४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त



तभा वृत्तसेवा
बदनापूर/ प्रतिनिधी

बदनापूर पोलिसांनी दारूबंदी कायद्यांतर्गत कारवाई करत देशी व विदेशी दारूसह एक इसमाला पकडले. या कारवाईत एकूण ६२,४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मौजे सोमठाणा-बदनापूर रोडवरून राजू बादवेल (रा. दुधनवाडी फाटा, बदनापूर) हा आपल्या एचएफ डिलक्स मोटारसायकल (क्र. चक-२१ इ- ७४१७) वरून चोरटी दारू विक्री करण्याच्या उद्देशाने घेऊन जात असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी रेल्वे पटरीजवळ सोमठाणा रोडवर सापळा रचून त्याला पकडले. तपासादरम्यान त्याच्याकडून अंदाजे १७,४०० रुपयांची देशी व विदेशी दारू तसेच ४५,००० रुपयांची मोटारसायकल असा मिळून एकूण ६२,४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. संबंधितावर दारूबंदी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### इब्राहिमपूर येथे बैल पोळा सण उत्साहात साजरा



तभा वृत्तसेवा
भोकरदन/प्रतिनीधी

भोकरदन तालुक्यातील इब्राहिमपूर येथे पोळा हा पारंपरिक सण उत्साहात साजरा करण्यात आला वर्षभर शेतात राबणाऱ्या सर्जा राजाला सजवून ठीक ठीक ठिकाणी शुक्रवार रोजी गावाच्या वेशीतून वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली होती.

## क्रीडा स्पर्धेमुळे राष्ट्रीय एकात्मताची भावना जोपासली जाते-पोलीस उपनिरीक्षक राजधर पठाडे



तभा वृत्तसेवा
जाफ्राबाद/प्रतिनिधी

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे-१ व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय जालना व जिल्हा परिषद जालना यांच्या आदेशान्वये सिद्धार्थ महाविद्यालय मध्ये १४,१७,१९ वर्षातील मुला मुलींची तालुकास्तरीय क्रीडा हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन सिद्धार्थ महाविद्यालय येथे करण्यात आले होते या क्रीडा स्पर्धेचे अध्यक्ष सिद्धार्थ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुनील मेढे हे होते व या हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटक जाफ्राबाद पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक श्री राजधर पठाडे हे होते यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करीत असताना खेळामुळे राष्ट्रीय भावना जोपासली जाते व खेळाडूंमध्ये राष्ट्रीय प्रेम वाढते खेळामुळे खेळाडूंमध्ये शिस्त दिसून येते खेळाडूंनी जिद्दीने चिकाटीने प्रमाणिकपणे नेहमी सराव करावा व खेळाडूंनी आपल्या तालुक्याचे आपल्या जिल्ह्याचे आपल्या राज्याचे व देशाचे नाव लौकिक करावे. खेळाडूंनी खेळा सोबतच अभ्यासाकडे लक्ष द्यावे. खेळामुळे लोकांना एकत्र आणून ती बंधुत्वाची भावना वाढवते, ज्यामुळे सामाजिक सलोखा टिकून राहतो. असे प्रतिपादन केले. अध्यक्षीय भाषणामध्ये डॉ. सुनील मेढे यांनी पंचांनी न्यायाधीशाप्रमाणे योग्य ते निर्णय द्यावा व खेळाडूंनी शिस्तीत खेळ खेळावा असे आवाहन केले. या कार्यक्रमाचे प्रमुख उपस्थित मध्ये पोलीस उपनिरीक्षक वासुदेव पवार, प्राध्यापक उदय वझरकर, , प्राध्यापक पहारे सर, प्राध्यापक प्रकाश निकम , प्राध्यापक शिवाजी वैद्य यांची प्रमुख उपस्थितीमध्ये क्रीडा स्पर्धा संपन्न झाल्या. या क्रीडा स्पर्धेमध्ये सिद्धार्थ महाविद्यालय जाफ्राबाद, समर्थ महाविद्यालय जाफ्राबाद, जिल्हा परिषद महोरा, जिल्हा परिषद खासगाव, स्वामी विवेकानंद विद्यालय स्कूल जाफ्राबाद, जिजामाता विद्यालय टेंभुर्णी जिजाऊ इंग्लिश स्कूल जाफ्राबाद इत्यादी शाळांनी क्रीडा स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला होता. हॉलीबॉल क्रीडा स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद महोरा यांनी व सिद्धार्थ महाविद्यालयांनी कायमचे वर्चस्व राहिले . या क्रीडा स्पर्धा यशस्वी करण्यासाठी स्वप्निल वाघ, अमोल चव्हाण, आकाश छडीदार , समाधान सुरवसे , विजय मोहिते, गौरव शिंदे, राहुल भटकर, वैभव फदाट यांनी स्पर्धा यशस्वीरित्या पार पडल्या.

## गणेशोस्तव - ईद ए मिलाद च्या पार्श्वभुमीवर पोलीसांची प्रतिबंधक कार्यवाही



तभा वृत्तसेवा
भोकरदन/प्रतिनीधी

गणेशोस्तव व ईद-ए-मिलाद च्या पाश्वभुमीवर उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय येथे मा अपर पोलीस अधिक्षक जालना डॉ. आयुष नोपाणी यांनी पोलीस ठाणे भोकरदन, जाफराबाद, हसनाबाद, पारध व टेभुणी या हद्दीतील रेकॉडवरील गुन्हेगारी पार्श्वभुमी असलेल्या इसमांना बोलावुन त्याचे वर कलम १२६ भारतीय न्याय सुरक्षा संहिता व कलम १२९ भारतीय न्याय सुरक्षा संहिता ची कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे पोलीस ठाणे हददीतील ९७ इसमांना हजर केले होते. त्यांनी यापुढे प्रत्येक सणाचे काळात काही अनुचित प्रकार करु नये तसेच त्यांचे हस्तकांमार्फत उपद्री हालचाली मध्ये सहभागी होवुन सार्वजनिक शांतता भंग करु नये म्हणुन सर्वाना कडक शब्दात समज दिली. उपविभागातील पोलीस ठाणे हददीतील उपद्री हालचाली करणारे ९७ इसमाकडुन यांचे कडुन बंधपत करुन घेतले. तसेच मा न्यायालयाने डी जे वर बंदी घातली असुन ध्वनी प्रदुषण होवु नये म्हणुन डी जे धारकांना देखील नोटीस बजावल्या व सक्त सुचना देखील दिल्या जो कायदयाचे पालन करणार नाही त्याचेवर कडक कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. असा इशारा देखील दिला. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी भोकरदन श्री डॉ नितीन कटेकर व श्री सतीष जाधव पोनि जाफराबाद, श्री संजय अहिरे सपोनि हसनाबाद, श्री संतोष माने सपोनि पारध, कैलास भारती सपोनि टेभुणी व पवन राजपुत पोउपनि यांची उपस्थिती होती,

## पारधमध्ये दोन गटांत तुफान राडा

तभा वृत्तसेवा
पारध /प्रतिनिधी

भोकरदन तालुक्यातील पारध बु. गावात जुन्या भांडणाच्या वादातून दोन गटांमध्ये जोरदार हाणामारी झाल्याच्या दोन वेगवेगळ्या घटना समोर आल्या आहेत. या प्रकरणी पारध पोलीस ठाण्यात दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहे .

पहिली घटना: तरुणाला काठीने मारहाण
पहिली घटना शुक्रवार, दिनांक २२ ऑगस्ट २०२५ रोजी संध्याकाळी ४ च्या सुमारास घडली. गावातीलच ऋषीकेश रमेश सपकाळ (वय २०) या तरुणाला त्याच्या घरासमोरच आकाश रवि देशमुख, चेतन सुनील देशमुख, स्वप्निल रवि देशमुख आणि गणेश शाम क्षीरसागर या चार आरोपींनी अडवले. माझ्यासोबत मागे का वाद घातला? असे म्हणत त्यांनी ऋषीकेशसोबत वाद घातला. ऋषीकेशने काहीही वाद नसल्याचे सांगितले असता, आरोपींनी त्याला लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. यातील आरोपी आकाश देशमुखने हातातील काठीने ऋषीकेशच्या डोक्यावर मारून त्याला गंभीर दुखापत केली, ज्यात त्याच्या डोक्यातून रक्त आले. याप्रकरणी ऋषीकेश सपकाळच्या तक्रारीवरून गुन्हा (गु.र.नं. २०८/२०२५) दाखल करण्यात आला.

दुसरी घटना: बस स्टँडवर तलवारीने धमकी पहिली घटना घडल्यानंतर काही तासांतच रात्री ८ वाजता दुसरी घटना घडली. गावातील पवन गुलाबराव लोखंडे (वय ३५) आणि त्याचा मित्र अक्षय तेलंग्रे यांना पारध बस स्टँडवर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर अडवण्यात आले. यावेळी युवराज उर्फ चेतन देशमुख, आकाश लोखंडे, गणेश क्षीरसागर, गौरव देशमुख, सागर लोखंडे, उत्तम देशमुख, ऋषी भुसारे, शेखर लोखंडे, प्रसाद जाणोकर, सचिन क्षीरसागर, सुजल देशमुख, विशाल तबडे, योगेश लोखंडे, मंगेश लोखंडे, प्रतिक क्षीरसागर यांच्यासह पाच ते सात अनोळखी व्यक्तींनी एकत्र येऊन त्यांना मारहाण केली. तुम्ही वेशीजवळ आमच्यासोबत का वाद घातला? असे म्हणत आरोपींनी पवन लोखंडे आणि त्याच्या मित्राला शिवीगाळ करत लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. आरोपी युवराज उर्फ चेतन देशमुख याने हातातील फायटरने पवनच्या नाकावर मारून त्याला जखमी केले. तर, दुसऱ्या आरोपी आकाश लोखंडेने अक्षय तेलंग्रेच्या डोक्यात लोखंडी रॉड मारून त्याला गंभीर दुखापत केली. यावेळी आरोपींनी तलवारीने जीवे मारण्याची धमकीही दिली. या प्रकरणी (गु.र.नं. २०९/२०२५) गुन्हा दाखल करण्यात आला . सदर घटनेची माहिती पोलीस निरक्षक सतोष माने यांना माहिती मिळताच आपल्या फौज फट्यासह भेट देऊन दुन्ही गटनावर शातंता राखण्याचे आवाहन केले गावात पोलीसांनी हस्तक शेप केल्यामुळे शांताता आहे फढील तपास जमादार प्रकाश सिनकर हे करीत आहे .

## जाफ्राबाद येथे वेश्या व्यवसायावर पोलिंसाचा छापा आरोपींना जेरबंद करुन पिडीत महिलांची केली सुटका

### अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षाची कार्यवाही

तभा वृत्तसेवा
जाफ्राबाद / प्रतिनिधी



दिनांक २२/०८/२०२५ रोजी आम्ही अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष जालना येथे हजर असतांना आम्हाला आमचे गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, जाफ्राबाद शहरातील जिल्हा परीषद शाळेच्या बाजुला पत्राच्या शेड मध्ये दोन महिला त्यांच्या आर्थिक फायद्यासाठी पत्राच्या शेडमध्ये बाहेरुन महिलांना आणुन वेश्या व्यवसाय करीत आहे अशी खात्रीलायक बातमी मिळाल्याने मा. पोलीस अधीक्षक सो जालना यांच्या आदेशाने आम्ही सदर ठिकाणी स्टाफसह छापा टाकला असता त्याठिकाणी पत्राच्या शेड मध्ये १) माया प्रशांत वाकोडे वय-४२ वर्ष रा. हिवरखेड ता. खांबगाव जि. बुलढाणा २) कांताबाई अण्णासाहेब अवसरमोल वय-५० वर्ष रा. जाफ्राबाद जि. जालना ३) ग्राहक राहुल हरी सुरासे वय-२६ वर्ष रा. पिंपळगाव कड ता. जाफ्राबाद जि. जालना असे दोन पिडीत महिलासह मिळुन आले असुन त्यांच्या ताब्यातुन गातुन रोख, मोबाईल व कॉन्डम पॉकीट असा एकुण २६०३० रुपयाचा मुद्देमाल मिळुन आला आहे त्यानुसार त्यांना ताब्यात घेवुन त्यांचे विरुद्ध पोलीस ठाणे जाफ्राबाद येथे महिलांच्या अनैतिक व्यापारास प्रतिबंध अधिनियम १९५६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग भोकरदन नितीन कटेकर, पोलीस निरीक्षक पंकज जाधव (स्थागुशा), पोनि सतीश जाधव (जाफ्राबाद) यांच्या मार्गदर्शनाखाली अ.मा.वा.प्र. कक्षाचे प्रभारी अधिकारी दिपाली शिंदे, पोउपनि रविंद्र जोशी, पोउपनि संजय गवळी, पो. अंमलदार कृष्णा देठे, म.पो. अंमलदार संगिता चव्हाण, आरती साबळे, रेणुका राठोड व चालक पो. अंमलदार संजय कुलकर्णी यांनी केलेली आहे.

## मंठा पोलिसांची दंगाकाबू रंगीत तालीम व रूट मार्च

तभा वृत्तसेवा
मंठा/ प्रतिनिधी



गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंठा बसस्थानकात पोलिसांनी दंगाकाबू रंगीत तालीमसह लाठी ड्रिल, ड्रायवेपन प्रॅक्टिस केली. तसेच मंठा शहरातील मुख्य रस्त्याने पोलिसांनी रूट मार्च केला. आगामी काळातील गणेशोत्सवासह इतर सणांच्या पार्श्वभूमीवर मंठा पोलिसांनी घेतलेल्या दंगा काबू रंगीत तालीम, लाठी ड्रिल व रूट मार्चने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. या रंगीत तालीम व रूट मार्चमध्ये पोलीस निरीक्षक मनोजकुमार राठोड, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री ईधाटे, पोलीस उपनिरीक्षक संतोष माळगे, पोलीस उपनिरीक्षक विठ्ठल केंद्रे, १५ पोलीस अंमलदार, १२ होमगार्ड हजर होते.

## डॉ. गोविंद भताने यांनी घेतली लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची भेट

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

डॉ. गोविंद नागनाथ भताने (संस्थापक, डॉ. भतानेज छाया फाऊंडेशन, जालना) यांनी लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांची त्यांच्या दिल्ली येथील २०, अकबर रोड, शासकीय निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली.

या भेटीदरम्यान डॉ. गोविंद भताने यांनी दंतवैद्यकीय क्षेत्रातील विविध समस्या व मागण्यांबाबतचे निवेदन लोकसभाध्यक्षांना सादर केले. तसेच देशातील आरोग्य व वैद्यकीय क्षेत्रातील विद्यमान अडचणी व त्यावरील उपाययोजना यावरही सविस्तर चर्चा झाली.

लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांनी सकारात्मक प्रतिसाद देत या मागण्या त्वरित केंद्रीय आरोग्यमंत्री, भारत सरकार यांच्याकडे पाठविण्याचे आश्वासन दिले.

यावेळी डॉ. भताने यांनी छाया फाऊंडेशनच्या कार्याचा आढावा देणारे विशेष पुस्तक सादर करून माननीय अध्यक्षांचा सन्मान केला. ओम बिर्ला यांनी फाऊंडेशनच्या सामाजिक उपक्रमांचे कौतुक करत डॉ. भताने यांना आगामी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

छाया फाऊंडेशनतर्फे शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण, पर्यावरण संवर्धन अशा विविध क्षेत्रांत सातत्याने उपक्रम राबवले जातात. या कार्याचा गौरव लोकसभाध्यक्षांकडून झाल्याने हा अभिमानास्पद क्षण असल्याचे डॉ. भताने यांनी नमूद केले.

तसेच या वेळी माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, माजी आमदार कैलाशशेठ गोरंट्याल व भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी डॉ. भताने यांचे अभिनंदन करून छाया फाऊंडेशनच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## युरेका फोर्ब्सच्या साहाय्याने श्रद्धा कपूर घर चकाचक करते

छत्रपती संभाजीनगर : घराचे आरोग्य आणि स्वच्छतेतील एक विश्वासार्ह नाव असलेल्या युरेका फोर्ब्सने अभिनेत्री श्रद्धा कपूरच्या साहाय्याने फोर्ब्स स्मार्टक्लीन रोबोटिक व्हॅक्यूम क्लीनरसह एक नवीन मोहीम सुरू केली आहे. तांत्रिकदृष्ट्या प्रगत असलेले हे उपकरण फोर्ब्स स्मार्टक्लीन रोबोटिक व्हॅक्यूम क्लीनर्स कमी प्रयत्नांमध्ये ९९.९% घाण काढून टाकतात आणि जमीन पुसूनही घेतात. या जाहिरातीत श्रद्धा कपूर 'चकाचक स्वच्छ जीवनाच्या' आवश्यकतेसोबतच आधुनिक उपकरणांच्या साहाय्याने ते कसे सहज सोपे आणि आनंददायी आहे हे सांगते. केवळ फोनवरील एक ॲप आणि फोर्ब्स स्मार्टक्लीनने घरे आता कशी लक्ख चमकू शकतात हे ती दाखवते. बऱ्याच काळापासून असलेले डाग स्वच्छ करण्यापासून ते जिथे पोहोचता येत नाही अशा कोपऱ्यातला कचरा साफ करणे, सोफ्याखालील स्वच्छता, पाळीव प्राण्यांचे पडणारे केस आणि अगदी लादी पुसणे अशा सगळ्या गोष्टी या स्मार्ट क्लीनच्या साहाय्याने चुटकीसरशी होतात. घर 'चकाचक' ठेवणे म्हणजे काय हे या उपकरणामुळे लक्षात येते.

## देशभरात कर्करोगाची लवकर तपासणी आणि जनजागृतीसाठी संजीवनी २०२५ मोहीम सक्रिय

मुंबई : भारतात कर्करोगाचे प्रमाण झपाट्याने वाढत असल्याने या संकटाला सामोरे कसे जावे, या विषयावर चर्चा करण्यासाठी फेडरल बँक हॉरमिस मेमोरियल फाउंडेशन, न्यूज१८ नेटवर्क आणि ज्ञानसहभागी टाटा ट्रस्ट्स यांच्या संयुक्त विद्यमाने संजीवनी राष्ट्रीय परिषद नुकतीच आयोजित करण्यात आली. परिषदेच्या या तिसऱ्या पर्वात आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञ, शासन, स्वयंसेवी संस्था आणि खासगी क्षेत्र यांच्या प्रतिनिधींनी भाग घेतला. २०२५ या वर्षभरात देशातील कर्करोग रुग्णांची संख्या १५.७ लाखांवर जाण्याचा अंदाज आहे. त्यातील सुमारे ७० टक्के रुग्णांचे निदान अजूनही उशिराच्या टप्प्यावरच होत असल्याने, या परिषदेचा केंद्रबिंदू जागरूकतेपलीकडे जाऊन वेळेवर कृती करण्यावर होता. संजीवनी मोहीम गेल्या सातशेहून अधिक दिवसांमध्ये अधिक प्रभावी आणि बहुआयामी झाली आहे.

## ज़ाइस व्हिजन सेंटर चे उद्घाटन

पुणे : १७८+ वर्षांच्या समृद्ध वारशासह ऑप्टिक्स व ऑप्टोइलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील जागतिक अग्रणी ज़ाइस ने मित्तल ऑप्टिक्सच्या सहयोगाने पुण्यात ज़ाइस विज़न सेंटर चे उद्घाटन केले. या महत्त्वपूर्ण उद्घाटनाद्वारे ज़ाइस इंडिया पुणेकरांसाठी अत्याधुनिक व प्रीमियम डोळ्यांच्या आरोग्याची उपाययोजना आणण्याच्या आपल्या वचनबद्धतेला अधोरेखित करते.बाणेर येथील सॉलिटेअर बिझनेस हबमध्ये पसरलेल्या १३०० चौरस फूटाच्या या केंद्रामध्ये ग्राहकांना अत्याधुनिक नेत्रसंपदा अनुभव मिळणार आहे. ज़ाइस विज़न सेंटर मध्ये प्रीमियम फ्रेम्सची निवड असून, ज़ाइस व्हिसुफिट १००० च्या मदतीने अचूक ३ऊ डिजिटल सेंट्रेशन व ज़ाइस व्हिस्कोअर ५०० द्वारे जलद व अचूक रिफ्रॅक्शन केले जाईल. यामुळे तज्ज्ञ टीमला प्रत्येक ग्राहकाच्या आवश्यकतांनुसार वैयक्तिक लेन्स सोल्युशन्स तयार करता येतात.

## कॅमरी हायब्रिड इलेक्ट्रिक वेईकल - स्प्रिंट एडिशन लाँच

छत्रपती संभाजीनगर : टोयोटा किर्लोस्कर मोटर प्रा. लि. (टीकेएम) ने आज त्यांच्या प्रतिष्ठित लक्झरी हायब्रिड इलेक्ट्रिक सेदानची स्पोर्टीयर व अधिक गतीशील व्हर्जन 'कॅमरी हायब्रिड इलेक्ट्रिक वेईकल - स्प्रिंट एडिशन' लाँच केली. आकर्षक ड्युअल-टोन एक्स्टीरिअर, मॅट ब्लॅक सुधारणा आणि विशेष स्पोर्ट्स किट* असलेल्या या नवीन व्हेरिएण्टमध्ये गतीशील आकर्षकतेसह सुधारित कार्यक्षमता आहे. कॅमरी स्प्रिंट एडिशनमधून उत्साही परसोना दिसून येते, जी स्पोर्टी आकर्षकतेमध्ये धमाल ड्रायव्हिंगचा आनंद घेण्याची इच्छा असलेल्यांसाठी डिझाइन करण्यात आली आहे.

## टोयोटा अर्बन क्रूझर टायझर आता नवीन रंगात उपलब्ध

मुंबई : टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज त्यांच्या लोकप्रिय कॉम्पॅक्ट एसयूव्ही अर्बन क्रूझर टायझरमध्ये दोन महत्त्वपूर्ण अपग्रेडची घोषणा केली. कंपनीने एक नवीन ब्लूश ब्लॅक बाह्य रंग सादर केला आहे आणि सर्व प्रकारांमध्ये मानक म्हणून सहा एअरबॅग्ज जोडल्या आहेत. टोयोटाने नेहमीच आपल्या ग्राहकांना सर्वोच्च मूल्य दिले आहे आणि शक्य तितक्या सर्वोत्तम कार देण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. एक नवीन आकर्षक लूक: ब्लूश ब्लॅक सादर करत आहे टायझरचे गतिमान आणि तरुण आकर्षण वाढवत, टोयोटा किर्लोस्कर मोटरने निवडक प्रकारांमध्ये एक नवीन ब्लूश ब्लॅक बाह्य रंग सादर केला आहे. हा प्रीमियम शेड एसयूव्हीची रस्त्याची उपस्थिती आणखी वाढवतो, ग्राहकांना एक ताजेतवाने पर्याय देतो जो सुंदरता आणि स्पोर्टी लूकचे परिपूर्ण मिश्रण देतो. हा नवीन रंग ग्राहकांच्या बदलत्या जीवनशैलीबद्दल आणि कॉम्पॅक्ट एसयूव्ही खरेदीदारांमध्ये वैयक्तिकरणाची वाढती मागणी याबद्दल टोयोटाची समज प्रतिबिंबित करतो.

## मेडिकव्हर हॉस्पिटल्स छत्रपती संभाजीनगरने स्वातंत्र्य दिन साजरा केला १,९४७ च्या विशेष आरोग्य पॅकेजसह


छत्रपती संभाजीनगर : मेडिकव्हर हॉस्पिटल्स,छत्रपती संभाजीनगर, भारताच्या स्वातंत्र्याच्या वर्षाचा सन्मान करत १,९४७ च्या प्रतिकात्मक किमतीत ऑफर केलेल्या विशेष मल्टी-स्पेशालिटी हेल्थ पॅकेजसह भारताचा ७८ वा स्वातंत्र्य दिन साजरा करत आहे.मेडिकव्हर हॉस्पिटल्स छत्रपती संभाजीनगर चे डॉ. दीपेन शाह म्हणाले, स्वातंत्र्य दिन हा स्वातंत्र्याचा उत्सव आहे आणि चांगले आरोग्य हा संपूर्ण जीवन जगण्याचा खरा पाया आहे. आमचे १,९४७ चे पॅकेज हे स्वातंत्र्य मिळालेल्या वर्षाचे प्रतीकात्मक श्रद्धांजली आहे आणि लोकांना प्रतिबंधात्मक आरोग्याला प्राधान्य देण्याची आठवण करून देते.हा उपक्रम मेडीकव्हर हॉस्पिटल्सच्या दर्जेदार आरोग्यसेवा अधिक सुलभ बनवण्याच्या आणि छत्रपती संभाजीनगरच्या लोकांना निरोगी जीवनासाठी वेळेवर पावले उचलण्यास प्रोत्साहित करण्याच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंबित करतो.

## वेंट्रिक्युलर टाकीकार्डिया आणि अचानक हृदयविकाराचा झटका ह्यांचा संबंध नेमका काय?

नाशिक - नाईन पर्ल्स हॉस्पिटलचे डॉ. शीतल कुमार हिरण स्पष्ट करतात अचानक हृदयविकाराचा झटका ज्याला इंग्लिश मधे सडन कार्डियक अरेस्ट किवा एससीए म्हणतात. ही एक जीवघेणी आणीबाणी आहे जी कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय येऊ शकते, ज्यामुळे हृदय अचानक थांबते. जरी ते अनेकदा हृदयविकाराचा झटका हा रक्तपुरवठा च्या कमतरतेमुळे होतो असे समजले जात असले तरी, एससीए वेगळे आहे. हृदयाची लय सायनोएट्रियल (एसए) नोड नावाच्या नैसर्गिक पेसमेकरद्वारे नियंत्रित केली जाते, जी विद्युत सिग्नल पाठवते ज्यामुळे हृदय समन्वित पद्धतीने आकुंचन पावते.

## ईव्ही क्रांतीला नवी चालना

सातारा - भारतातील आघाडीच्या इलेक्ट्रिक दुचाकी उत्पादकांपैकी एक असलेल्या प्युअर ईव्ही ने आज सातारामध्ये आपल्या नवीन शोरूमचे भव्य उद्घाटन जाहीर केले आहे. ही रणनीतिक विस्तार योजना दक्षिण भारतात प्युअर ची उपस्थिती मजबूत करण्याच्या मिशनमध्ये एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे.हे नवीन शोरूम प्र.क्र. २३१५, एम.जे. प्लाझा, गणेश चौक, रहीमतपूर रोड, कोडोली, सातारा, महाराष्ट्र येथे स्थित असून, येथे ईप्लुटो ७जी मॅक्स, ईट्रिस्ट एक्स यांसारख्या लोकप्रिय इलेक्ट्रिक दुचाकींची संपूर्ण श्रेणी उपलब्ध असणार आहे. साताऱ्यातील नागरिकांसाठी प्युअर ईव्ही एक अद्वितीय आणि पर्यावरणपूरक वाहन चालविण्याचा अनुभव घेऊन येत आहे.



## राधाबाई इंगळे यांचे निधन

सोयगाव,दि.२३ ऑगस्ट - आमखेडा-आमराई येथील रहिवाशी राधाबाई भिका इंगळे (वय.९५) यांचे दि.२३ शनिवार रोजी मध्यरात्री २:०० वाजता वृध्दापकाळाने निधन झाले.त्यांचेवर दुपारी २:०० वा.सोयगाव येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात,दोन मुले,दोन मुली,सुना,नातवंडे,असा परिवार आहे.गणपत इंगळे यांच्या त्या आई होत.

# माओवादाची शहरी केंद्रे राष्ट्रीय सुरक्षेला धोका -प्रफुल्ल केतकर

पुणे, दिनांक २२ ऑगस्ट २०२५ : लोकशाही व्यवस्थांवरील विश्वास उडवणारा माओवाद आता शैक्षणिक संस्थांपासून राजकीय पक्षांपर्यंत येऊन पोहोचला आहे. येत्या काळात माओवादाची शहरी केंद्रेच राष्ट्रीय सुरक्षेला सर्वात मोठा धोका आहेत, असे परखड मत ऑर्गनायझरचे संपादक प्रफुल्ल केतकर यांनी पुण्यात व्यक्त केले.



फर्ग्युसन महाविद्यालयातील म्फी थिएटरमध्ये आयोजित देवर्षी नारद माध्यम पुरस्कार प्रदान कार्यक्रमात 'प्रसार माध्यमे आणि राष्ट्रीय सुरक्षा' या विषयावर ते बोलत होते. विश्व संवाद केंद्र आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या वतीने पश्चिम महाराष्ट्र प्रांतातील माध्यम क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या माध्यमकर्मींचा सन्मान करण्यात येतो. यंदा ज्येष्ठ पत्रकार पुरस्काराने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता (डीन) आणि वृत्तपत्र विभागाचे प्रमुख डॉ. संजय तांबट यांना सन्मानित करण्यात आले. तसेच आश्वासक पत्रकारितेसाठी माध्यम छायाचित्रकार प्रशांत खरोटे, बातमीदार सतीश वैजापूरकर आणि आरजे शोनाली यांना तर समाजमाध्यमातील डिजिटल लिट्रसी संदर्भातील आशय निर्मितीसाठी मुक्ता चैतन्य यांना सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाला व्यासपीठावर केंद्राचे अध्यक्ष अभय कुलकर्णी, उपाध्यक्ष राजेंद्र पाटील, डीईएसचे उपाध्यक्ष ड. अशोक पलांडे, संचालक मिलिंद कांबळे उपस्थित होते.

राष्ट्रीय सुरक्षा ही केवळ सीमा किंवा राज्याच्या सुरक्षिततेशी निगडित राहिलेली नाही, तर ती अंतर्गत धोक्यांशीही निगडित आहे, असे मत श्री. केतकर यांनी व्यक्त केले. ते म्हणाले, राष्ट्रीय सुरक्षेचे परिदृश्य पूर्णतः बदलले आहे. लोकशाहीवरचा विश्वास खिळखिळा करण्यासाठी 'डेमोक्रॅटीक स्पेस'चाच वापर करण्यात येतो आहे. म्हणूनच शहरी माओवाद हा राष्ट्रीय सुरक्षेला सर्वात मोठा धोका असल्याचे डॉ. मनमोहन सिंग यांनी देखील सांगितले होते. चांगल्या पत्रकारितेसाठी राष्ट्रीय दृष्टी विकसित करणे ही पूर्वअट असल्याची ठाम भूमिका त्यांनी मांडली.

पुरस्कारार्थींच्या वतीने डॉ. संजय तांबट यांनी मनोगत मांडले. ते म्हणाले, पत्रकाराची सामाजिक, वैचारिक आणि कौटुंबिक पार्श्वभूमी कोणतीही असली तरी तो माध्यम संस्थेचा पत्रकार असतो. त्याच्या वाट्याला येणाऱ्या भूमिका तो प्रामाणिकपणे करतो. म्हणूनच पत्रकारिता हा धर्म आहे. पुरस्काराचे उत्तरदायित्व म्हणून पत्रकारितेतील भारतीय ज्ञान परंपरांचा अभ्यास आम्ही करू, असेही ते म्हणाले. राष्ट्रासाठी हितकारक गोष्टी माध्यमांमध्ये रुजविण्याचे कार्य विश्व संवाद केंद्र करत असून, माध्यमांनीही राष्ट्रीय सुरक्षेचा विचार गंभीरपणे करायला पाहिजे, असे मत अभय कुलकर्णी यांनी प्रस्तावनेत व्यक्त केले.

ॲड. अशोक पलांडे म्हणाले, समाजाची दिशा ठरविण्याचे कार्य आजची पत्रकारिता करत आहे. त्यामुळे पत्रकारितेला तथ्यांबरोबरच नीती असली पाहिजे. पत्रकारितेत राष्ट्रहिताचे भान असले पाहिजे. सांस्कृतिक वार्तापत्राच्या जनगणना विशेषांकाचे प्रकाशन यावेळी करण्यात आले. वार्तापत्राचे संपादक मिलिंद शेटे यावेळी उपस्थित होते. सूत्रसंचालन वसुंधरा काशीकर यांनी केले. तर नारदस्तवन आणि पसायदान दीपा भंडारे यांनी सादर केले. आभार मिलिंद कांबळे यांनी मानले.

**आध्यात्मिक लोकशाही हा भारतीयत्वाचा आधार - प्रफुल्ल केतकर**

भारत एक चिरंतन सनातन राष्ट्र आहे. त्याची एक विश्वदृष्टी असून, काही एक मूलभूत मुल्य आहेत. त्यांचे रक्षण करणे म्हणजे राष्ट्रीय सुरक्षा आहे, असे प्रतिपादन प्रफुल्ल केतकर यांनी केले. ते म्हणाले, भारताच्या रक्षणाचा मूलभूत आधार केवळ राजकीय, सामाजिक किंवा आर्थिक लोकशाही नाही. तर आध्यात्मिक लोकशाही आहे. जो पर्यंत भारताचे भारतीयत्व आहे, राष्ट्रीयत्व आहे. तो पर्यंत भारतामध्ये प्रत्येकाला आपला ईश्वर निवडण्याचा अधिकार आहे.

## ध्येय निश्चितीनेच यशाची वाट - न्यायाधीश वि. द. पाटील यांचे मार्गदर्शन

तभा वृत्तसेवा

कन्नड:- दि.२३ ऑगसग - कन्नड तालुका विधी सेवा समितीच्या वतीने कॉमन मिनिमम प्रोग्राम अंतर्गत देवगाव रंगारी येथील श्री गणेश कनिष्ठ महाविद्यालयात दि.२३ रोजी कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कन्नड न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश वि. द. पाटील होते.



अध्यक्षीय भाषणात पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, यशस्वी होण्यासाठी ध्येय निश्चित करणे अत्यावश्यक आहे. हतबल न होता सकारात्मक विचार करणे गरजेचे आहे. मोबाईलवर कमी वेळ घालवून वाचनाची सवय लावल्यास व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. दहावी-बारावीचे गुणच यश-अपयश ठरवत नाहीत. प्रवेश परीक्षांवर लक्ष केंद्रीत करणे महत्त्वाचे आहे.

यावेळी त्यांनी नाल्सा/माल्सा तसेच तालुका विधी सेवा समिती अंतर्गत राबवल्या जाणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना दिलखुलास उत्तरे देत विविध उदाहरणेही दिली. या कार्यक्रमाला कन्नड तालुका वकील संघाचे अध्यक्ष ॲड. यु. ए. वारे, ॲड. एस. ई. धनेधर, ड. एस. ए. शिरसे, देवगाव रंगारी पोलीस ठाण्याचे स. पो. नि. संदीप राजपूत, प्राचार्य पांडे, शिक्षकवर्ग आदी उपस्थित होते. कार्यक्रमात ॲड. वारे यांनी पॉक्सो कायद्याबाबत, तर स. पो. नि. राजपूत यांनी रॅगिंग विरोधी कायदे व वाहतूक नियमांबाबत मार्गदर्शन केले. प्रास्ताविक ॲड. शिरसे यांनी केले, सूत्रसंचालन ॲड. धनेधर यांनी केले. शेवटी प्राचार्य पांडे यांनी आभार मानले.

## सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता राजेंद्र बोरकर उत्कृष्ट अभियंता म्हणून सन्मानित



पैठण दि २३ :- पैठण तालुक्यातील पाचोड येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता राजेंद्र बोरकर यांना स्वातंत्र्य दिनी उत्कृष्ट अभियंता म्हणून सन्मानित करण्यात आले, जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते त्यांना गौरवण्यात आले. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद येथे १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहिम राबवण्यात आली, या मोहिमेचा दुसरा टप्पा निवड झालेल्या कार्यालयांना प्रशस्तीपत्र देऊन पार पडला, या कार्यक्रमात सामाजिक न्याय मंत्री तथा पालकमंत्री संजय शिरसाट, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर उपस्थित होते. राज्यातील १२ हजार ५०० शासकीय कार्यालयांमध्ये ही मोहिम यशस्वीपणे राबवण्यात आली, औरंगाबाद विभागातून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उप अभियंता गटात पैठण येथील कार्यालय प्रथम क्रमांकाने निवडले गेले. राजेंद्र बोरकर यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला, खासदार संदिपान भुमरे, आमदार विलास भुमरे आणि मुख्य अभियंता यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## माय भारत यांच्या पुढाकाराने - लाखेगाव शाळेत वृक्षारोपण व चित्रकला स्पर्धा

बिडकीन दि २३ ऑगस्ट पैठण तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, लाखेगाव तालुका पैठण येथे युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांची स्वायत्त संस्था मेरा युवा भारत, छत्रपती संभाजीनगर व टुगेदर फॉर विकास फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने एक पेड माँ के नाम २.० या उपक्रमांतर्गत वृक्षारोपण व चित्रकला स्पर्धे



चे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन जिल्हा युवा अधिकारी मेघा सनवाल मॅडम यांच्यामार्गदर्शनाखाली झाले. शाळेच्या प्रागणात विविध जातींची झाडे लावण्यात आली.

चित्रकला स्पर्धेत प्रथम क्रमांक रेणुका विजय साबळे, द्वितीय क्रमांक आरती संतोष चरांडे तर तृतीय क्रमांक श्रावणी मदनसिंग मुऱ्हाडे यांनी पटकावला. विजेत्यांना प्रमाणपत्र व शालेय साहित्य भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.या वेळी चव्हाण सर, संगीता पाटील यांच्यासह शिक्षकवृंद उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी टुगेदर फॉर विकास फाउंडेशनच्या स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

## सांगितिक कार्यक्रमाचे आज आयोजन

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी - श्री एकनाथ संशोधन मंदिर, खडकेश्वर ही संस्था अमृत महोत्सवी वर्षात पर्दापण करीत असून त्यानिमित्ताने श्री एकनाथ महाराजांच्या भारूडांवर आधारित सांगितिक कार्यक्रमाचे आयोजन रविवार, दि.२४ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत गोविंदभाई श्रॉफ ललित कला अकादमी औरंगपुरा येथे आयोजित करण्यात आला आहे. यावेळी डॉ.भावार्थ देखणे (आळंदी - पुणे) हे सांगतिक कार्यक्रमाचे सादरीकरण करणार आहेत. तरी सर्व भाविकांनी बहुसंख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन अध्यक्ष अतुल कुलकर्णी व सचिव श्यामल भोगले यांनी केले आहे.

## बुलडाणा अर्बन कर्मचारी गणेशोत्सव मंडळची कार्यकारिणी जाहीर

### कार्यकारणीवर संजयकुमार मुरलीधर राजगुरे अध्यक्ष तर उपाध्यक्षपदी प्रशांत श्रीराम काळवाघे निवड

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२३ ऑगस्ट

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी बुलडाणा अर्बन परीवाराकडून बुलडाणा अर्बन कर्मचारी गणेशोत्सव मंडळाची स्थापना करण्यात आली असून,मंडळाचे वतीने दरवर्षी गणेश उत्सवानिमित्त विविध सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

बुलडाणा अर्बन मंडळाचे यावर्षी २४ वे असून यावर्षी २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर या कालावधीत गणेशोत्सव साजरा करण्यात येणार आहे.गणेश उत्सावानिमित संस्थेने गणेश उत्सव मंडळाचे प्रमुख मार्गदर्शक संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक उपाख्य भाईजी,



बुलडाणा अर्बन संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुकेश झंवर आणि बुलडाणा अर्बन चॅरिटेबल सोसायटीच्या अध्यक्षा कोमलताई सुकेश झंवर,अनंताभाऊ देशपांडे,संस्थेचे सरव्यवस्थापक कैलास बन्सीलाल कासट यांच्या मार्गदर्शनाखाली निवड करण्यात आली.

गणेश मंडळाची कार्यकारिणी जाहीर अध्यक्ष संजयकुमार राजगुरे,उपाध्यक्षपदी प्रशांत काळवाघे,सचिवपदी श्रीकांत जोशी,सहसचिव संजय भागवत,कोषाध्यक्ष अनिल देशपांडे, सहकोषाध्यक्ष कैलास निकम,तर सदस्य सर्वश्री रविंद्र कुलकर्णी,सचिन शास्त्री,विजय डोंगरे,अजय तातेड,नरेंद्र शर्मा,अनिल महाले,अजय क ऱ्हाळे,विक्रांत सराफ,संजय पाठक,निलेश बनसोडकर,अरुण देशपांडे,मंगेश बनसोड, प्रशांत घुसळकर,अनिल महाले,सुधाकर मानवतकर,प्रशांत भराड,परमेश्वर शिंदे,महेश गायगोळ,लक्ष्मीकांत वारे,प्रिती कोलारकर,वर्षा खेर्डीकर,सुनिता जाधव,यांचा समावेश आहे.बुलडाणा अर्बन कर्मचारी गणेशोत्सव मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या विविध सांस्कृतिक कार्यक्रम व स्पर्धांचा लाभ शहर व परिसरातील नागरिकांनी घ्यावा,असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष संजयकुमार राजगुरे,सचिव श्रीकांत जोशी व गणेशोत्सव मंडळ कार्यकारिणी सदस्यांनी केले आहे.

संस्थेच्या मुख्य कार्यालयात दि.१४ ऑगस्ट २५ गुरुवार रोजी श्रींचे मंडप पूजन,तर संस्थेच्या मुख्य कार्यालयात दिं. २७ ऑगस्ट बुधवार रोजी मूर्ती स्थापना.गोवर्धन इमारतीमधील हॉल येथे दि.२८ ऑगस्ट २५ गुरुवार अथर्वशीर्ष पठण/उपासना .दि.२९ ऑगस्ट २५ शुक्रवार रोजी सायंकाळी ७ वाजता सहकार विद्या मंदिर, बुलडाणा चे सांस्कृतिक भवन.येथे चला हवा येऊ द्या चा हास्य व मनोरंजनात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे.

## अजिंठा येथे पोळा सण उत्साहात साजरा !

अजिंठा २३ ऑगस्ट - अजिंठा परिसरात शुक्रवारी ५ : ३० वाजता बैल पोळा सण उत्साहात साजरा करण्यात आला. अल्प पाऊस, पीक परिस्थतीही समाधानकारक नसून शेतकऱ्यांचा अतिशय जिव्हाळ्याचा सण . वर्षभर शेतात धान्यसाठी राबणाऱ्या तसेच आपला खराखुरा सोबती असलेल्या बैलराजाचा पोळा सण उत्साहात साजरा केला. अजिंठा येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही सराय येथे पोळा भरला होता . पोळ्याच्या पूर्वसंध्येला बैलांना आंघोळ करून त्यांना वेगवेगळे रंग लावून रंगवले होते. ढोल - ताशांच्या गजरात मिरवणुक काढली होती.शेतकरी आपल्या बैलांना सजवून सराय येथे पोळ्यात घेऊन आल्यानंतर परंपररानुसार मल्लू भैय्या लाल चौधरी, आणि विशाल देशमुख यांच्या हस्ते सर्वप्रथम मानाची बैलाची पूजा करण्यात आली. तसेच परंपरागत सराय येथे तोरण बांधण्यात आले होते. बैलाची पुजा अर्चा करून प्रसाद वाटून तोरण तोडून पोळा फोडण्यात आला.

## सोयगाव तालुक्यातील वेताळवाडी गावात हिंदू-मुस्लिम एकतेचा पोळा सण साजरा

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२३ ऑगस्ट

अजिंठ्याच्या डोंगर रांगांच्या पायथ्याशी असलेल्या वेताळवाडी गावात शुक्रवारी हिंदू-मुस्लिम एकतेचे दर्शन घडवून पोळा सण उत्साहात साजरा करण्यात आला. मुस्लिम बांधवांनीही पोळा सण साजरा करत गावाची परंपरा जोपासली आहे.या हिंदू-मुस्लिम एकतेच्या पोळा सणाचे तालुकभर



कौतुक होत आहे.

वेताळवाडी गावात वेशीबाहेर तोरण बांधून पोळा सण साजरी करण्याची परंपरा आहे. गावचे पोलीस पाटील श्रीराम जाधव यांनी गावात हिंदू-मुस्लिम एकतेचे दर्शन घडवून पारंपरिक पोळा साजरा करण्यासाठी पुढाकार घेतला.यावेळी मुस्लिम बांधवांनीही पोळा सणात पुढाकार घेत हिंदू-मुस्लिम एकतेचे दर्शन दाखवून दिले.त्यामुळे जिल्हाभर वेताळवाडी हिंदू-मुस्लिम एकतेच्या पोळा सणाची चर्चा सुरू आहे.पोलीस पाटील श्रीराम जाधव,महम्मद कासम,युनूस पठाण,सुरेश जाधव,इसाक शहा,लतीफ पठाण,विष्णू जाधव,प्रकाश इंगळे, प्रकाश बारोड आदींनी गावात पुढाकार घेतला.

**उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी,**
**छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**

E mail-sdmabad@gmail.com Landline No-0240-2324100

जा क्र २०२४/एम.ए.जी./सी आर-१०३९ दिनांक २८/०६/२०२४

**जाहीर प्रगटन**

अर्जदारः- सय्यद अतहर अहमद

विरुध्द

गैरअर्जदारः उपनिबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी विभाग, महानगर पालिका, छत्रपती संभाजीनगर

विषयः- जन्म मृत्यु अधिनियम १९६९ सुधारीत अधिनियम २००० चे कलम १३ (३) अन्वये अर्ज

संदर्भः- श्री/श्रीमती. सय्यद अतहर अहमद, रा.फ्लॅट नं. ८, सफा कॉम्प्लेक्स, काला दरवाजा, छत्रपती संभाजीनगर यांचा अर्ज दिनांक १८.०६.२०२४

विषयांकीत प्रकरणी अर्जदार यांनी ॲड. यांचेमार्फत या न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम १९६९ चे सुधारीत अधिनियम २००० चे कलम १३ (३) अन्वये अर्जदार यांचे स्वतः नामे सय्यद अतहर अहमद यांचा दिनांक ३०.११.१९६८ रोजी राहते घरी, घर नं.४-११-३६, सीमा दुध डेअरीच्या बाजुला, रोशन गेट, छत्रपती संभाजीनगर येथे जन्म झालेला असून जन्म नोंद जन्म नोंदवहीत घेण्यासाठी या न्यायालयाचे आदेश मिळण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे.

अर्जदार यांचे स्वतः नामे सय्यद अतहर अहमद यांची. जन्म नोंद नसल्याबाबत उपनिबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी विभाग, महानगर पालिका, छत्रपती संभाजीनगर यांचा दाखला सादर केलेला आहे.

सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व गैरअर्जदार व जनतेस सुचित करण्यात येते की, अर्जदाराचे स्वतः नामे सय्यद अतहर अहमद यांचा जन्म दिनांक ३०.११.१९६८ रोजी राहते घरी, घर नं.४-११-३६, सीमा दुध डेअरीच्या बाजुला, रोशन गेट, छत्रपती संभाजीनगर येथे झाला असून अर्जदार यांचे स्वतः यांचे जन्म प्रमाणपत्र जारी करण्यास जर कुणाचा काही उजर/आक्षेप/हरकत / तक्रार असेल तर त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर/आक्षेप/ हरकत/तक्रार मुळ कागदपत्रांसह उपविभागीय दंडाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कार्यालय, आलमगीर कॉलनी, जिल्हाधिकारी कार्यालय परीसर, छत्रपती संभाजीनगर येथे नांव, संपुर्ण पत्ता व संपर्क क्रमांक स्पष्ट नमुद करुन लेखी स्वरुपात नोंदवावा. मुदतीनंतर आलेला उजर / आक्षेप / हरकत / तक्रार ग्राहय धरली जाणार नाही तसेच अर्जदारांचे जन्म प्रमाणपत्रासाठीचा आदेश नियमाप्रमाणे देण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

सदर जाहीर प्रगटन माझ्या सही व शिक्क्यानिशी दिनांक २८/०६/२०२४ रोजी देण्यात आले.

दिनांक २८/०६/२०२४

ठिकाण :- छत्रपती संभाजीनगर.

**उप-विभागीय अधिकारी,**
**छत्रपती संभाजीनगर करीता**

# शिवाजी नागरी बँकेची वार्षिक सभा संपन्न

तभा वृत्तसेवा

पैठण दि २३ : शिवाजी नागरी सहकारी बँक पैठण ची ३६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बँकेचे अध्यक्ष रवींद्र शिवाजीराव काळे यांच्या अध्यक्ष तेखाली माहेश्वरी भक्त निवास येथे मोठ्या उत्साहात पार पडली.



प्रथम छत्रपती शिवाजी महाराज व पैठण चे माजी आमदार तथा शिवाजी नागरी सहकारी बँकेचे संस्थापक अध्यक्ष स्व. शिवाजीराव काळे यांच्या प्रतिमेस अभिवादन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला व दीप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी सर्व सभासद यांचा सत्कार संचालक मंडळ यांच्या वतीने करण्यात आला.मागील सभा इतिवृत्तांत बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ई आय पठाण यांनी वाचून दाखवला.

यावेळी व्हा. चेअरमन भाऊसाहेब पा. औटे, हरिपंडित गोसावी, पाशा धांडे, रामचंद्र काळे, अशोक जाधव, शाम लोहिया, राजेंद्र टेकाळे, पृथ्वीराज चौहान, दशरथ सोनवणे,अरुण नरवडे, कारभारी लोहकरे, राजेंद्र धरपळे, सौ. तनुजा जाधव, किशोर वैद्य, दत्तात्रय फटांगडे, गणेश शिलवंत (सी ए) यावेळी विशेष उपस्थिती म्हणून, छत्रपती संभाजीनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे व्हा. चेअरमन किरण पा. डोणगावकर, प्रेरणा नागरी सहकारी बँकेचे चेअरमन .जगनाथ काळे व भाऊसाहेब जगताप यांचा बँकेच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी श्रीमती मंगलबाई शिवाजीराव काळे, सतीश बलदवा, सुभाष परदेशी सह शहरातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी ई. आय. पठाण, उप मुख्य कार्यकारी अधिकारी जी. व्ही. म्हस्के, विजय पोषणगीर, सुधाकर शिंदे, विलास डफळ, बाळू दसपुते, कृष्णा काकडे, ईश्वर ढोकळे, रत्नदीप मुळे, सौ. रेवती राजनिकर, पवन काळे, जगदीश गोर्डे, किशोर धोकटे, कडुबाल कोरडे, अमोल काळे, आबेद पठाण, भाऊसाहेब कणसे, आशिष पवार, फौजदार जाधव, अन्सार सय्यद, भगवान तांबे,सलीम शेख आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष राऊत यांनी केले व आभार प्रदर्शन हरिपंडित गोसावी यांनी मानले.

संपादकीय

तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# वाहून गेलेले पावसाळी अधिवेशन

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाचे सूप वाजले म्हणण्यापेक्षा विरोधकांच्या गदारोळामुळे हे संपूर्ण अधिवेशन वाहून गेले वा अधिवेशनावर पावसाने पाणी फेरले, असे म्हणावे लागेल. २१ जुलैला या अधिवेशनाची सुरुवात झाली आणि २१ ऑगस्टला हे अधिवेशन संपले, पण यात जनतेच्या जिव्हाळ्याच्या आणि राष्ट्रीय महत्त्वाच्या किती मुद्यांवर चर्चा झाली, याचा विचार केला तर एक मोठे शून्य समोर येते. संसदेच्या कामकाजावर दर मिनिटाला काही लाख रुपयांचा खर्च होत असतो, पण कामकाज न झाल्यामुळे हा सारा खर्च वाया जातो, याचाही विचार व्हायला पाहिजे. गेल्या काही वर्षांपासून संसदेच्या अधिवेशनात रोजच गदारोळ होणे हे ठरलेले आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहांत एकवेळ प्रश्नोत्तराचा तास होणार नाही, शून्य तास होणार नाही, पण गोंधळ आणि गदारोळ झाल्याशिवाय राहत नाही. गोंधळ आणि गदारोळ हा संसदेच्या कामकाजाचा कुळाचार झाला, असे म्हटले तर ते चूक ठरू नये. बरं गोंधळ हा फक्त लोकनिर्वाचित सभागृहात म्हणजे लोकसभेतच होतो असे नाही तर ज्येष्ठांचे सभागृह म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राज्यसभेतही होतो आणि हे करताना सर्व सांसदीय संकेत, मर्यादा आणि शिष्टाचार पायदळी तुडवला जातो. हा गोंधळ आणि गदारोळ किती व्हावा तर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना लाज वाटेल, एवढा असतो.

ऑपरेशन सिंदूरवर दोन दिवस दोन्ही सभागृहांत झालेली चर्चा वगळता या अधिवेशनाची एकही उपलब्धी सांगण्यासारखी नाही. काही विधेयके नाही म्हणायला पारित करण्यात आली, पण यातील एखाददुसरा अपवाद वगळता एकाही विधेयकावर व्यापक आणि सखोल चर्चा झाली नाही. विरोधी पक्षांच्या गदारोळात सरकारला ही विधेयके पारित करून घ्यावी लागली. विधेयकांवरील चर्चेत सरकारला घेरण्याची संधी विरोधी पक्षांनी गमावली, असे म्हटले तर ते चूक ठरू नये. आपण लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिरात बसलो आहोत, याचे भानही गोंधळ घालणारे काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांचे सदस्य ठेवत नाही. गुन्हा दाखल झालेल्या आणि ३० दिवसपर्यंत जामीन मिळू न शकलेल्या लोकप्रतिनिधीचे पद आपोआप रद्दबातल होण्याबाबतचे विधेयक गृहमंत्री अमित शाह लोकसभेत मांडत असताना काँग्रेस, तृणमूल काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांच्या सदस्यांनी कपडे घालून जो नंगानाच केला, ते पाहून देशातील समस्त लोकांची मान लज्जेने खाली झुकली. हेच आमचे लोकप्रतिनिधी आहे का, कशाला यांना आम्ही निवडून दिले, असा प्रश्न त्यांना पडला. सभागृहात पोस्टर्स घेऊन येणे अध्यक्ष तसेच सभापतींच्या आसनासमोरील मोकळ्या जागेत येऊन घोषणाबाजी करणे ही आता संसदेच्या दोन्ही सभागृहांतील विरोधी पक्षांच्या सदस्यांची नियमित प्रथा झाली आहे. विशेष म्हणजे अशी घोषणाबाजी करताना विरोधी पक्षांचे सदस्य सत्ताधारी बाजूला येतात. गृहमंत्री अमित शाह विधेयक मांडत असताना विरोधी पक्षांच्या सदस्यांनी त्यांच्यासमोरील माईक हिसकण्याचा प्रयत्न केला, भाजपा सदस्य अमित शाह यांच्या संरक्षणासाठी धावले नसते, त्यांनी सुरक्षाकडे केले नसते, तर विरोधी पक्षांच्या संतप्त सदस्यांनी शाह यांना सभागृहात धक्काबुक्की करायलाही मागेपुढे पाहिले नसते. मुळात या विधेयकात गैर काय आहे, ते विरोधी पक्षांच्या सदस्यांनी देशातील जनतेला सांगितले पाहिजे. या विधेयकाच्या कक्षेत सरकारने फक्त मुख्यमंत्री आणि राज्यांच्या मंत्र्याचाच समावेश केला नाही, तर पंतप्रधान आणि केंद्रीय मंत्र्यांनाही आणले आहे. त्यामुळे त्यामुळे उद्या विरोधी पक्षांच्याच नाही तर सत्ताधारी पक्षांच्या पंतप्रधानाने वा केंद्रीय मंत्र्याने चुकीचे काही केले तर त्यालाही त्याची किंमत चुकवावी लागेल, यात शंका नाही. याउपरही अमित शाह यांनी यासंदर्भातील घटनादुरुस्ती विधेयके सखोल आणि व्यापक चर्चेसाठी संयुक्त सांसदीय समितीकडे पाठवली आहेत. सरकारने आणखी काय करणे विरोधी पक्षांना अपेक्षित आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशनात लोकसभेत १२० तास कामकाज होणे अपेक्षित होते, प्रत्यक्षात ३७ तासच कामकाज झाले. कामकाजाची टक्केवारी ३७ होती. उत्तीर्ण होण्यासाठी ३५ टक्के गुण लागत असतात. त्याचा निकष लावला तर संसदेच्या कामकाजाच्या परीक्षेत सर्व खासदार काठावर उत्तीर्ण झाले, असे म्हणावे लागेल.

प्रश्नोत्तराच्या तासात ४५५ प्रश्नांवर चर्चा व्हायला पाहिजे होती, प्रत्यक्षात ५५ प्रश्नांचीच तोंडी उत्तरे देता आली. राज्यसभेची स्थितीही यापेक्षा वेगळी नाही. त्यामुळेच अधिवेशनाच्या समाप्तीची घोषणा करताना लोकसभेचे सभापती ओम बिर्ला आणि राज्यसभेचे उपाध्यक्ष हरिवंशनारायणसिंह यांना सदस्यांच्या वागणुकीवर तीव्र नाराजी व्यक्त करावी लागली, सदस्यांची कानउघाडणी करावी लागली. पण विरोधी पक्षांच्या सदस्यांवर त्याचा कोणताही परिणाम होईल, असे वाटत नाही. बिहारमधील स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन (सर) च्या मुद्यावर सभागृहात चर्चा घडवावी, अशी विरोधी पक्षांची मागणी होती, याच मुद्यावरून विरोधकांनी सभागृहाचे कामकाज बंद पाडले. निवडणूक आयोग ही घटनात्मक यंत्रणा आहे, तिच्या कार्यपद्धतीवर संसदेत चर्चा करणे योग्य ठरणार नव्हते, कारण या चर्चेतून होणाऱ्या आरोपांना संसदेत येऊन मुख्य निवडणूक आयुक्त उत्तर देऊ शकणार नव्हते, या तांत्रिक बाबीमुळे सरकार या मुद्यावर चर्चेला तयार नव्हते. आयोगाच्या कार्यपद्धतीबद्दल काही आक्षेप असतील तर विरोधकांनी न्यायालयात धाव घ्यायाला हरकत नाही. विरोधकांनी सरकारची ही बाजू समजून घ्यायला पाहिजे होती. मुळात संसदेच्या दोन्ही सभागृहांत गोंधळ घालून आपण काय साध्य केले, याचे आत्मपरीक्षण विरोधकांनी करायला पाहिजे. मुळात आपण विरोधक आहोत, म्हणून सरकारच्या सर्व गोष्टींना विरोध केलाच पाहिजे, गोंधळ घालून सभागृहाचे कामकाज बंद पाडलेच पाहिजे, असे नाही. संसदेचे कामकाज सुरू ठेवून विविध सांसदीय आयुधांचा वापर करत सरकारला घेरण्याचे कौशल्य विरोधकांनी दाखवणे अपेक्षित आहे. पण विरोधकांची संसदेच्या दोन्ही सभागृहांतील कृती देशातील सर्वसामान्य जनतेची निराशा करणारी म्हटली पाहिजे. हेचि फळ काय मम तपाला असे म्हणण्याची वेळ विरोधी पक्षातील काही गोंधळी सदस्यांनी जनतेवर आणली आहे.

काही वर्षांपूर्वी संसदेत एकापेक्षा एक संसदपटू होते. विशेष म्हणजे हे संसदपटू जसे विरोधी पक्षांत होते, तसेच सत्ताधारी पक्षातही होते. हे संसदपटू जेव्हा भाषणाला उभे राहात तेव्हा त्यांच्या शब्दांची परिणामकारकता एवढी असायची की सत्ताधारी पक्षाच्या पोटात गोळा फिरत असे. विरोधी पक्षांचे सदस्य सभागृहात आक्रमक व्हायचे, पण त्यात आक्रस्ताळेपणा नसायचा. सध्याच्या विरोधी पक्षांत आक्रमकता कमी आणि आक्रस्ताळेपणा जास्त दिसतो.

सभागृहात सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष यातील सौहार्द कमी झाल्यासारखे दिसते. सत्ताधारी पक्ष हा आपला शत्रू क्रमांक १ आहे, अशी विरोधी पक्षांची वागणूक असते. त्यामुळे भाषण करताना वा घोषणा देताना सभ्यपणा खुंटीला टांगून भाषेची मर्यादा ओलांडली जाते. पंतप्रधानपदाची गरिमा आणि प्रतिष्ठा विरोधी पक्षांनी राखली पाहिजे. तुम्हाला नरेंद्र मोदी नावाची ॲलर्जी असू शकते, पण ते देशाचे पंतप्रधान आहेत, लोकनेते आहेत, देशातील सर्वांत लोकप्रिय नेते आहेत, विशेष म्हणजे देशातील जनतेने सलग तीनदा निवडून देत त्यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवला आहे, याचे भान विरोधी पक्षांच्या सदस्यांनी ठेवले पाहिजे.

जनतेला खासदार निवडून देण्याचा जसा अधिकार आहे, तसा त्यांच्या कसोटीवर न उतरणाऱ्या खासदाराला परत बोलवण्याचा अधिकारही असला पाहिजे. या संदर्भातील मागणी अधूनमधून डोके वर काढत असते. पण आता या मागणीवर गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे. सरकार अनेक वेळा घटनादुरुस्ती करत असते, तर जनतेच्या अपेक्षांवर आणि कसोटीवर न उतरणाऱ्या खासदारांना परत बोलवण्याचा अधिकार सरकारने जनतेला घटनादुरुस्तीच्या माध्यमातून करून दिला पाहिजे. त्याचप्रमाणे एकेका खासदारावर सरकार दरवर्षी पगार आणि भत्यापोटी कोट्यवधी रुपये खर्च करत असते. ज्या दिवशी गोंधळामुळे संसदेचे कामकाज होणार नाही, त्या दिवसाचा पगार आणि भत्ता खासदारांना मिळणार नाही, अशी तरतूदही कायद्यात करण्याची वेळ आली आहे. त्याशिवाय गोंधळी खासदारांचे डोळे उघडणार नाहीत. .

## यंगिस्तान

# यांना बुद्धी दे गणनायका!

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि राजकीय वातावरणात सध्या एका छोट्या टिप्पणीने मोठा गदारोळ उडवला आहे. दिग्दर्शक विवेक अग्निहोत्री आणि त्यांच्या पत्नी अभिनेत्री पल्लवी जोशी यांनी 'कर्ली टेल्स' या युट्यूब चॅनलला दिलेल्या मुलाखतीत महाराष्ट्रीयन जेवणाबद्दल बोलताना वरण-भाताचा उल्लेख केला. ही मुलाखत ४४ मिनिटांची असून त्यातील १५ मिनिटांच्या आसपासचा भाग आता वादाचा केंद्रबिंदू बनला आहे. मात्र, माध्यमांनी या वक्तव्याचा चुकीचा अर्थ काढून द्वेष पसरवला, ज्यामुळे मराठी समाजात अनावश्यक प्रतिक्रिया उमटल्या. विवेक अग्निहोत्री दिल्लीचे रहिवासी असून त्यांना मसालेदार, स्पायसी जेवणाची सवय होती. पल्लवी जोशींसोबत लग्न झाल्यावर त्यांनी पहिल्यांदा महाराष्ट्रीयन जेवण चाखले. मुलाखतीत पल्लवी म्हणाल्या, 'महाराष्ट्रीयन पदार्थ बनवले तरी त्यांना आवडत नव्हते. ते म्हणायचे, 'ये गरीबों का खाना है.' विवेक अग्निहोत्री यांनीही याला दुजोरा दिला. ते म्हणाले, 'मी दिल्लीतून आलो होतो. जेवणात मसाले, घी भरपूर. इथे वरण-भात दिला, ज्यात मीठही कमी. लिंबूही वरून पिळलं जायचं. हा कल्चरल शॉक होता.' मात्र, पुढे त्यांनी याच मुलाखतीत लगेच स्पष्ट केले की, आता त्यांना महाराष्ट्रीयन थाळी आवडते. हे जेवण परवडणारे, आरोग्यदायी आणि सोपे आहे. ते म्हणतात, 'जो महाराष्ट्रीयन थाली है ना, बहुत इकॉनॉमिकल, व्हेरी हेल्दी और व्हेरी गुड थाली है.' आता यात महाराष्ट्राच्या खाद्यसंस्कृतीचा अपमान काय आहे?

ही मुलाखत 'कर्ली टेल्स'च्या 'संडे ब्रंच' भाग १८२ मध्ये आहे, ज्यात ते दोघे भोपाळी नॉन-व्हेज आणि सात्त्विक जेवणाबद्दल बोलतात. मात्र, माध्यमांनी फक्त सुरुवातीचा भाग उचलला आणि 'विवेक अग्निहोत्री यांनी महाराष्ट्रीयन जेवणावर टीका केली' अशी बातमी पसरवली. परिणामी, सोशल मीडियावर ट्रोलिंग सुरू झाली. लोकांनी विवेक यांना हिणवले, त्यांच्या चित्रपटांवर बहिष्काराची मागणी केली. पण कुणीही पूर्ण मुलाखत पाहिली नाही. विवेक यांनी नंतर स्पष्टही केले की, हे वक्तव्य विनोदी होते व हा नवरा-बायकोमधील संवाद होता. वरण-भात आता त्यांचा आवडता पदार्थ आहे. तरीही वाद थांबला नाही. माध्यमे असा द्वेष का पसरवतात? आणि मराठी माणसं मूळ स्रोत जाणून न घेता का टीका करतात? महाराष्ट्राला ज्ञानेश्वर, तुकाराम, समर्थ रामदास, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर यांची बौद्धिक परंपरा लाभली आहे. त्यामुळे माझी नेहमीच अशी इच्छा असते की, महाराष्ट्राने ही बौद्धिक परंपरा जपायला हवी. मराठी माणूस हा मुळातच प्रचंड बुद्धिमान आहे. मात्र, १९६० नंतर मतांच्या राजकारणासाठी मराठी माणसाची बौद्धिक क्षमता संकुचित



करण्यात आली. मराठी नेत्यांनी मराठी माणसाच्या हातातील विद्येची प्रतीक असलेली लेखणी हिसकावून घेतली आणि त्याच्या हातात दगड दिला. जेणेकरून नेते चाळीतून बंगल्यात गेले. मात्र मराठी माणसाची सामाजिक प्रगती खुंटली. आजही तोच प्रकार सुरू आहे. गंमत पाहा ना, काँग्रेसने १०५ मराठी माणसांचा जीव घेतला, ज्यांना आज आपण हुतात्मा म्हणतो. पण उद्धव ठाकरे मुंबई वाचवणार, अशी वल्गना राहुल गांधींच्या हातात हात घालून करतात. राहुल गांधी सतत मराठी माणसाचा अपमान करीत आले आहेत. त्यांनी सावरकरांवर गलिच्छ आरोप केले. आता तर सात्यकी सावरकर यांच्यावर ते गोडसेचे नातेवाईक आहेत म्हणून माझ्या जिवाला धोका आहे, असा खोटा आरोप करीत आहेत. हा महाराष्ट्राचा अपमान नाही का? सावरकर कुटुंब हे मराठी कुटुंब आहे आणि देशभक्त कुटुंब आहे. त्यांचा किती अपमान हे काँग्रेसी करणार आहेत? आणि इथले मराठीच्या नावावे मते मागणार, स्वत:ला मराठीचा कैवारी समजणारे याबाबत काही बोलणार आहेत की नाही?

दुसरीकडे मराठी अस्मितेच्या नावाने राजकारण करणारे नेते धार्मिक सणांवर विवादास्पद वक्तव्ये करतात, तरी माध्यमे त्यांचा समाचार घेत नाहीत. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेच्या एका नेत्याने कृष्ण जन्माष्टमीला मांस वाटल्याची चर्चा आहे. आमदार आदित्य ठाकरे म्हणाले की, 'स्वातंत्र्य दिनी काय खावे हे आमचे स्वातंत्र्य आहे.' उद्या तळीराम म्हणतील की दारू पिणे हा आमचा अधिकार आहे. गांधी जयंतीला ड्राय डे ठेवू नका! उद्धव ठाकरेंची ही कथा तर त्यांचे बंधू राज ठाकरे यांनी दहीहंडीच्या निमंत्रणावर 'मी दही हंडीचे नाही, फक्त मटण हंडीचे आमंत्रण स्वीकारतो,' असा विनोद केला. दहीहंडीसारखे मराठी उत्सव असले घाणेरडे विनोद करण्यासाठी आहेत काय? दहीहंडी हा मराठी माणसाचा मोठा उत्सव आहे. तेव्हा माध्यमे बोटे तोंडात घालून का बसली होती. राज ठाकरेंनी मागे कुंभस्नानावरही टीका केली. तरी माध्यमे यावर फार आक्रमक दिसली नाहीत. हा माध्यमांचा दुटप्पीपणा म्हणायचा का? मुळात जे वक्तव्य जसे आहे तसे दाखवणे माध्यमांचे कर्तव्य आहे. समाजात द्वेष पसरवणे, भांडणे लावणे, दंगलीसदृश वातावरण निर्माण करणे हे माध्यमांचे काम नाही. आता गंमत पाहा, माध्यमे कशी कामे करतात. संजय राऊत यांनी कुणावर टीका केली तर 'संजय राऊत यांचे शरसंधान, घणाघात' वगैरे मथळे देतात. मात्र विरोधकांनी टीका केली तर 'अमुक अमुक यांची जीभ घसरली. अमुक अमुक बरळले.' इ. मथळे देतात. संजय राऊत उघडपणे माध्यमांसमोर शिव्या देतात, महिलांनाही शिव्या देतात तेव्हा त्यांच्याबद्दल बातम्या चालवायला माध्यमांना अवघड का जात असेल? 'ये रिश्ता क्या कहलाता है?' असं काय मिळतं या पत्रकारांना की, विशिष्ट नेत्यांबद्दल ते अवाक्षरही काढत नाहीत? हल्लीच राज ठाकरेंच्या पत्रपरिषदेत त्यांचा कुत्रा 'रायनो' आला, ज्याने सर्वांचंच लक्ष वेधलं. सोशल मीडियावर मीम्स फिरू लागले.

लक्षात घ्या मराठी माणसांनो, उद्या मराठीच्या जिवावर कुणी उठला तर आपण सगळे मिळून त्याला शिंगावर घेऊ. पण ऊठसूट शिंगे दाखवत फिरणे बरे नव्हे! मला माध्यमांकडून कोणतीच अपेक्षा नाही. पण मराठी माणसाने यांच्या नादी लागू नये. मराठी लोकांनी मूळ स्रोत जाणून घेऊन प्रतिक्रिया द्याव्यात. ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीपासून ते सावरकरांच्या उपयुक्ततावादापर्यंतची परंपरा ही तर्कशुद्ध आहे. मराठी माणूस हा तर्कशुद्धच असला पाहिजे, तर्कहीन किंवा तर्कट नव्हे. त्यासाठी मराठीच्या नावाने राजकारण करणाऱ्या नेत्यांच्या नादी न लागता डॉ. आंबेडकरांसारख्या बौद्धिक व्यक्तीच्या ग्रंथांचे पारायण मराठी माणसाने केले पाहिजे. आता गणेशोत्सव सुरू होईल. गणपती ही बुद्धीची देवता, महाराष्ट्राची देवता आहे. मी गणपती बाप्पाकडे या निर्बुद्ध लोकांसाठी एकच मागणे मागीन, 'यांना बुद्धी दे गणनायका!'

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

# अन्यथा निसर्ग माफ करणार नाही

**चंद्रकांत लोहाणा**

निसर्गाचा समतोल बिघडल्याने याही वर्षी बदलत्या वातावरणाचा फटका अखेर बसलाच. धो धो बरसलेल्या पावसाने क्षणार्धात सर्व काही उद्ध्वस्त केले. हजारो हेक्टर शेतजमीन खरडून गेली. भविष्यामध्ये कधीही भरून न निघणारी हानी झाली. शेतकरीच नव्हे, तर सामान्य माणूसही या पावसाने भरडला गेला. हवामानाच्या बदलांमुळे मानवी आयुष्याला अनेक गंभीर धोके निर्माण होत आहेत. रोगराईचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. याकडे आमचे अजूनही लक्ष वेधले गेले नाही. आमचे आज होणारे हे दुर्लक्ष भविष्यामध्ये अती गंभीर परिणामाकडे सर्वांना घेऊन जाणारे आहे. निसर्गाला अक्षरक्षः ओरबाडणे सुरू आहे. त्यामुळे कार्बन डायऑक्साईड उत्सर्जनाचे प्रमाण वाढत असून संपूर्ण जगाच्या तापमानामध्ये वाढ झाली आहे. मानवाने विकासाच्या नावावर नैसर्गिक संसाधनाचा अमाप विध्वंस केला. त्यामुळे पूर, प्रदूषण, तापमानामध्ये वाढ, हवामान बदल, ओझोनचा विरळ होणारा थर तसेच नैसर्गिक आपत्ती आणि त्यामुळे प्रचंड आर्थिक नुकसान झाले. निसर्ग नियमामध्ये केलेली मानवी ढवळाढवळ तोही किती दिवस सहन करणार, हा खरा प्रश्न आहे. तरीही मानव त्याकडे अजूनही आपल्या उघड्या डोळ्यांनी निव्वळ बघ्याची भूमिका घेत आहे. ही विनाशकारी वृत्ती आम्ही किती दिवस पोसणार आहोत? विनाशाकडे घेऊन जाणारी ही दुर्लक्षित वृत्ती मानवाच्या मुळावर उठली आहे. ऑगस्ट महिन्यातील नैसर्गिक आपत्तीचा सर्वाधिक फटका वऱ्हाड प्रदेशाला बसला.



वाशीम जिल्ह्यातील पावसाने तर सर्व उच्चांक मोडलेत. हजारो हेक्टरमधील पिके शेतामध्ये सडली. शेती खरडून गेली ती वेगळीच. शेतकऱ्यांच्या तोंडापर्यंत आलेला घास धो धो पावसाने हिरावून नेला. बदलत्या वातरणाची ही तर फक्त सुरुवात आहे. विकासामधून विध्वंस ही नाण्याची दुसरी बाजू आहे. याकडे आम्ही कधीच लक्ष दिले नाही. पूर्वी वातावरणाशी समरस होणारी भारतीय पीक पद्धत वेगळी होती. काळानुरूप त्यामध्ये बदल होत आम्ही हायब्रीड आणि रासायनिक युगामध्ये येऊन ठेपलो आहोत. भारतीय परंपरा आणि ज्ञानाला समाजाने तिलांजली दिल्याने ही गंभीर परिस्थिती उद्‌भवली आहे. शेतामध्ये अमाप टाकली जाणारी रासायनिक खते आणि कीटकनाशकाने होणारे अतिशय गंभीर परिणाम आम्ही भोगत आहोत. कॅन्सर, मधुमेह, हृदयरोग वाढण्यामागे बदललेली जीवनशैलीच कारणीभूत असल्याचे तज्ज्ञांचे ठाम मत आहे. अतिहव्यासापायी आमची विनाशाकडे कशी वाटचाल सुरू झाली, हे अजूनही आम्हास समजलेच नाही. कधीही धो धो बरसणारा पाऊस, उन्हाळ्यामध्ये वाढलेले तापमान अन् हिवाळ्यामध्ये गायब झालेली थंडी हा निसर्गाने दिलेला स्पष्ट इशारा असला, तरी भविष्यामध्ये त्याचे होणाऱ्या गंभीर परिणामाची आम्ही साधी दखलही घेतली नाही. अमेरिका हा जगामधील क्रमांक १ चा हरितगृह उत्सर्जक देश असून हे उत्सर्जन कमी करण्याची सर्वाधिक जबाबदारी या देशाचीच आहे. परंतु, जगाचा दादा म्हणून मिरवणारा अमेरिका या बाबीकडे डोळेझाक करीत आहे. त्यास मानव जातीशी काहीएक देणेघेणे नाही. त्यामुळे अमेरिकेपेक्षाही सर्वाधिक नुकसान पृथ्वीचे झाले आहे. अमेरिका आपल्या स्वार्थापायी संपूर्ण जगाला विनाशाच्या खाईमध्ये लोटत आहे. हवामानामध्ये होणाऱ्या बदलाचे परिणाम भारतामध्येही जाणवू लागले आहेत. अनियंत्रित पाऊस आणि असह्य उन्हाचे चटके हे त्याचे स्पष्ट उदाहरण आहे. त्याची सुरुवात जर एवढी भयावह असेल तर त्याचा अंत केवढा गंभीर असेल याची कल्पनाही न केलेली बरी. मनुष्य निसर्गाच्या मुळावर उठल्याने निसर्गाच्याही सहनशीलतेचा अंत झाला आहे. त्यामुळे निसर्ग आपला रंग दाखविणार हे ठाम आहे. स्वार्थी मनुष्याने फक्त आणि फक्त निसर्गाला ओरबडल्याचे कार्य इमानेइतबारे केले. त्याचे गंभीर परिणाम आता आमच्याच पुढ्यात येऊन ठेपले आहेत. त्यामुळे सजगता हेच आम्हाला या पाशामधून मुक्त करू शकते. अन्यथा वेळ निघून गेल्यावर हातावर हात देऊन बसल्याशिवाय आमच्याकडे काहीच शिल्लक उरणार नाही. क्षणिक सुखाची भौतिक लालसा असंख्य दु:खाची जननी आहे, हे जेव्हा कळेल तोच मानवाच्या कल्याणाचा सुदिन असेल.

९८८१७१७८५६

## इतस्ततः

# 'बलसागर' भारत होवो!

**दत्तात्रेय आंबुलकर**

भारताचे सैन्य, सशस्त्र दल व अत्याधुनिक शस्त्रसज्जतेमुळे गेल्या दशकात भारताने संरक्षण सिद्धतेच्या संदर्भात जागतिक स्तरावर आघाडी घेतली. नुकत्याच लंडन येथे भारत-इंग्लंड दरम्यान झालेल्या व्यापक संरक्षण कराराने भारताचे संरक्षण क्षेत्रातील व्यापक महत्त्व आणि माहात्म्य सर्वमान्य झाले व यातूनच बलशाली भारताचे नवे रूप व स्वरूप अवघ्या जगानेही पाहिले. कधी भारतावर राज्य गाजविलेल्या ब्रिटनला आज भारताशी संरक्षण क्षेत्रासंदर्भात धोरणात्मक करार करण्यासाठी पुढाकार घ्यावा लागणे, ही बाब जगातील संरक्षण क्षेत्रातील दिग्गजांसाठी अचंबित करणारी, भारताची संरक्षण क्षेत्रातील क्षमता व सिद्धता सर्वमान्य करणारी ठरली आहे. भारताची संरक्षण सिद्धता व आपल्या सैनिकी तंत्रज्ञांचे कौशल्य जगासमोर नव्याने व प्रभावीपणे झळकले ते ६ मे २०२५ रोजी. केवळ २५ मिनिटांत भारताने पूर्वनियोजितपणे व अचूक स्वरूपात पाकिस्तानातील सर्वदूर व प्रसंगी आत शिरून, दहशतवाद्यांसह मुख्य संरक्षण केंद्रांना हेरून, हल्ला करून पाकिस्तानी दहशतवाद्यांसह दहशतवादी केंद्रेही नष्ट केली. एवढेच नव्हे, तर एवढ्या वेळेत निर्णायक स्वरूपात युद्ध जिंकण्याचा इतिहाससुद्धा यानिमित्ताने भारताने रचला.

भारत आणि भारतीयांच्या संरक्षण सिद्धतेतील कौशल्य पाकिस्तानच्या मनात धडकी भरविणारे व उभ्या जगाला स्तिमित करणारे ठरले. भारताचे २०१६ सालामधील उटी येथील पाकपुरस्कृत दहशतवादी हल्ल्याला अचूक उत्तर म्हणून अशीच चढाई केल्याचे यानिमित्ताने स्मरण होणे स्वाभाविक होते. मात्र, यावेळच्या भारताच्या कारवाईचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे यावेळी भारताचे आपल्या धोरणात्मक आक्रमकतेला विकसित तंत्र, तंत्रज्ञान, नियोजन व पाकिस्तानचे कमरतोड नुकसान करतानाच संरक्षणाला संपूर्ण सिद्धतेची साथ दिली. परिणामी, विकृत मेजर जनरल व विख्यात संरक्षणतज्ज्ञ राजन कोचर यांनी नमूद केल्यानुसार 'ऑपरेशन सिंदूर'च्या निमित्ताने भारत आणि भारताच्या लष्करी सज्जतेला राजकीय स्थिरता, प्रशासकीय परिपक्वता, परराष्ट्र धोरणाची भक्कमता याची साथ मिळाल्यानेच 'ऑपरेशन सिंदूर'अंतर्गत कारवाई केवळ संरक्षकच न राहता संरक्षणसज्ज सिद्ध झाली.

जाणकारांच्या मते, सध्याच्या आंतरराष्ट्रीय संदर्भात लष्करी कारवाई सुरू करताना अथवा त्याचा प्रतिकार करताना आर्थिक बाजू भरभक्कम असणे गरजेचे व फायदेशीरही ठरते. यावेळी भारताची प्रगत व प्रगतिशील आर्थिक व्यवस्था व सुस्थितीने भारताला मोठेच पाठबळ लाभले. भारताच्या अर्थव्यवस्थेची सध्याच चार ट्रिलियन डॉलर्सकडे वेगवान घोडदौड सुरू असून याची नोंद जग आणि जागतिक पातळीवर वेळोवेळी घेण्यात येत आहे. या आर्थिक प्रगतीलाच भारताच्या देश आणि जागतिक पातळीवरील उत्पादन वाहतूक व्यवस्थेची अव्वलता आता जगाने मान्य केली आहे. याचे प्रत्यंतर यावेळी नव्या संदर्भात आले. ब्रिटनच्या पुढाकारातून नुकत्याच व नव्याने झालेल्या भारत-ब्रिटन संयुक्त कराराने भारताच्या आर्थिक, औद्योगिक व परराष्ट्र धोरणाची छाप पाश्चिमात्य देशांवर पडलेली दिसून येते. विशेषतः ट्रम्प-आयात शुल्काच्या गदारोळातही हे घडू शकले, हे महत्त्वाचे आहे. त्यामुळे सिद्ध झालेली बाब म्हणजे, जेव्हा भारताच्या सुरक्षा संरक्षणाचा प्रश्न येतो, त्यावेळी आंतरराष्ट्रीय आर्थिक संस्था वा पाकिस्तान, अमेरिका, चीन वा रशिया यांना काय वाटते, हे महत्त्वाचे न ठरता, देश आणि देशवासीयांना काय वाटते, ते महत्त्वाचे ठरते व नेमकी हीच बाब पंतप्रधान मोदी यांनी पाकिस्तानसह डोनाल्ड ट्रम्प यांच्या धमक्या-वल्गनांना बळी न पडता, देशहितासाठी व देशाच्या संरक्षणासाठी काय महत्त्वाचे आहे, त्यावरच विचार करून प्रत्यक्षात आणली. यातूनच 'बलशाली भारत' नव्याने साकारला. त्याचवेळी भारताने गेल्या सुमारे १० वर्षांत विविध प्रकारच्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे आंतरराष्ट्रीय स्तरावरील आव्हानांचा सामना करावा लागू शकतो, याचा सर्वांगीण विचार करून, त्यानुसार देश आणि देशहित रक्षण यासाठी काय करावे लागू शकते, याचा व्यापक विचार करून आपली संरक्षण सिद्धता दाखवून दिली आहे. या धोरणात्मक तयारीमध्ये देशाची भौगोलिक व सागरी सीमा, महत्त्वाची संशोधन केंद्र व औद्योगिक, समुद्री बंदर, वाहतूक व्यवस्था इत्यादींच्या सुरक्षा राखण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. उदाहरणार्थ मुंबई-जेएनपीटी, कांडला ही बंदरस्थाने, सर्वांत मोठी अशी जामनगर रिफायनरी, मुंबईतील भाभा अणुसंशोधन केंद्र, राजस्थानमधील पोखरणसह ढोलेरा परिसरातील विशाल सौर ऊर्जा प्रकल्प, बाडमेर येथील रिफायनरी, दक्षिण भारतातील पारादीप व विशाखापट्टणम बंदर यांच्या संरक्षणाची विशेष काळजी या प्रकल्पांच्या निर्माण काळापासूनच घेतल्यामुळे त्यांचा उपयोग यावेळी प्रकर्षात जाणवला व सिद्ध झाला. या प्रमुख प्रकल्पांच्या संरक्षण सिद्धतेत मिसाईल क्षेपणास्त्रांसह ड्रोनच्या माऱ्यापासून पुरवलेली भरभक्कम सिद्धतेची यशस्वी चाचणी 'ऑपरेशन सिंदूर'च्या निमित्ताने जगमान्य ठरली व भारत आणि भारतीयांच्या विशेष कौशल्यांचा व बलशाली क्षमतेचा परिचय सर्वांना झाला. याच्याच जोडीला चीनसारख्या शेजारी देशांचा सर्वच बाबतीतील बेभरवशीपणा लक्षात घेता, तांत्रिक क्षेत्रातील संरक्षणाला भारताने विशेष खबरदारी घेण्यासाठी देशांतर्गत तंत्रज्ञान क्षमता विकसित केली आहे. यामध्ये माहिती-तंत्रज्ञान क्षेत्राशी संबंधित अशी व्यापक सायबर सुरक्षा, आर्थिक व्यवहार योग्य व सुचारू पद्धतीने होण्यासाठी स्वयंसिद्ध तंत्रज्ञानावर आधारित यंत्रणा, आवश्यक ठिकाणी कृत्रिम बुद्धिमत्तेचा विकास व प्रयोग आणि त्याशिवाय अंतराळ क्षेत्रातील संशोधनाचा उपयोग आता भारत आणि तटीय सागरी क्षेत्राच्या संरक्षणासाठी केला जात आहे, हे विशेष.

सद्य:स्थितीतील भारताची संरक्षण संदर्भातील बलशाली व स्वयंसिद्ध होण्याच्या संदर्भातील सिद्धता सप्रमाण सिद्ध करणारी बाब म्हणजे 'वर्ल्ड इकोनॉमिक फोरम.' या फोरमने संरक्षणात्मकदृष्ट्या सध्या असणाऱ्या वा नजीकच्या भविष्यातील जोखमीच्या संदर्भात 'जागतिक जोखीम अहवाल २०२५' नुकताच प्रकाशित केला आहे. त्यानुसार विशेषतः २०२४-२५ सालच्या दरम्यान आशियाई देशांमध्ये झालेल्या वा सुरू असणाऱ्या युद्ध वा युद्धसदृश बंडाळींच्या पृष्ठभूमीवर संरक्षण सिद्धता प्रमुख औद्योगिक केंद्रांच्या सुरक्षेच्या दृष्टीनेही तितकीच महत्त्वाची ठरेल, असा प्रामुख्याने इशारा दिला आहे. याचाच अर्थ, देशाच्या सीमेसह देशांतर्गत औद्योगिक-व्यवसायाची प्रमुख व संवेदनशील प्रगती केंद्रांचे संरक्षण तेवढेच महत्त्वाचे ठरेल. या साऱ्या पृष्ठभूमीवर पहलगाम व त्यानंतरच्या 'ऑपरेशन सिंदूर'च्या निमित्ताने 'आकाश' क्षेपणास्त्राचा यशस्वी व परिणामकारक उपयोग करून भारताने आपली बलशाली संरक्षण सिद्धता सिद्ध केली आहे. आता आव्हान आहे 'आकाश'ला गवसणी घालू शकणाऱ्या 'ब्रह्मांडाचा' संशोधनपर शोध घेण्याचा!

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)
९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### 'धर्म अध्यात्म'मधील माहिती अतिशय उपयुक्त

मागील पाच-सहा महिन्यांपासून तरुण भारतमध्ये 'धर्म अध्यात्म' या शीर्षकांतर्गत दर शुक्रवारी सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि धार्मिक कार्यकर्तृत्वाचा तथा ठिकाणांचा ठावठिकाणा प्रकाशित केला जात आहे. बरेच वेळा काही उपयुक्त माहिती किंवा ठिकाणे काळाच्या ओघात विस्मरण पावतात. परंतु धर्म अध्यात्मच्या निमित्ताने अनेक चांगल्या सनातन गोष्टींना उजाळा मिळतो आहे. त्यामुळे धर्म अध्यात्मच्या संयोजिका शिल्पाताई विवेक कवठेकरांचे आणि तरुण भारतचे मनापासून आभार मानावेसे वाटतात. मागील दोन अडीच महिन्यांपासून श्रीराम स्पर्शाने पावन स्थळे या शीर्षकांतर्गत प्रभू श्रीराम आपल्या वनवास काळात जिथे कुठे वास्तव्यास होते त्या ठिकाणाची अतिशय सुंदर माहिती उपलब्ध विविध लेखिकांद्वारे होते आहे. आता पुढच्या शुक्रवारी कुठल्या ठिकाणाची माहिती वाचायला मिळणार याचीही मनाला ओढ लागलेली असते. सोबतच त्या त्या तीर्थक्षेत्रांची चित्रेही प्रसिद्ध होत असल्यामुळे ती तीर्थक्षेत्रे संपूर्णपणे डोळ्यापुढे उभी राहतात. श्रीरामाबद्दल अधिक आस्था आपल्या हिंदू भाविकांना आहे परंतु पुढील पिढीला ही पावन स्थळे कळणे अतिशय आवश्यक आहे . तरुण भारतने या पृष्ठावर ही माहिती वाचकांसाठी/भाविकांसाठी उपलब्ध करून दिल्याबद्दल मन:पूर्वक धन्यवाद. अशाच विविध लेखमाला धर्म अध्यात्माद्वारे पुढील अंकात आम्हाला अपेक्षित आहे.

**संजय मुरूगकर**/९८२२५७००४६

### रोगराई, महागाई व भ्रष्टाचाऱ्यांना घेऊन जा गे मारबत

मारबत उत्सव ही नागपूरच्या इतिहासातील मोठी आणि ऐतिहासिक परंपरा आहे. मारबत उत्सवाची सुरुवात इंग्रजांच्या काळात सुरू करण्यात आली. यामागचा मुख्य उद्देश म्हणजे लोकांना एकत्रित करून इंग्रजांविरुद्ध मोठा लढा उभा करणे हा होता. कालांतराने हा उत्सव समाजातील वाईट चालीरीतीचा व वाईट रूढींचा नाश आणि चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन देणे हे या सणाचे उद्दिष्ट ठरले. येणारे विघ्न दूर करण्यासाठी १८८० मध्ये काळ्या मारबतीची सुरुवात झाली. यानंतर १८८४ मध्ये पिवळ्या मारबतीची सुरुवात झाली. दोन्ही मारबती मांडण्यामागचा एकच उद्देश होता आणि आहे तो म्हणजे येणारे विघ्न, रोगराई, महागाई, दुष्काळ, भ्रष्टाचार दूर व्हावा. नागपूरसाठी आश्चर्याची गोष्ट म्हणजे आजही १४५ वर्षे जुनी परंपरा त्याच पद्धतीने संपन्न होते. हा नागपूरच्या इतिहासातीलच नाही तर भारतीय इतिहासातील परंपरेची मोठी धरोहर व संस्कृतीच म्हणावी लागेल. कारण या उत्सवात संपूर्ण धर्माचे लोक मोठ्या आनंदाने सहभागी होतात. त्यामुळे ही नागपूरकरांसाठी स्वाभिमानाची गोष्ट आहे. त्याहीवेळेस मारबतीची सलग आठ दिवस पूजा-अर्चना व्हायची आणि आताही होते. त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात सांस्कृतिक कार्यक्रम सुद्धा होतात. मारबतीचा सण पोळ्याच्या पाडव्याला म्हणजे तान्ह्या पोळ्याच्या दिवशी भव्य मिरवणूक काढून येणाऱ्या विघ्नांच्या व विघटनकारी शक्तीच्या विरोधात जयघोष करून 'ईडा-पीडा, माशा-मुरकुट्या, रोगराईला घेऊन जा गे मारबत' अशा घोषणांनी केला जातो व संपूर्ण शहरातील नागरिक यात सहभागी होऊन संपूर्ण नागपूर दुमदुमते. मोठ्या पोळ्याच्या दिवशी म्हणजेच अमावास्येला घरोघरी पळसाच्या फांद्यांची पूजा केली जाते व दुसऱ्या दिवशी पाडव्याला चौका-चौकामध्ये पळसाच्या फांद्यांचे दहन केले जाते व घोषणा केली जाते 'माशा-मुरकुट्या, रोगराईला घेऊन जा गे मारबत' अशा घोषणा दिल्या जातात. देशातील भ्रष्टाचाऱ्यांनी देशाला हजार पटीने लुटले आहे. त्यांच्यामुळे देशात महागाईचा, बेरोजगारीचा व शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा डोंगर उभा झाला आहे. याचे प्रायश्चित्त देशातील १४० कोटी जनता भोगत आहे. त्यामुळे म्हणावेसे वाटते भ्रष्टाचाऱ्यांना सर्वप्रथम घेऊन जा गे मारबत!

**रमेश कृष्णराव लांजेवार**/९९२१६९०७७९

### तुळस दिसे नयना

तरुण भारतची शंभर वर्षे आणि त्या निमित्ताने तुळशीचे महत्त्व सांगून तुळस दान करण्याचा एक स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. 'जिकडे पाहावे तिकडे तुळस दिसे नयना' असे काहीसे वातावरण झाले आहे. एक लहानसे सहज लागणारे, वाढणारे आणि त्यातून शुद्ध पवित्र वातावरण करणारी ही तुळस आहे. आपल्या भारतीय संस्कृतीत तुळशीचे अनन्यसाधारण महत्त्व सांगितले आहे. पण आज अंगणात, दारात तुळस दिसत नाही, पण इतर शोभिवंत झाडे दिसतात.

आता या उपक्रमातून मात्र सगळीकडे तुळस दिसू लागली आहे. दररोज वृत्तपत्रातून येणाऱ्या लेखाच्या माध्यमातून ती किती अनमोल आहे याची जाणीव झाली आहे. जिथे अनेक लोक एकत्र येतात अशा मंदिर, संस्था, शाळा, कार्यक्रम यातून तुळस भेट देणे, दान करणे यातून घरोघरी तुळस राहील. तुळशीच्या मंजिरीतून पुन्हा रोप तयार होते. त्यासाठी वेगळे काहीच करावे लागत नाही. म्हणजे आता भविष्यकाळात तुळस घराघरात दिसेल. शुद्ध आणि पवित्र वातावरण निर्मिती होईल, सकारात्मकता वाढीस लागेल आणि पर्यायाने शारीरिक आणि मानसिक आरोग्य उत्तम राहील हे निश्चित. तुळस लावा पर्यावरण वाचवा हे ध्येय लवकरच नक्की साध्य होणार. एक एक लहानसे पुढे पडणारे पाऊल आपल्याला आपल्या ध्येयाकडे निश्चित घेऊन जाते. तरुण भारतचे हार्दिक अभिनंदन!

**संगीता वाईकर**/९९२२५०४७९४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# परळी वैजनाथमध्ये आकर्षक गणेश मूर्तींची बाजारपेठ सजली

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२२ ऑगस्ट**



:गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असून शहरात सणाची लगबग सुरू झाली आहे. परळी वैजनाथ येथील मोंढा मार्केट परिसरात विविध प्रकारच्या सुंदर व आकर्षक गणेश मूर्ती विक्रीसाठी उपलब्ध झाल्या आहेत. लहानपासून मोठ्या मूर्तींपर्यंत, पर्यावरणपूरक व पारंपरिक अशा मूर्तींच्या खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी दिसून येत आहे. छायाचित्रात मूर्तिकार श्री. रामेश्वर खर्डे आपल्या कलाकृतींवर अंतिम रंगसंगती देताना दिसत आहेत.

# अवैद्यरीत्या गुटखा विक्री करणाऱ्यावर माजलगाव शहर पोलीसांचा छापा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ ऑगस्ट**

दिनांक २१/०८/२०२५ रोजी गोपनिय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, ईसम नामे सचिन गोरख सुरवसे रा. शेलापुरी ता. माजलगाव जि. बीड हा त्याचे राहते घरामध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेल्या गुटखाची साठवणुक करुन त्याची चोरटी विक्री करीत आहे, अशी खात्रीलायक बातमी मिळाल्यावरुन मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी इसम नामे सचिन गोरख सुरवसे रा. शेलापुरी ता. माजलगाव जि. बीड याचे राहते घरी अचानक जावून छापा मारला असता



पंचासमक्ष सदर घराची झडती घेतली सदर घरामध्ये दोन पांढऱ्या रंगाच्या गोण्यामध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला केसर युक्त विमल पान मसाला व विमल कंपनीचा सुगंधीत तंबाखुचा किंमती १६,४७०/- रुपयेचा मुद्देमाल मुद्देमाल मिळुन आला.

सदरची कारवाई नवनित कॉवत, पोलीस अधीक्षक बीड, श्रीमती चेतना तिडके, अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, निरज राजगुरु उपविभागीय पोलीस अधिकारी माजलगाव यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ, पोउपनि केरबा माकणे, मपोह/१४२४ अंजुम, पोकों / १९२६ महेश चव्हाण, पोकों / १६१९ अंगद घोडके व पोकों / २२२२ सुनिल गवळी यांनी केली आहे.

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयात विद्यापीठ वर्धापन दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२२ ऑगस्ट**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ६७ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.वर्धापन दिना



निमित्त सुंदरराव सोळंके महाविद्यालात प्रभारी प्राचार्य डॉ.एन.के.मुळे यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.एन. के .मुळे सर होते तर प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य डॉ.एम.ए.कव्हळे, उपप्राचार्य प्रा.शिंदे पी.एस. प्रबंधक प्रशांत चव्हाण उपस्थित होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात बोलताना प्रभारी प्राचार्य डॉ. एन. के.मुळे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वाटचाली बद्दल व शैक्षणिक कार्याबद्दल माहिती दिली.तसेच यावेळी महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२४ –२०२५ मध्ये केलेल्या कार्याचा अहवाल मांडण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. बी.आर बोडके यांनी केले. तर आभारप्रदर्शन डॉ.ढवळे एन.आर यांनी केले.यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी इत्यादींची प्रमुख उपस्थिती होती.

# नानाजी देशमुख विद्यामंदिरमध्ये बैलपोळा व मातृदिन कार्यक्रम उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ ऑगस्ट**

आज दि.२२/८/२०२५ वार शुक्रवार रोजी सर्वप्रथम बारा महिने आपल्यासाठी शेतात राबणाऱ्या बैलांचे मूर्ती स्वरूपात पूजन करण्यात आले. यावेळी मंचावर मा .सुनंदाताई कुलकर्णी, डॉ.शीतल घाडगे ताई, नानाजी देशमुख विद्या मंदिराच्या मुख्याध्यापिका मा. मोराळे ताई आणि शिशु वाटिका प्रमुख मा.आरती ताई उपस्थित होते. प्रास्ताविकामध्ये सौ.स्नेहलताई गोसावी विद्यार्थ्यांना गोष्ट सांगितली. आला आला पोळा हे गीत सादर केले.माता पालक असलेल्या सौ द्वारकाताई नरवणे यांनी आई बद्दल आई माझी मायेचा सागर ही कविता सादर केली. यानंतर वेदांत बाराहाते याने आई ही आईअसते ही कविता सादर केली. यानंतर विद्यार्थ्यांनी भाषणे केली. त्यामध्ये संयोगिता धांडे, अंशिका शेवाळे, योगेश्वरी डाके, तनुष कुलकर्णी. मोराळे ताई यांनी विद्यार्थ्यांना मातृदिनाच्या शुभेच्छा दिल्या. प्रियांश रांजणकर याच्या आईने मातृदिना बद्दल माहिती सांगितली. प्रमुख पाहुण्या घाडगे ताई यांनी मातृदिन आणि पोळा याबद्दल माहिती सांगितली. त्या म्हणाल्या आईचा एकच दिवस नसतो आपण रोज मातृदिन साजरा करायला पाहिजे. मातृदिन हा आई बद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. त्यांनी शिवाजी महाराजांना जिजामातांनी कसे घडवले, लव कुश यांना सीता मातेने कसे संस्कार दिले, अशी वेगवेगळी उदाहरणे देत मातृदिनाचे महत्त्व सांगितले. अध्यक्ष समारोपात सुनंदाताईंनी आई मधल्या वात्सल्य, प्रेम या गुणांचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की बैला बद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी बैलपोळा हा सण साजरा करतात. यानंतर मातृ पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वातीताई देशपांडे, प्रास्ताविक स्नेहल ताई गोसावी, यांनी केले. अशाप्रकारे हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. यावेळी या कार्यक्रमाला माता पालक बहुसंख्येने उपस्थित होते.

# बीड जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी अंतिम प्रभाग रचना जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ ऑगस्ट**

राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या प्रधान सचिव यांच्या १२ जून २०२५ रोजीच्या आदेशानुसार बीड जिल्हा परिषदेच्या ६१ निवडणूक विभाग आणि त्याअंतर्गत निर्वाचक गणात गेवराई-१८, माजलगाव-१२, वडवणी-०४, बीड-१६, शिरुर कासार-०८, पाटोदा-०६, आष्टी-१४, केज-१४, धारुर-०६, परळी-१२ आणि अंबेजोगाई-१२ अशा एकूण जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांच्या १२२ निर्वाचक गणासाठी निवडणूक प्रभाग रचनेचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

त्यानुसार दि. २२ ऑगस्ट २०२५ रोजी अंतिम प्रभाग रचनेची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिद्ध होणार आहे. ही अधिसूचना बीड जिल्हाधिकारी कार्यालय, बीड जिल्हा परिषद कार्यालय, सर्व उपविभागीय कार्यालये, सर्व तहसील कार्यालये आणि सर्व पंचायत समिती कार्यालयांतील फलकांवर नागरिकांच्या अवलोकनासाठी उपलब्ध असेल. सर्व संबंधितांनी अंतिम प्रभाग रचनेचे अवलोकन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.

# स्वा.सावरकर महाविद्यालयात विद्यापीठ वर्धापन दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ ऑगस्ट**

येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६७ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ६७ व्या वर्धापन दिना निमित्त सकाळी ७.३० वा. महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष प्रा. चंद्रकांत मुळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, शालेय समितीचे अध्यक्ष प्रमोद कुलकर्णी ,महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे, अधीक्षक डॉ. प्रशांत तालखेडकर,विद्यार्थी, प्राध्यापक कर्मचारी यांची उपस्थिती होती. या प्रसंगी कला, विज्ञान व वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भितीपत्रकाचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी प्रधानमंत्री उच्च तर शिक्षा अभियानांतर्गत कौशल्य विकास अभियाना च्या ' असिस्टंट ड्रेस मेकर अँड टेलरिंग' अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या बॅचचे उद्घाटन प्रा. चंद्रकांत मुळे यांच्या हस्ते करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, कोर्स समन्वयक डॉ. मेधा गोसावी, यांनी कोर्सची माहिती दिली. ध्वजारोहणानंतर राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या सर्व कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी यांची उपस्थिती होती.



# एकजुटीमुळेच काँग्रेस पक्ष मजबुत–खा.रजनीताई पाटील

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२२ ऑगस्ट**

शिमला येथील पीटरहॉफ येथे शुक्रवार रोजी मतचोरी विरोधात रॅली काढण्यात आली.हिमाचल प्रदेश काँग्रेसच्या प्रभारी व राज्यसभा खा. रजनीताई पाटील यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले.



यावेळी बोलताना काँग्रेस पक्ष हा कार्यकर्त्यांच्या एकजुटीमुळेच आजही सक्षम व मजबूत आहे. कार्यकर्त्यांच्या सक्रियतेमुळेच संघटनाला नवसंजीवनी मिळते, असे प्रतिपादन काँग्रेसच्या हिमाचल प्रदेश प्रभारी व राज्यसभा खा. रजनीताई पाटील यांनी केले यावेळी हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सिंह सुक्खू, प्रदेश काँग्रेस अध्यक्षा प्रतिभा सिंह, हिमाचल प्रदेश काँग्रेस प्रभारी खा रजनीताई पाटील आदी उपस्थित होते.यानंतर,खा. रजनीताई अशोकराव पाटील व मंत्रीमंडळातील सहकाऱ्यांसोबत काँग्रेस आमदार दलाच्या बैठकीत सहभाग घेतला. या बैठकीत येत्या काळात पक्षाच्या वतीने आयोजित होणाऱ्या कार्यक्रमांवर सविस्तर चर्चा झाली तसेच संघटन अधिक मजबूत करण्यासाठी ठोस रणनीती आखण्यात आली.

आम्ही पूर्ण समर्पण आणि एकजुटीने काँग्रेस पक्षाची मजबुती, तसेच राज्याची सेवा आणि विकासासाठी सातत्याने कार्य करत राहू मत व्यक्त केले.त्या पुढे म्हणाल्या की, कार्यकर्त्यांमधील परस्पर सहयोग आणि निष्ठा हेच पक्षाच्या बळाचे प्रमुख स्तंभ आहेत. स्थानिक पातळीपासून ते राष्ट्रीय स्तरापर्यंत काँग्रेस पक्षाने नेहमीच लोकांच्या हितासाठी काम केले आहे. सामाजिक न्याय, सर्वसमावेशक विकास आणि शेतकरी–श्रमिकांचे प्रश्न सोडविण्याची भूमिका काँग्रेसने घेतली आहे असे मत व्यक्त केले.

# राष्ट्र हिताच्या बातम्यांकडे दुर्लक्ष म्हणत खा. बजरंग सोनवणेंनी वेधले सभागृहाचे लक्ष

## राज्यमंत्री डॉ.मुरुगन यांच्याकडून टीआरपी प्रणाली मधे बदल करण्यास मान्यता

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२२ ऑगस्ट**

सध्या दूरदर्शन वरील वृत्त वाहिन्यांवरील बातम्यांचे मूल्यांकन 'टीआरपी' (टेलिव्हिजन रेटिंग पॉइंट्स) च्या आधारे होत असल्या मुळे उच्च-टीआरपी मिळविणाऱ्याबातम्यांना प्राधान्य दिले जाते, तर राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने महत्त्वाच्या परंतु कमी टीआरपी मिळविणाऱ्या बातम्यांकडे दुर्लक्ष होत असल्याची बाब खा. बजरंग मनोहर सोनवणे यांनी लोकसभेत उपस्थित केली. या प्रश्नाला उत्तर देताना माहिती व प्रसारण तसेच संसदीय कामकाज राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांनी सरकार टीआरपी मूल्यांकन प्रणालीत बदल करण्याची गरज मान्य करत असल्याचे स्पष्ट केले.

खा. बजरंग सोनवणे यांनी लोकसभेत अनेक विषयोवर महत्वाची चर्चा केली असून अलिकडे अधिक टीआरपी मिळविण्या साठी किळसवाणे व्हीडीओज, विद्वेष पसरवणारे डिबेट्स, अनैतिक व सामाजिक विकृतीला खतपाणी घालणारे कार्यक्रम दाखविले जात आहेत. त्यामुळे निकोप समाज निर्मितीला गंभीर धोका निर्माण झाला आहे. राजव्यवस्था, धर्म व्यवस्था, समाजव्यवस्था, कुटुंब व्यवस्था आणि व्यक्तिमत्व विकास यावर प्रसारमाध्यमांचा स्लो पोईजनिंगसारखा परिणाम होत असतो, असा मुद्दा मांडला. यावर उत्तर देताना डॉ. मुरुगन म्हणाले, नोंदणीकृत प्रेक्षक रेटिंग एजन्सीज कडून मिळणाऱ्या डेटावर आधारित असलेली विद्यमान प्रणाली सुधारण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी



मंत्रालयाने टीआरपी मोजणी संदर्भातील विद्यमान धोरण मार्गदर्शक तत्त्वांमध्ये सुधारणा करण्याचा मसुदा संकेतस्थळावर सार्वजनिक चर्चेसाठी प्रसिद्ध केला आहे. सरकारच्या मते या सुधारणा केल्यामुळे न्याय्यस्पर्धेला प्रोत्साहन मिळेल, अधिक अचूक व प्रतिनिधिक डेटा निर्माण होईल, देशभरा तील प्रेक्षकांच्या विविध व बदलत्या माध्यम वापराच्या सवयींचे योग्य प्रतिबिंब दिसेल. त्यामुळे टीआरपी मूल्यांकनात गुणात्मक ते लाही महत्त्व दिले जाईल आणि अनैतिक स्पर्धेला आळा बसण्याची अपेक्षा आहे. खा. बजरंग सोनवणे यांनी सामाजिक विकृतीला खतपाणी घालणारे कार्यक्रम दाखवू नयेत, अशीही मागणी केली. विकासात्मक विषया सोबतच सामाजिक स्वास्थ बिघडण्यास कारणीभूत ठरणाऱ्या विषयावर खा. सोनवणे यांनी केंद्र सरकारचे लक्ष वेधले. अधिवेशनाच्या सुरुवातीलाच खा. बजरंग सोनवणे यांनी उल्लू टीव्ही या चॅनल वरील विकृत कार्यक्रमांचे प्रसारण बंद करण्यात महत्वाची भूमिका निभावलीहोती. यानंतर राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांनी सरकार टीआरपी मूल्यांकन प्रणालीत बदल करण्याची गरज मान्य करत असल्याचे स्पष्ट केले. दरम्यान सर्व सामान्य नागरिकांच्या मनात असलेली ही खदखद खा. बजरंग सोनवणे यांनी संसदेत मांडल्यामुळे नागरिक समाधान व्यक्त करीत आहेत. केंद्र सरकारने तातडीने पावले उचलुन अशा वाहिन्यांना पायबंद घातला पाहिजे अशी मागणी होताना दिसत आहे.

# अंबाजोगाई शहरातील गुणवंतांचा राजकिशोर मोदी यांच्याकडून सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२२ ऑगस्ट**

अंबाजोगाई शहरातील डॉ विलास दत्ता जाधव याने NEET PG मध्ये भारतात १७४६ वा रँक तसेच ८०० पैकी ६१५ गुण मिळवत एमबीबीएस नंतरच्या PG साठीच्या प्रवेशास पात्र ठरल्यामुळे तसेच कु. रूपाली शंकर पळसे हिने देखील NEET परीक्षा उत्तीर्ण होऊन स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश निश्चित केल्याबद्दल, त्याचबरोबर अंबाजोगाई शहरातील सुप्रसिद्ध व्यापारी निलेश मुथा यांची सुकन्या कु साक्षी हिने BDS च्या पहिल्या राऊंडमध्येच नाशिक येथील डेंटल कॉलेजमध्ये आपला प्रवेश निश्चित केला आहे. याबद्दल या तीनही गुणवंतांचा फेटा बांधून तसेच शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान व सत्कार करण्यात आला.यावेळी राजकिशोर मोदी यांच्या सोबत शहरातील जेष्ठ नागरिक तसेच विविध चळवळीतील अग्रणी माणिकभाऊ कदम , दत्ता जाधव,निलेश मुथा सय्यद ताहेर, रशीद भाई, विजय कोंबडे , कु रुपालीची आई या उपस्थित होत्या.



या सन्मान सोहळ्या प्रसंगी राजकिशोर मोदी यांनी सर्व गुणवंतांचे कौतुक करत त्यांना पुढील शैक्षणिक उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. अत्यंत बिकट व प्रतिकूल परिस्थितीतही कु रुपाली पळसे हिने अत्यंत जिद्दीने व चिकाटीने आपले शिक्षण घेतले.आज अंबाजोगाई शहरातीलच स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएसच्या सा प्रवेशासाठी पात्र ठरल्याबद्दल कु रुपलीचे विशेष असे कौतुक केले

शहरात सूप व दुरडी बनवण्याचा आपला पारंपरिक व्यवसाय करुन आपला उदरनिर्वाह करणारे शंकर पळसे याची कन्या कु रुपाली ही अंबाजोगाई शहरातील बुरुड समाजातील पहिली डॉक्टर होण्याचा सन्मान मिळवणार आहे. त्याबद्दल संपूर्ण समाजातून देखील तिच्यावर अभिनंदन व शुभेच्छाचा वर्षाव होत आहे. चि विलास जाधव यांच्या कुटुंबात याअगोदर देखील डॉक्टर बनले आहेत. त्याने बी जे मेडिकल कॉलेज मधून आपले एमबीबीएस चे शिक्षण पूर्ण केले आहे. त्यांच्या कुटुंबात डॉक्टर बनण्याची परंपरा पुढे डॉ विलास याने सुरू ठेवली आहे. मुथा कुटुंब हे अंबाजोगाई तालुक्यातील एक प्रतिष्ठित कुटुंब आहे. त्याची कन्या कु साक्षी हिने दंतवैद्यक शास्त्रात पहिल्या वर्षासाठी पहिल्याच फेरीत प्रवेशासाठी पात्र ठरली आहे. या कौतुक सोहळ्यात उपस्थित असलेले जेष्ठ नागरिक माणिक भाऊ कदम यांनी देखील या सर्वांना शुभेच्छा दिल्या.

या तिनही विद्यार्थ्यांनी आपल्या परिश्रम, चिकाटी आणि जिद्दीने हे यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशामुळं केवळ त्यांचे कुटुंबच नव्हे तर संपूर्ण परिसर व समाज अभिमानाने उंचावला असल्याची भावना राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केली. या गुणवंत विद्यार्थ्यांचा आदर्श इतर विद्यार्थ्यांनी देखील घेऊन आपल्या कुटुंबासह संपूर्ण समाजाचे नाव उज्वल करावे असे आवाहन देखील इतर विद्यार्थ्यांना राजकिशोर मोदी यांनी याप्रसंगी केले आहे.

# एफआरएस व लाडक्या बहिणीच्या फेरसर्वे-क्षणावरुन अंगणवाडी ताईंनी बजावला इशारा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ ऑगस्ट**

अंगणवाडी सेविका व मदतनिस यांच्यावर सरकारकडून टाकण्यात येणाऱ्या वाढत्या कामाच्या ताणाविरोधात महाराष्ट्र राज्य अंगणवाडी सेविका व मदतनिस महासंघाने तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. एफआरएस, पोषण ट्रॅकर ॲप, प्रधानमंत्री मातृवंदना योजना व 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचे फेरसर्वेक्षण यांसारखी जबाबदारी अंगणवाडी ताईंवर लादू नये, अशी ठाम मागणी करत येत्या ९ सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता आझाद मैदान, मुंबई येथे भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. महासंघाचे प्रदेशाध्यक्ष भगवान देशमुख , प्रदेश उपाध्यक्ष कमल बांगर, राज्य संघटक दत्ता देशमुख, बीड जिल्हा संघटक सचिन अंधळे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अंगणवाडी सेविकांना मुळ काम सोडून इतर कामात गुंतवले जात असल्यामुळे मुलांचे पूर्वशालेय शिक्षण व पोषण सुधारणा या मुख्य उद्दिष्टावर विपरित परिणाम होत आहे.

सध्या एफआरएस आणि पोषण ट्रॅकर ॲपच्या माध्यमातून काम दिले आहे. दोन महिन्यांचा टीएचआर एकदाच वाटप करावा लागतो, मात्र दर महिन्याला टीएचआर वाटल्याचा फोटो अपलोड करणे बंधनकारक आहे. निकृष्ट दर्जाचा टीएचआर लाभार्थ्यांना मिळत असून, फोटो अपलोड करतानाही मोठ्या अडचणी येतात. सेविकांकडे ४ जी मोबाईल असून सरकारचे ॲप ५जीवर चालते. त्यामुळे सरकारने सेविकांना ५जी मोबाईल द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेत पात्र–अपात्र तपासणीचे काम अंगणवाडी सेविकांकडे दिले आहे. मात्र गावातच एखादी लाभार्थी अपात्र ठरवावी लागल्यास त्यातून थेट अंगणवाडी ताईंवर हाणामारी, वादविवाद होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे हे काम अंगणवाडी ताईंवर सोपवू नये, असा इशारा महासंघाने दिला आहे.ऑक्टोबर २०२४ मध्ये तत्कालीन राज्य सरकारने सेविकांना ५ हजार आणि मदतनिसांना ३ हजार रुपयांची मानधनवाढ जाहीर केली होती. मात्र आजपर्यंत ती पूर्णपणे लागू झालेली नाही, असा आरोपही संघटनेकडून करण्यात आला. एफआरएस, पोषण ट्रॅकर, पीएमएमव्हीवाय (प्रधानमंत्री मातृ वंदना योजना) या कामांचा प्रचंड ताण अंगणवाडी सेविकांवर आला आहे. त्यामुळे मुळ अंगणवाडीचे काम मागे पडले असून लाभार्थींची संख्या दिवसेंदिवस घटत आहे. या पार्श्वभूमीवर पीएमएमव्हीवाय योजनेच्या कामावर अंगणवाडी सेविकांनी बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे.९ सप्टेंबर रोजी होणाऱ्या मुंबईतील मोर्चात राज्यभरातून हजारो अंगणवाडी सेविका–मदतनिस सहभागी होणार आहेत. सरकारने मागण्या मान्य केल्या नाहीत तर निदर्शने आणखी तीव्र करण्याचा इशारा महासंघाने दिला आहे. प्रधानमंत्री मातृवंदना योजना अंमलबजावणीस नकार देणाऱ्या अंगणवाडी सेविका विरूध्द प्रशासकीय कार्यवाही करावे असे पत्र जिल्हा कार्यकम अधिकारी जिल्हा परिषद बीडचे मनोज ससे यांनी सर्व बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांना काढले होते. महासंघाचे प्रदेशाध्यक्ष भगवानराव देशमुख व जिल्हा कार्यक्रमाधिकारी यांची दूरध्वनी द्वारे चर्चा झाल्यानंतर जिल्हा कार्यक्रम अधिकारी मनोज ससे यांनी कारवाई करणार नाही असे ठोस आश्वासन दिले. सूचना सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना देण्यात आल्या आहेत.

# वाई गोरक्षनाथ येथे कर सणानिमित्त शेकडो बैलजोड्या दर्शनासाठी दाखल



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ ऑगस्ट**

वसमत तालुक्यातील वाई गोरक्षनाथ येथे कर सणानिमित्त गोरक्षनाथांच्या दर्शनासाठी शनिवार दि २३ ऑगस्ट रोजी मध्यरात्रीपासूनच शेकडो बैलजोड्या दाखल झाल्या. परभणी, नांदेड, लातूर येथील शेतकरी बैलजोड्या घेऊन येत आहेत. शेतकऱ्यांसाठी गावकरी व संस्थानच्यावतीने २५ क्विंटल खिचडीचा प्रसाद वाटप करण्यात आला.

वसमत तालुक्यातील वाई गोरक्षनाथ येथे गोरखनाथांचे मंदिर आहे. पोळा सणानंतर करीच्या दिवशी या ठिकाणी पशुपालक त्यांच्या बैलजोड्या घेऊन गोरक्षनाथांच्या दर्शनासाठी येतात. मागील ५०० वर्षापेक्षा जास्त काळापासून ही परंपरा आहे. कर सणाच्या दिवशी या ठिकाणी बैल जोडीने मंदिराला पाच प्रदक्षिणा घातल्यानंतर पुढे वर्षभर बैलजोडी आजारी पडत नाही अशी अख्यायिका आहे.यावर्षी शनिवारी कर असल्यामुळे दर्शनासाठी येणाऱ्या बैलजोड्यांची वाढती संख्या लक्षात घेता वसमत व औंढा मार्गावरील वाहतूक मार्गात बदल करण्यात आला होता.

कर सणानिमित्त बैलजोड्यांची होणारी गर्दी लक्षात घेता गावकरी व संस्थानच्यावतीने जय्यत तयारी करण्यात आली होती. बैल जोड्यांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच शेतकऱ्यांसाठी २५ क्विंटल खिचडीचा प्रसाद करण्यात आला होता. पहाटेपासून संध्याकाळपर्यंत ३० हजारांपेक्षा जास्त बैलजोड्यांनी मंदिराला प्रदक्षिणा घेतल्याचे सांगण्यात आले. उशिरापर्यत सुमारे ५० हजार बैलजोड्या वाई गोरक्षनाथ येथे दाखल होतील असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

दरम्यान, पोलिस विभागाच्यावतीने औंढा ते वसमत या रस्त्यावर चोख पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता तसेच वाहतुक सुरळीत करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पोलिस रस्त्यावर जागोजागी तैनात करण्यात आले होते. कर सणानिमित्त दरवर्षीपेक्षा जास्त बैलजोड्या मोठ्या श्रध्देने वाई गोरक्षनाथ येथे दाखल झाल्या होत्या.

यंदाच्या पोळ्यानिमित्त हिंगोली शहरापासून जवळच असलेल्या खांबाळा, अंबाळा आणि बैलवाडी यांसारख्या गावातील शेतकऱ्यांनी आपल्या लाडक्या बैलांना सजवून शहरात आणले. पारंपरिक पद्धतीनुसार, बैलांना रंगरंगोटी करून, शिंगांना गेरू लावून, पितळी शिंगटोपी आणि गळ्यात घुंगरूमाळा घालून सजवण्यात आले होते. बैलांच्या अंगावर सुंदर नक्षीकाम केलेली झूल टाकून मिरवणूक काढण्यात आली.

सकाळपासूनच खांबाळा आणि बेलवाडी येथील शेतकऱ्यांनी आपापल्या बैलांच्या जोड्या घेऊन मिरवणुकीने शहरातील प्रमुख मार्गावरून प्रदक्षिणा घातली. ही मिरवणूक बघण्यासाठी शहरवासीयांनी मोठी गर्दी केली होती. लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या उत्साहात या मिरवणुकीचे स्वागत करत होते. शहरातील मुख्य चौक आणि रस्त्यांवर नागरिकांनी मिरवणुकीचे स्वागत केले.

मिरवणूक खटकाळी हनुमान मंदिरापर्यंत पोहोचल्यावर तिथे बैलांची विधिवत पूजा करण्यात आली. मंदिराच्या आवारात बैलांना नैवेद्य दाखवून त्यांची आरती करण्यात आली. शेतकऱ्यांनी आपल्या समृद्धीसाठी आणि शेतीच्या भरभराटीसाठी मारुतीरायाला साकडे घातले.

बेलवाडी येथील एका शेतकऱ्याने सांगितले, पोळा हा शेतकऱ्यांचा सर्वात महत्त्वाचा सण आहे. या दिवशी आपण बैलांप्रति कृतज्ञता व्यक्त करतो. हे बैल वर्षभर शेतात आपल्यासोबत काम करतात आणि म्हणूनच ते आपल्या कुटुंबाचाच एक भाग आहेत.

अंबाळा येथील एका शेतकऱ्याने सांगितले की, दरवर्षी करीच्या दिवशी खटकाळी हनुमान मंदिरात येण्याची आमची जुनी परंपरा आहे. इथे बैलांची पूजा केल्याने आम्हाला एक वेगळाच आनंद मिळतो. ही परंपरा आमच्या पूर्वजांनी सुरू केली आहे आणि आम्ही ती पुढे चालवत आहोत.

# १०० कोटी खर्च करून बांधलेला रेल्वे उड्डाणपूलावर खड्डे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ ऑगस्ट**

शहरातील खटकाळी बायपासकडे जाणाऱ्या भारतरत्न स्व. नानाजी देशमुख रेल्वे उड्डाणपूलासाठी १०० कोटीपेक्षा जास्त खर्च करण्यात आले मात्र दोनच वर्षात या पूलावर जागोजागी खड्डे पडले असून हा पूल धोकादायक बनत चालला आहे. जीव मुठीत धरून नागरिक या पूलावरून ये-जा करीत आहेत. पूल अरूंद असल्यामुळे अनेकवेळा वाहतुकीची कोंडीही होत आहे.

शहरातून जाणाऱ्या रेल्वे विभागाच्या १४४बी या विशेष रेल्वे गेटवर वाहतुक वारंवार ठप्प होत होती. त्यामुळे याठिकाणी उड्डाणपूल उभारणी करून वाहनचालकांची गैरसोय दूर करावी अशी मागणी केली जात होती. त्यानुसार या ठिकाणी रेल्वे उड्डाणपूलाचे रेल्वे खात्याच्यावतीने काम करण्यात आले. दोन वर्षापूर्वी या उड्डाणपूलाच्या बांधकामाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, तत्कालीन मुखयमंत्री एकनाथ शिंदे यांचेहस्ते ऑनलाईन उद्घाटन करण्यात आले. मात्र उद्घाटन होऊन दोन वर्षातच उड्डाणपूलावर जागोजागी खड्डे पडले आहेत तर एका ठिकाणी जाँईंटवर हा रस्ता खचला आहे. या रस्त्यावर वाहनचालकांना वाहने चालवितांना तारेवरची कसरत करावी लागते.

नांदेडकडे जाणारी अवजवड वाहने, बसेस तसेच शहरात जाणारी वाहतुक या पूलावरून जात असल्यामुळे रस्त्याची पार दुर्दशा झाली आहे. पूलाची रूंदी कमी असल्यामुळे अनेक वेळा वाहतुकीची कोंडी होत असून अपघातही होत आहेत. त्यात खड्डे झाल्यामुळे पावसाचे पाणी पूलावर जात असतांना दोन ते ठिकाणी साचत असल्यामुळे वाहन चालकांना खड्ड्यांचा अंदाज येत नाही. पूल बांधकाम झाल्यानतर दुरूस्तीच्या नावाखाली दोन ते तीन वेळा हा पूल बंद करण्यात आला होता. परंतु त्यानंतरही पूलाची दुरावस्था कशी होते, बांधकामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे या पूलावर १०० कोटीपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे.

या उड्डाणपूलाच्या खालच्या बाजूला नव्याने रस्त्याचे बांधकाम करण्यात आले आहे. मात्र रस्ता पूर्ण होऊन चार महिन्याचा कालावधी लोटल्यानंतरही रस्ता सुरू करण्यात आला नाही. रेल्वे विभागाने उड्डाणपूलावरील रस्ता तत्काळ दुरूस्त करावा अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

# औंढा नागनाथ येथे पोळा सण उत्साहात, हिंगोलीत मिरवणुका

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ ऑगस्ट**



औंढा नागनाथ शहरातील हरिहर तलावाच्या काठावर असलेल्या हनुमान मंदिर या ठिकाणी पाच वाजता सर्व शेतकरी बांधवांनी आपल्या बैलजोडींना साज घालून वाजत गाजत त्या ठिकाणी आणण्यात आले. बैलजोडीस झूल घातली जाते. सर्व अंगावर रंगाचे ठिपके उमटवले जातात. कपाळावर बाशींग आणि शिंगांमध्ये शेंब्या, गळ्यात कवड्याच्या-घुंगराच्या माळा,नाकात नवी वेसण, कासरा घातली जाते. पुरणपोळीचा सुग्रास नैव्येद्य दाखवला जातो. बैल पोळ्याच्या सणाला शेतकरी आणि गावकऱ्यांमध्ये एक वेगळाच उत्साह असतो. प्रत्येकजण आपापल्या परीस्थितीनुसार बैलाचा साजश्रृंगार करतात. बैलांची गावातून ढोल- ताशाच्या गजरात मिरवणूक काढतात. तसेच, गावच्या प्रमुख देवळात जाऊन देवाचे दर्शनही बैलांना घडवून आणले जाते. या दिवशी शेतकरीराजा प्रत्येक घरासमोर आंब्यांच्या पानाचे तोरण बांधतात. हरिहर तलावच्या काठावरील हनुमान मंदिरामध्ये बैलपोळा भरला होता. त्या ठिकाणी दत्तमठाचे महंत शाम गिरीजी महाराज व राजू गिरी महाराज यांनी बैलाचे पूजन केल्यानंतर शंखनाद झाला व बैलपोळा फुटला. त्यानंतर सर्व बैलजोड्यांची शहरातून मिरवणूक काढण्यात आली. शहरातील पोळा सणास पोलीस निरीक्षक जी एस राहिरे यांनी बंदोबस्त दिला होता.

हिंगोली शहरातही कर सणानिमित्त बैलांना सजवून त्यांच्या ढोल ताशांच्या गजरात मिरवणुका काढण्यात आल्या. यावेळी विविध प्रात्यक्षिके सादर करण्यात आली



**हिंगोली- अवघ्या काही दिवसांवर श्री गणरायांचे आगमन होणार असून कारागिरांनी गणरायांच्या सुबक, आकर्षक मूर्ती तयार केल्या असून या मूर्तीवरून शेवटचा हात फिरवतांना दिसत आहेत. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### यंदा १ लाख ५१ हजार मोदकांचे वाटप



हिंगोली- श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपती मंदिर हिंगोली येथील वार्षिक उत्सव दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मोठ्या उत्साहात साजरा करण्याचे विश्वस्त मंडळाने ठरविले आहे. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी सायंकाळची आरती नंतर मोदक वाटप करण्यात येणार आहेत. दरवर्षी प्रमाणे सभामंडप, दर्शन मंडप, बॅरिकेटिंग, सीसीटीव्ही, कॅमेरे, व्हिडिओ कॅमेरे, विद्युत रोषणाई, मोदक इत्यादीचे नियमाप्रमाणे टेंडर काढून सर्वांना वाटप करून रीतसर काम देण्यात आली आहेत. तसेच यावर्षी एक लाख ५१ हजार मोदक वाटप करण्याचे विश्वस्त मंडळाने ठरविले आहे *या शिवाय, दरवर्षी प्रमाणे याही वर्षे सायंकाळच्या आरती नंतर मोदक वाटप करण्यात येणार आहेत* तसेच परंपरेनुसार आनंद चतुर्दशीच्या दिवशी मोठ्या प्रमाणात मोदकाचे वाटप केल्या जाणार आहेत. बाहेरगावचे दर्शनासाठी येणाऱ्या सर्व भाविकांचे भोजनाची व्यवस्था मंदिर समितीच्या वतीने दर रोज करण्यात आलेली आहे. त्यासाठी लागणारे सर्व व्यवस्था विश्वस्त मंडळाने केलेली आहे. या कार्यक्रमासाठी महसूल विभाग, गृह विभाग, आरोग्य विभाग, नगर परिषद विभाग, तसेच महावितरण या सर्वांचे सहकार्य लाभणार आहे.

### जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी अंतिम प्रभाग रचना जाहीर

हिंगोली- राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या प्रधान सचिव यांच्या १२ जून २०२५ रोजीच्या आदेशानुसार हिंगोली जिल्हा परिषदेच्या ५२ जागा आणि त्याअंतर्गत सर्व पंचायत समित्यांच्या १०४ जागांसाठी निवडणूक प्रभाग रचनेचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार आज दि. २२ ऑगस्ट २०२५ रोजी अंतिम प्रभाग रचनेची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिद्ध होणार आहे. ही अधिसूचना हिंगोली जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली जिल्हा परिषद कार्यालय, सर्व उपविभागीय कार्यालये, सर्व तहसील कार्यालये आणि सर्व पंचायत समिती कार्यालयांतील फलकांवर नागरिकांच्या अवलोकनासाठी उपलब्ध असेल. सर्व संबंधितांनी अंतिम प्रभाग रचनेचे अवलोकन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे.

### ९ ठिकाणी अवैधदारू विक्रीवर छापे

हिंगोली- दारू बंदी कायद्यांतर्गत पोलिस विभागाने ९ ठिकाणी अवैधदारू विक्री करणाऱ्या ठिकाणी छापे मारले असून ७० हजार ५६० किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# जनावरे चोरणारी आंतरजिल्हा टोळी स्थानिक गुन्हे शाखेकडून जेरबंद



**तभा वृत्तसेवा**
**वसमत २३ ऑगस्ट**

हिंगोली, नांदेडसह तेलंगणा राज्यातून जनावरे चोरी करणारी आंतरजिल्हा टोळी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केली असून या प्रकरणात भिवंडी येथील दोघे तर नांदेड येथील एकास अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून इनोव्हा कार व १ लाख ३१ हजार रूपये रोख असा एकूण १६ लाखांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

पोलिसांनी दिलेली माहितीनुसार हिंगोली जिल्ह्यात शेतकऱ्यांचे पशुधन गोरे ढोरे चोरी संदर्भाने गुन्ह्यास प्रतिबंध करून गुन्हे दाखल करण्यास हिंगोली जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मोहन भोसले यांना सूचना देऊन विशेष पथक नेमून उघड करण्यास सांगितले त्या अनुषंगाने सहायक पोलीस निरीक्षक घेवारे यांचे पथक पशुधन चोरीच्या गुन्हाया संबंधाने तपास सुरू केले.ही टोळी रोडलगत आखाड्यांवर चरायला आणलेल्या शेतकऱ्यांच्या जनावरांवर बारीक नजर ठेवून चपळाईने रात्रीच्या अंधारात जनावरे उचलून नेत असे. या टोळीच्या हालचालींबाबत सतत तक्रारी येत होत्या. त्यामुळे स्थानिक गुन्हे शाखेने गुप्त माहितीदारांचे जाळे पसरवले. रात्रीच्या वेळी लपून छपून केलेल्या हालचालींवर पोलिसांनी नजर ठेवली आणि योग्य क्षणी सापळा रचून टोळीला गाठले. या कारवाईत तब्बल १६ लाख ३१ हजारांचा मुद्देमाल जप्त झाला आहे. फक्त हिंगोलीच नाही तर नांदेड आणि शेजारील तेलंगण राज्यातही या टोळीने अनेक गुन्हे केल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. या एका धडक ऑपरेशनमुळे हिंगोली जिल्ह्यातील ०६ मोठे गुन्हे उघडकीस आले आहेत.

सदर गुन्ह्यातील आरोपी रिजवान इस्तेखान भिवंडी, फिरोज मुस्ताक अन्सारी भिवंडी, शेख नबी शेख नन्नू नांदेड, सय्यद सोहेल फारुख पटेल नांदेड, शेख जमीर शेख सलीम, शेख मुर्तुजा अब्दुल सत्तार नांदेड भिवंडी, अक्रम उर्फ शिवा दादा, सय्यद अबू फारूक पटेल नांदेड, नूर मोहम्मद कच्ची पनवेल, शेख अश्रफ मनोर पालघर, शेख शफी बागवान बिल्डर नांदेड, राजू उर्फ शारेख नांदेड, मोहम्मद फैजान उर्फ गोलू नांदेड, जम्मू नांदेड, यांनी हिंगोली नांदेड तेलंगाना, राज्यातून रोड लगत आखाड्यावर बांधलेले जनावरांना भूल चे इंजेक्शन देऊन इनोवा, महिंद्रा, डिझायर कारमध्ये प्रेस व पोलीस असे पाटी लावून जनावरांची तस्करी करून देगलूर नाका दूधडेरी भागातील सोहेल पटेल याचे गोडाऊनमध्ये जनावरांची कटाई करून मास विक्री करत असल्याचे निष्पन्न झाले आहे.

स्थानिक गुन्हे शाखेने पालघर, भिवंडी ठाणे, नांदेड भागात जाऊन आरोपीची माहिती घेऊन तीन जणांना ताब्यात घेतले आहे.

शेतकऱ्यांच्या उपजीविकेवर डल्ला मारणारी टोळीतिल सध्या तीन जण पोलिस कोठडीत धडधडत आहे. पोलिसांचा पुढील तपास सुरू असून, आणखी कित्येक जिल्ह्यातील गुन्हे या टोळीच्या नावावर उघड होण्याची दाट शक्यता आहे. या कारवाईनंतर शेतकरी वर्गात समाधानाची लाट उसळली असून, गुन्हे शाखेच्या धाडसी पथकाचे जिल्ह्यात सर्वत्र कौतुक होत आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलीस अधीक्षक कमलेश मीना पोलीस निरीक्षक मोहन भोसले यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवसंब घेवारे, भुजंग कोकरे, गजानन पोकळे, साईनाथ कंठे, हरिभाऊ गुंजकर, आकाश टापरे, ज्ञानेश्वर गोरे, नरेंद्र साळवे, दत्ता नागरे, प्रदीप झुंगरे, व इतवारा पोलीस स्टेशन नांदेड येथील पोलीस निरीक्षक रणजीत भोईटे यांचे पथकाने सुद्धा पकडण्यासाठी मोलाची मदत केली आहे.

# घरफोडी करणारा अट्टल गुन्हेगार अटकेत

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली २३ ऑगस्ट**

हिंगोली शहरासह ग्रामीण भागात घरफोडी करून मुद्देमाल पळविणाऱ्या अट्टल गुन्हेगारास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे. त्याच्याकडून १२ लाखांच्या मुद्देमालही जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार हिंगोली शहरातील बांगर नगर, गंगा नगर भागातील कुलूप असलेले घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी मुद्देमाल चोरून नेला होता. याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले होते. या घटनांच्या तपासासाठी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, पोनि मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली उपनि विक्रम विठुबोने यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देत पाहणी केली तसेच सीसीटीव्ही फुटेजवरून ओळख पटविण्याचा प्रयत्न केला.या प्रकरणात तालुक्यातील संतुक पिंपरी येथील दत्ता खांडेकर यास ताब्यात घेण्यात आले. त्याची अधिक चौकशी केली असता त्याच्याकडून गुन्ह्यात वापरलेली दुचाकी, एक बॅटरी, टोमी व सोन्या चांदीचे दागिने असा १२ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीची अधिक चौकशी सुरू असून त्याच्या साथीदारांचा शोध पथके करीत आहेत. घरफोडीचे आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे

# कोंढूर दिग्रस येथे अतिवृष्टीमुळे मोसंबी पिकांचे मोठे नुकसान, महसुल, कृषी विभागाकडून पंचनामा

**तभा वृत्तसेवा**
**कळमनुरी, २३ ऑगस्ट**



तालुक्यातील कोंढुर डिग्रस येथे मोठ्या प्रमाणावर मागील तीन ते चार दिवसांपूर्वी वादळी वाऱ्यासह अतिवृष्टी होऊन शेत पिके खरडून गेली आहे. तर विविध झाडासह मोसंबी फळांच्या झाडांचे नुकसान झाले असून मोसंबीच्या झाडाखाली फळांचा सडा पडल्याने या नुकसानग्रस्त शेतकरी ज्ञानेश्वर शेषराव पतंगे, विश्वजीत पतंगे यांच्या गट नंबर ३५ मध्ये महसूल व कृषी विभागाच्या पथकाने २१ ऑगस्ट रोजी पंचनामे करून नुकसानीचा अहवाल प्रशासनाकडे पाठविला जाणार असल्याचे तलाठी जगदीश कुलकर्णी यांनी सांगितले. या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची मागणी केली जात आहे.

कळमनुरी तालुक्यात मोठ्या प्रमाणावर मागील तीन ते चार दिवसांपूर्वी अतिवृष्टी होऊन शेत पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. तसेच हळू उत्पादक शेतकऱ्यांच्या फळासह झाडांचे सुद्धा नुकसान झाल्याने तालुक्यातील कोंढुर दिग्रस येथील शेतकरी ज्ञानेश्वर शेषराव पतंगे व विश्वजीत पतंगे यांच्या शेत गट क्रमांक ३५ या क्षेत्रातील चार हेक्टर वर मोसंबी इतर विविध झाडांची लागवड केली होती. परंतु मागील तीन-चार दिवसांपूर्वी ऑगस्ट महिन्यात मुसळधार पाऊस व वादळी वाऱ्यात फळबागाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह कृषिमंत्र्यांनी नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पंचनामे करण्याचे आदेश दिल्यानंतर जिल्हा प्रशासनाने काही भागाला भेटी देऊन नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. तर कोंढुर दिग्रस येथील गट क्रमांक ३५ मध्ये तलाठी जगदीश कुलकर्णी, ग्रामपंचायत अधिकारी नंदकुमार मोरे, कृषी सहाय्यक कदम यांनी २१ ऑगस्ट रोजी शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन नुकसानीचे पंचनामे केले. यावेळी कोंढुर डिग्रस येथील शेतकरी ज्ञानेश्वर शेषराव पतंगे विश्वजीत पतंगे विद्या पतंगे आधीचे उपस्थिती होती. या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी केली जात आहे.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ध्वनी क्षेपक यंत्रणेसाठी परवानगी घेण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२३ ऑगस्ट -** लातूर शहर मनपा हद्दीतील सर्व गणेश मंडळांनी ध्वनीक्षेपक यंत्रणा बसविण्यासाठी परवानगी घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.

१) ध्वनी प्रदुषण नियम २००० मधील नियम ५ अधिनियम १ नुसार पूर्व परवानगीशिवाय ध्वनीक्षेपक यंत्रणा वापरता येणार नाही.

२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार पदपथ, रस्ते व पादचारी मार्ग नागरीकांना अडथळा विरहित राहिल याची खबरदारी घेवून संविधानाच्या कलम २१ नुसार विहित नागरिकांच्या मुलभूत हक्कांना बाधा येणार नाही. याची दक्षता घ्यावी.

३) जाहिरात फलक, फ्लेक्स, तात्पुरत्या स्वरुपात उभारण्यात येणाऱ्या मंडप व तत्सम रचना जवळ व त्याठिकाणी पूर्व परवानगी शिवाय लावण्यात येवू नयेत. ४) रस्त्यावर व पादचारी मार्गावर खोदण्यात येवू नये. ५) ध्वनी प्रदुषण नियमाच्या उल्लंघनाबाबत एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन २२०१००, शिवाजी नगर पोलीस स्टेशन २४३१००, गांधी चौक पोलीस स्टेशन २४२१००, विवेकानंद चौक पोलीस स्टेशन २५८१०० या नंबर वर तक्रारी दाखल करता येतील. ६) आयोजकांनी महानगरपालिकेव्दारे देण्यात आलेल्या परवानगीची प्रत ठळक पणे दर्शनी ठिकाणी कार्यक्रम स्थळी लावणे आयोजकांवर बंधनकारक असेल.

वरील नमुद करण्यात आलेल्या सर्व बाबींचे गणेश मंडळांने काटेकोरपणे पालन करण्यात यावे जेणे करुन जनहित याचिका क्र. १७३/२०१० मधील निर्देशांचे अवमान होणार नाही. यांची सर्वांनी नोंद घ्यावी. लातूर जिल्ह्यातील गणेश मंडळांनी नागरिकांची गैरसोय होऊन नेय याकडेही लक्ष देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### संक्षिप्त वृत्त...

## वैद्यकीय रुग्णालयाचा बाह्यरुग्ण विभाग दोन दिवस बंद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२३ ऑगस्ट -** गणेश चतुर्थी असल्याने बुधवार, २७ ऑगस्ट, २०२५, तसेच सोमवार, १ सप्टेंबर, २०२५ रोजी जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार ज्येष्ठागौरी पूजननिमित्त स्थानिक सुट्टी जाहीर करण्यात आल्याने या दोन्ही दिवशी विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग बंद राहील.

मात्र, रविवार, दिनांक ३१ ऑगस्ट, २०२५ रोजी बाह्यरुग्ण विभाग सुरु राहील. तसेच मंगळवार, २ सप्टेंबर, २०२५ पासून बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी) नियमित वेळेप्रमाणे सुरु राहील, असे लातूर येथील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन जाधव यांनी कळविले आहे.

## जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे २ सप्टेंबर रोजी आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२३ ऑगस्ट -** प्रत्येकी महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते, तथापि माहे सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या सोमवारी म्हणजेच १ सप्टेंबर, २०२५ रोजी ज्येष्ठ गौरीपूजनाची सुट्टी असल्यामुळे सप्टेंबर, २०२५ मधील जिल्हास्तरीय लोकशाही दिन मंगळवार, २ सप्टेंबर, २०२५ रोजी दुपारी १ वाजता लातूर जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित करण्यात आला आहे.

## देशमुख फाउंडेशन कडून बाभळगाव येथे सुरु केलेल्या मोफत ब्यूटी प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२३ ऑगस्ट -** विलासराव देशमुख फाऊंडेशन च्या वतीने बाभळगाव येथे सुरू करण्यात आलेल्या मोफत ब्युटी पार्लर प्रशिक्षण केंद्रास विलास सहकारी साखर कारखाना चेअरमन श्रीमती वैशालीताई देशमुख यांनी भेट दिली तसेच प्रशिक्षणार्थी महिला भगिणीसोबत संवाद साधला.

विलासराव देशमुख फाउंडेशनने महिलांना स्वावलंबी बनविण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे.ट्वेंटीवन ग्रीच्या संचलिका सौ.अदिती अमित देशमुख यांच्या संकल्पनेतून ग्रामीण भागातील महीलांना स्वयंरोजगार आणि स्वावलंबनासाठी विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. या अंतर्गत बाभळगाव येथे विलासराव देशमुख फाऊंडेशनच्या वतीने महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी मोफत ब्युटी पार्लर प्रशिक्षण केंद्राची सुरूवात करण्यात आली असून या केंद्रास विलास सहकारी साखर कारखाना चेअरमन श्रीमती वैशालीताई देशमुख यांनी सदिच्छा भेट दिली आणि या ठिकाणी प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थी महिला भगिनीशी संवाद साधला व महिलांनी या प्रशिक्षणातून स्वतःच्या पायावर उभे रहावे व आपली आर्थिक प्रगती करून घ्यावी असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

## कला, क्रीडा, कार्यानुभव निदेशक नेमण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२३ ऑगस्ट -** अंशकालीन कला शिक्षक, क्रीडा शिक्षक व कार्यानुभव निदेशकांना आरटीई २००९ नुसार इयत्ता सहावी ते आठवीच्या ज्या उच्च प्राथमिक शाळांची विद्यार्थी पटसंख्या १०० पेक्षा जास्त आहे, त्या शाळेवर रूजू करण्याविषयी कळविण्यात आलेले आहे. आदेशाच्या अनुषंगाने, चाकूर तालुक्यातील लातूर रोड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत रूजू करण्यात आले आहे.

इयत्ता सहावी ते आठवीच्या वर्गाची १०० पेक्षा कमी पटसंख्या झाल्यास केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार त्या प्राथमिक शाळेस अंशकालीन निदेशकाचे पद भरता येणार नाही. त्या केंद्रात अंशकालीन निदेशकाची इतर उच्च प्राथमिक शाळेत आवश्यकतेनुसार नियुक्ती करता येते. त्यानुसार चाकूर तालुक्यातील नळेगाव जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळेत इयत्ता सहावी ते आठवीचा पट २०२४-२५ चा १०४ आहे. समायोजन करण्यासाठी गटशिक्षणाधिकारी, मुख्याध्यापकांना सीईओंनी सूचित करावे, अशी मागणी राजाराम घोषेवार, संगमेश्वर मोरखंडे, दैवशाला कांबळे यांनी केली आहे.

# जिल्हा परिषदेची अंतिम प्रभाग रचना जाहीर

## २७ पैकी ७ हरकती मान्य तर २० अमान्य

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२३ ऑगस्ट -** राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या प्रधान सचिव यांच्या १२ जून २०२५ रोजीच्या आदेशानुसार लातूर जिल्हा परिषदेच्या ५९ जागा आणि त्याअंतर्गत सर्व पंचायत समित्यांच्या ११८ जागांसाठी निवडणूक प्रभाग रचनेचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. दरम्यान, एकूण प्राप्त २७ पैकी ७ हरकती मान्य तर २० हरकती अमान्य करण्यात आल्या आहेत.

ही अधिसूचना लातूर जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर जिल्हा परिषद कार्यालय, सर्व उपविभागीय कार्यालये, सर्व तहसील कार्यालये आणि सर्व पंचायत समिती कार्यालयांतील फलकांवर नागरिकांच्या अवलोकनासाठी उपलब्ध असेल. सर्व संबंधितांनी अंतिम प्रभाग रचनेचे अवलोकन करावे, असे आवाहन लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्यावतीने करण्यात आले आहे.

लातूर जिल्हा परिषदेत ज्या गावाच्या नावाने गट जाहीर करण्यात आले आहेत त्यात खंडाळी, हडोळती, शिरूर ताजबंद, अंधोरी, किनगाव, सावरगाव रोकडा, वांजरवाडा, माळहिप्परगा, गुत्ती, वाढवणा (बु.), सोमनाथपूर, नळगीर, निडेबन, लोहारा, हेर, तोगरी, बोरोळ, वलांडी, जवळगा, येरोळ, साकोळ, जानवळ, चापोली, रोहिणा, वडवळ नागनाथ, नळेगाव, पानगाव, खरोळा, कामखेडा, पोहरेगाव, आर्वी, भातांग्री, महाराणा प्रतापनगर, पाखरसांगवी, हरंगुळ (बु.), काटगाव, तांदुळजा,




मुरूड, निवळी, एकुरगा, लोदगा, आलमला, खरोसा, लामजना, भादा, उजनी, आशिव, मातोळा, किल्लारी, निटूर, अंबुलगा (बु.), लांबोटा, दापका, हलगरा, औराद शहाजानी, मदनसुरी, सरवडी, कासार शिरसी व तांबाळा या गटांचा समावेश आहे.

अहमदपूर तालुक्यातील शिरूर ताजबंद गटात गण क्रमांक ६ मधील शिरूर ताजबंदमध्ये कोकणगा व जवळगा ही गावे समाविष्ट झाली आहेत. तसेच नांदुरा (बु.) व नांदुरा (खु.) ही गावे कमी झाली आहेत. सावरगाव रोकडा गटातील गण क्रमांक १२ हिप्परगा काजळमध्ये नांदुरा (खु.) व नांदुरा (बु.) ही गावे समाविष्ट झाली आहेत तर, उमरगा यल्लादेवी हे गाव कमी झाले आहे. शिरूर ताजबंद गटातील गण क्रमांक ५ वळसंगीमध्ये उमरगा यल्लादेवी हे गाव समाविष्ट झाले व कोकणगा, जवळगा ही गावे कमी झाली आहेत. लातूर तालुक्यातील गट क्रमांक ४० चे नाव चिंचोलीरावबाडी ऐवजी एकुर्गा असे बदल झाले. गण क्रमांक ८० चे नाव चिंचोलीरावबाडी ऐवजी अंकोली असे बदल झाले आहे.

निलंगा तालुक्यातील गट क्रमांक ५५ औराद शहाजानीतील बोरसुरी गण क्रमांक ११० मध्ये बेंडगा, जामगा, गुंजरगा, सोनखेड ही गावे समाविष्ट झाली आहेत तर चांदोरी, चांदोरीवाडी, वाक्सा ही गावे कमी झाली आहेत. मदनसुरी गट क्रमांक ५६ मधील गण क्रमांक १११ चिंचोली (स.) मध्ये हरीजवळगा, हैदरवाडी, चांदोरी, चांदोरीवाडी, वाक्सा ही गावे समाविष्ट झाली आहेत तर बेंडगा, जामगा, गुंजरगा, सोनखेड ही गावे कमी झाली आहेत.

सरवडी गट क्रमांक ५७ मधील कोकळगाव गण क्रमांक ११३ मधून शिंगनाळ हे गाव कमी झाले आहे. मदनसुरी गटातील गण क्रमांक ११२ मध्ये शिंगनाळ हे गाव समाविष्ट झाले आहे. गट क्रमांक ५० मधील गण क्रमांक ९९ पानचिंचोलीमधील दगडवाडी हे गाव गण क्रमांक १०४ शेडोळमध्ये समाविष्ट झाले आहे. एकूण प्राप्त २७ पैकी ७ हरकती मान्य तर २० हरकती अमान्य करण्यात आल्या आहेत.

## सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना घरगुती दराने वीजपुरवठा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२३ ऑगस्ट -** गणेशोत्सव व त्यापाठोपाठ येणाऱ्या नवरात्र उत्सवासाठी महावितरणकडून तात्पुरती वीजजोडणी देण्यात येत आहे. तसेच या तात्पुरत्या जोडणीच्या वीजवापरासाठी घरगुती वीजदर आकारण्यात येणार आहे. त्यामुळे सार्वजनिक गणेश मंडळांनी अधिकृत वीजजोडणी घेवूनच विघ्नहर्त्याचा उत्सव आनंदात साजरा करावा असे आवाहन लातूर परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री अरविंद बुलबुले यांनी केले आहे.

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने महावितरणच्या अखत्यारीतील सर्व धर्मीयांच्या सार्वजनिक उत्सवांना तात्पुरत्या वीजजोडणीसाठी घरगुती वीजुरवठयाच्या वीज दरानेच वीजदर निश्चित केले आहेत. त्यामुळे अनधिकृत वीज जोडणी टाळून गणेश उत्सव व इतर सार्वजनिक उत्सवा करिता अधिकृत वीजपुरवठा घ्यावा. गणेशोत्सवाच्या कालावधीत पावसाची शक्यता असल्याने गणेश मंडळांनी संभाव्य धोके टाळण्यासाठी वीजयंत्रणेची योग्य काळजी घ्यावी. मंडपाची व रोषणाईसाठी विद्युत व्यवस्था व संच मांडणी ही अधिकृत विद्युत कंत्राटदारांकडूनच करून घेणे आवश्यक आहे. गणेश उत्सव मंडपातील वीजयंत्रणेचे अर्थिंग सुस्थितीत असल्याची खात्री करून घ्यावी. मंडळाच्या अंतर्गत वायरचे इन्सूलेशन खराब झाल्यास अशा वायर्समधून मंडपाच्या लोखंडी पत्र्यांमध्ये किंवा ओल्या वस्तुंमध्ये विद्युत प्रवाह येऊ शकतो. असे महावितरणे सांगीतले आहे.

## एक हजार किलो प्लास्टिक कॅरिबॅग जप्त; पालिकेची कारवाई

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२३ ऑगस्ट -** विघटन होत नसल्याने प्रदूषणात भर घालणाऱ्या ५० मायक्रॉनपेक्षा कमी दर्जाच्या प्लास्टिक कॅरिबॅगला बंदी घालण्यात आली आहे. गुरुवारपासून महापालिकेच्यावतीने कारवाई मोहीम सुरू आहे. शुक्रवारीही कारवाई करण्यात आली.

दोन दिवसांत गंजगोलाईच्या विविध भागातून जवळपास एक हजार किलो प्लास्टिक कॅरिबॅग जप्त करण्यात आल्या. उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांच्या सूचनेवरून स्वच्छता व अतिक्रमणविरोधी पथकाने ही कारवाई केली. यावेळी विविध व्यावसायिकांना जवळपास सव्वा लाखाचा दंड लावण्यात आला.

राज्य शासनाने प्लॅस्टिक वापरास बंदी केलेली असतानाही शहरातील अनेक व्यावसायिक प्लास्टिक कॅरिबॅगचा मोठ्या प्रमाणावर वापर करीत असल्याचे दिसून येते. प्रत्येक



भाजी, फळ विक्रेत्यांसह मोठमोठे व्यावसायिकही ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या कॅरिबॅग वापरत आहेत. अशा कॅरिबॅग वापरास राज्य शासनाने बंदी घातली आहे. गुरुवारी सायंकाळपासून महापालिका आयुक्त मानसी मीना यांच्या आदेशाने उपायुक्त डॉ. खानसोळे यांच्या मार्गदर्शनात शहराच्या विविध भागात जाऊन व्यावसायिकांच्या दुकाने, हातगाडे यांच्यावरील कॅरिबॅग जप्त करण्यात आल्या. गुरुवारी गोलाईसह विविध भागातून सुमारे ५०० किलो तर शुक्रवारी ५५० किलो कॅरिबॅग जप्त करण्यात आल्या.

निरीक्षक रवी कांबळे, धोंडीबा सोनवणे, शिवराज शिंदे, अक्रम शिंदे यांच्या नेतृत्वात स्वच्छता व अतिक्रमण विभागाने शहरातील व्यापाऱ्यांना अनेकवेळा सांगूनही चोरट्या मार्गाने कॅरिबॅगचा वापर होत आहे. या विघटन न होणाऱ्या कॅरिबॅगमुळे कचरा होत आहे. अस्वच्छता पसरत आहे. त्याचप्रमाणे नाल्या तुंबत आहेत. यापुढे व्यावसायिकांनीच कॅरिबॅग ठेवणे बंद करावे. नागरिकांनी घराबाहेर पडताना स्वतःची कापडी पिशवी सोबत ठेवावी, कॅरिबॅग वापरणाऱ्यांवर आतापर्यंत केवळ दंड लावण्यात आला आहे. यापुढे थेट गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत, अशी माहिती उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांनी दिली आहे.

## लातुरातील लाडक्या बहिणींचा 'देवाभाऊ'ला आशीर्वाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२३ ऑगस्ट -** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लाडक्या बहिणींना आर्थिक स्वावलंबी करत त्यांना जगण्याचे बळ दिले, त्यांचा सन्मान वाढवला. या भावनेतून लातूर जिल्ह्यातील हजारो बहिणींनी आपले लाडके 'देवाभाऊ' यांना रक्षाबंधननिमित्त राख्यांच्या माध्यमातून भरभरुन आशीर्वाद दिले आहेत, असे प्रतिपादन माजी मंत्री तथा भाजपचे लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील यांनी केले.

भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या संकल्पनेतून राज्यात रक्षाबंधन अभियान राबवण्यात आले. लातूर जिल्ह्यात मराठवाड्यातील सर्वाधिक ५२



हजार राख्यांचे संकलन महिला मोर्चातर्फे करण्यात आले. संकलित राख्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविण्यासाठी लातूर येथील भाजप लातूर ग्रामीण जिल्हा कार्यालयात गुरुवारी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी बसवराज पाटील हे अध्यक्षीय भाषणात बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे राज्य कृषिमूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, माजी सभापती नीळकंठ मिरकले, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमोल निडवदे यांची उपस्थिती होती.

यावेळी बसवराज पाटील म्हणाले, महायुती सरकार सत्तेत येण्यास लाडक्या बहिणींचा सिंहाचा वाटा आहे. लाडक्या बहिनींच्या 'देवाभाऊ'नी महिलांना आर्थिक स्वावलंबी करुन त्यांचा सन्मान वाढवला. त्यामुळे लाडक्या देवाभाऊला आशीर्वाद देण्यासाठी जिल्हाभरातून हजारो लाडक्या बहिणी राखी पाठवत आहेत. या राख्यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विकसित महाराष्ट्र करण्यासाठी बळ व ऊर्जा मिळेल, असे पाटील म्हणाले. महिला मोर्चा अध्यक्षा तथा रक्षाबंधन अभियानच्या जिल्हा संयोजक उत्तरा कलबुर्गे यांनी सर्वांना सोबत घेऊन मराठवाड्यात सर्वाधिक राख्यांचे संकलन केले. याबद्दल सर्व महिला पदाधिकाऱ्यांचे बसवराज पाटील यांनी कौतुक केले. राखी संकलनास महिला पदाधिकाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. महिलांनी मानवजात वाचवण्यासाठी वृक्ष लागवड उपक्रम हाती घ्यावा, अशी अपेक्षा पाशा पटेल यांनी व्यक्त केली. सूत्रसंचालन उत्तरा कलबुर्गे यांनी केले तर आभार मंडळ अध्यक्ष सुनील सावळे यांनी मानले.

## मागासवर्ग आयोगाचे सदस्य दौऱ्यावर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२३ ऑगस्ट -** महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य प्रा. डॉ. गोविंद काळे मंगळवारी (दि. २६) लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत.

प्रा. डॉ. काळे यांच्या उपस्थितीत २६ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात १ ऑगस्ट २०२४ ते ऑगस्ट २०२५ या कालावधीत ओबीसी, एसबीसी, व्ही. जे., एन. टी., एसईबीसी, ईडब्ल्यूएस या संवर्गातील वितरीत केलेली जात प्रमाणपत्रे व जात वैधता प्रमाणपत्रे यांचा आढावा घेतला जाणार आहे.

## कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या हक्कांसाठी काँग्रेस शासनाशी भिडणार

### जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२३ ऑगस्ट -** सार्वजनिक आरोग्य विभागात कंत्राटी तत्वावर काम करणारे लातूर जिल्ह्यात सुमारे ९५० अधिकारी व कर्मचारी यांनी मंगळवारपासून आपल्या विविध मागण्यांसाठी संविधानिक मार्गाने बेमुदत आंदोलन पुकारले आहे. शुक्रवारी या आंदोलनाच्या चौथ्या दिवशी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी लातूर जिल्हा परिषदेच्या आवारातील आंदोलनस्थळी भेट देऊन आंदोलनास काँग्रेस पक्षाचा पाठिंबा जाहीर केला.

१४ मार्च २०२४ च्या शासन निर्णयाची तत्काळ अंमलबजावणी करणे, वेतनवाढ, बोनस, विमा धोरण, बदली धोरण, समायोजन आणि प्रलंबित मानधन आदी मागण्यांसाठी राज्यभरात राष्ट्रीय आरोग्य अभियान अधिकारी व




कर्मचारी एकत्रीकरण समिती महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने बेमुदत कामबंद आंदोलन सुरू असून, त्याचाच भाग म्हणून लातूर जिल्हा परिषदेच्या आवारात १९ ऑगस्ट २०२५ पासून आरोग्य विभागातील कंत्राटी अधिकारी व कर्मचारी आंदोलनात सहभागी झाले आहेत. जिल्ह्यातील आरोग्य सेवा विस्कळीत होत असल्याने शासनाने तत्काळ या आंदोलनाची दखल घ्यावी, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे.

शुक्रवारी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी आंदोलनस्थळी कर्मचाऱ्यांच्या मागण्या जाणून घेऊन त्या अनुषंगाने जिल्हा काँग्रेस पक्ष न्याय व हक्कासाठी आपल्यासोबत असून, राज्य पातळीवरही पक्षाचा या आंदोलनास पाठिंबा मिळवून देण्यासाठी पुढाकार घेऊन राज्य शासनास या आंदोलनाची दखल घेण्यास भाग पाडू. या आंदोलकांच्या मागण्याची शासनाने त्वरित दखल न घेतल्यास प्रसंगी काँग्रेस पक्ष शासनास संविधानिक मार्गाने भिडण्याची भूमिका घेईल, असे आश्वासन साळुंके यांनी दिले.

यावेळी जिल्हास्तरीय एकत्रीकरण समितीचे हेमंत सोळुंखे, अबरार मोहसीन, गिरीश कुलकर्णी, डॉ. अशुकेत वैरागे, संगिता डवरी, आनंद दिवे, संदीप त्रिकोळीकर, ओमप्रकाश सोनवणे, पांडुरंग मुळे, पूजा पाटील, बालिका बिराजदार यांच्यासह जिल्ह्यातील कंत्राटी अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'केशवराज'मध्ये पोळा व मातृदिन कार्यक्रम उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२३ ऑगस्ट -** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात दि. २२ ऑगस्ट रोजी पोळा व मातृदिन हा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे तर प्रमुख पाहुणे म्हणून पर्यवेक्षक धनंजय कुलकर्णी तसेच अंजली पाटील, विद्या आचार्य, अंबिका पाटील, जयश्री भांदर्गे या माता पालकांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाची सुरुवात माता सरस्वती आणि शेतकऱ्यांचा आधार असलेल्या बैलांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे विद्यालयाचे पर्यवेक्षक धनंजय कुलकर्णी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना असे म्हणाले, की मातृदेवो भव! पितृदेवो भव! आचार्यदेवो भव! हे जगातील सर्वात शक्तिशाली शब्द आहेत. आईचे महात्म्य सांगताना त्यांनी स्वर्ग आणि तेहतीस कोटी देव हे आईच्या चरणात आहेत, त्यामुळे जो नित्य या चरणांचे दर्शन घेतो त्याला हे सर्व प्राप्त होते, असे सांगितले.

अध्यक्षीय समारोपात विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे यांनी आजचा दिवस हा बैलाची पूजा करून आदरभाव व्यक्त करण्याचा दिवस आहे. बैल हे सर्व प्रकारची कामे करून शेतकऱ्यांचा आधार होण्याचे कार्य करतात, असे सांगितले. ज्यांना आई-वडील आहेत तेच जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती आहेत, त्यामुळे आई-वडिलांचा नेहमी आदर करावा असे सांगून आईची समर्पित भावना विद्यार्थ्यांनी लक्षात घ्यावी, असे आवाहन याप्रसंगी त्यांनी केले.

सोलापूर तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

https://epaper.dainiktarunbharat.com

# जिल्हाधिकाऱ्यांनी केली पीक नुकसानीची पाहणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २३ ऑगस्ट -**

मागील आठवडयात नांदेड जिल्ह्यात सतत पाऊस व अतिवृष्टी होवून अनेक हेक्टर शेतीतील पिके पाण्याखाली गेली आहेत. शेतात पाणी साचल्यामुळे व पैनगंगा नदीच्या पुरामुळे किनवट तालुक्यातील अनेक गावांना पुराचा फटका बसला आहे. या पिकांच्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी आज किनवट तालुक्यातील भंडारवाडी, पिंप्री या गावांना भेट देवून पाहणी केली व शेतकऱ्यांशी संवाद साधला.



यावेळी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी जेनित चन्द्रा दोन्तुला, तालुका कृषी अधिकारी चंद्रकांत निमोड, नायब तहसिलदार फोले, कृषी विभागाचे अधिकारी, परिसरातील शेतकरी आदींची उपस्थिती होती.

किनवट तालुक्यात पैनगंगा नदीच्या पुरामुळे नदीकाठच्या गावात पूरपरिस्थिती निर्माण होवून कापूस, सोयाबिन व इतर पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीचे पंचनामे सुरु असून ते तात्काळ पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले. तसेच यावेळी त्यांनी किती टक्के पंचनामे करण्याचे काम पूर्ण झाले आहे यांचा आढावा घेतला. तसेच सहस्त्रकुंड धबधबा येथे पाहणी करुन तेथील परिस्थितीचा आढावा घेतला.

# पालकमंत्री अतुल सावे नांदेड दौऱ्यावर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २३ ऑगस्ट -**

राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे हे नांदेड दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील.

रविवार २४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९ वा. छत्रपती संभाजीनगर येथून वाहनाने शासकीय विश्रामगृह नांदेड येथे आगमन व राखीव. सकाळी १० वा. अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीच्या अनुषंगाने बैठक. स्थळ: शासकीय विश्रामगृह, नांदेड. सकाळी ११ वा. शासकीय विश्रामगृह, नांदेड येथून हसनाळ ता. मुखेड जि. नांदेडकडे वाहनाने प्रयाण. दुपारी १२ वा. हसनाळ ता. मुखेड येथे आगमन व अतिवृष्टी झालेल्या भागाची पाहणी. दुपारी १२.४५ वा. हसनाळ येथून रावणगाव ता. मुखेडकडे वाहनाने प्रयाण. दुपारी १.१५ वा. रावणगाव ता. मुखेड जि. नांदेड येथे आगमन व अतिवृष्टी झालेल्या भागाची पाहणी. दुपारी १.४५ वा. रावणगाव येथून मुक्रमाबादकडे वाहनाने प्रयाण. दुपारी २ वा. मुक्रमाबाद ता. मुखेड जि. नांदेड येथे आगमन व अतिवृष्टी झालेल्या भागाची पाहणी. सोईनुसार मुक्रमाबाद ता. मुखेड येथून शासकीय विश्रामगृह, नांदेडकडे वाहनाने प्रयाण. सोईनुसार शासकीय विश्रामगृह नांदेड येथे आगमन व राखीव. सोईनुसार शासकीय विश्रामगृह नांदेड येथून छत्रपती संभाजीनगरकडे वाहनाने प्रयाण करतील.



## संक्षिप्त वृत्त

### पत्रकार गंगाधर सोनटक्के यांना पत्रकारिता पुरस्कार जाहीर

**अर्धापूर-** तालुक्यातील लोणी (बु.) येथील रहिवासी,पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते गंगाधर सोनटक्के यांना गुरु रविदास चॅरिटेबल ट्रस्ट परभणी व आदित्य सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व राज्यस्तरीय समाज भूषण पुरस्कार सोहळ्याचे आयोजन दिनांक २४ ऑगस्ट २०२५ रोजी करण्यात आले. असून या कार्यक्रमात पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते गंगाधर सोनटक्के यांना पत्रकारिता पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. आपल्या लेखणीच्या माध्यमातून त्यांनी आजपर्यंत पीडित,शोषित घटकांना न्याय मिळवून देण्याची मोठी भूमिका पार पाडली. असून त्यांच्या या कार्याची दखल घेऊन मा.ना .मेघना बोर्डीकर राज्यमंत्री महिला व बालकल्याण मंत्री यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.यापूर्वी त्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजरत्न पुरस्कार, राष्ट्रीय समाजभूषण पुरस्कार, व संत कबीर राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. आता त्यांना दिनांक २४ ऑगस्ट २०२५ रोजी बी. रघुनाथ सभागृह एसपी ऑफिस समोर वसमत रोड परभणी या ठिकाणी एक चौथा पुरस्कार प्रदान होणार असून या कार्यक्रमाचे अध्यक्ष व राष्ट्रीय चर्मकार विकास महासंघाचे संस्थापक अध्यक्ष आणि आदित्य सेवाभावी संस्था परभणीचे अध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न होणार असून पत्रकार गंगाधर सोनटक्के यांना पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे सर्वच स्तरातून कौतुक करून अभिनंदन केल्या जात आहे.



### मुदखेड तालुक्यात सचिन साठे यांच्या हस्ते नाम फलकाचे अनावरण

**मुदखेड-** लोकशाहीर डॉ अण्णा भाऊ साठे यांचे नातू तथा राष्ट्रीय अध्यक्ष सचिन साठे यांच्या उपस्थितीत मुदखेड तालुक्यात विविध गावांमध्ये संघटनेच्या नामफलकाचे अनावरण सोहळा दि.२४ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता पार पडणार असल्याची माहिती तालुका अध्यक्ष भुजंग गायकवाड यांनी दिली आहे. डॉ. अण्णा भाऊ साठे क्रांती सेना मुदखेडच्या वतीने डॉ अण्णा भाऊ साठे क्रांती सेने च्या नामफलकाचे अनावरण सोहळा देरेगांव, माळकोठा, चिकाळा या गावांमध्ये आयोजित केला आहे. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय अध्यक्ष सचिन साठे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे, त्याच बरोबर जिल्हाध्यक्ष पंडित वाघमारे, मराठवाडा उपाध्यक्ष विलास झिंजोरे, जिल्हा उपाध्यक्ष द्रोपताताई कांबळे, जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद वाघमारे, जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी बोयणर, उमरी तालुका अध्यक्ष साहेबराव गव्हाळकर, मुदखेड तालुका अध्यक्ष भुजंग गायकवाड, ज्ञानेश्वर सोनटक्के, पुंडलीक सुर्यवंशी विश्वजित बारडकर, आदी उपस्थित राहणार आहेत.

### वैद्यकीय क्षेत्रात मानाचा टप्पा ; डॉ. शिवम जैस्वाल यांचे यश

**किनवट -**किनवट नगरीसाठी अभिमानास्पद ठरणारी बातमी म्हणजे येथील माजी उपनगराध्यक्ष मा. राघवेंद्र जैस्वाल व माजी नगरसेविका सौ ममता जैस्वाल यांचे चिरंजीव डॉ. शिवम राघवेंद्र जैस्वाल यांनी एम. बी.बी. एस. एफ.एम.जी. इ. इन इंडिया (Foreign Medical Graduate) ही परीक्षा प्रथम प्रयत्नात यशस्वीरित्या उत्तीर्ण केली आहे. या परीक्षेत यश संपादन करणे हे प्रत्येक वैद्यकीय विद्यार्थ्यासाठी एक मोठे पाऊल असून, डॉ. शिवम यांनी या टप्प्यावर विजय मिळवून आपल्या कुटुंबासह संपूर्ण किनवट शहराचा गौरव वाढविला आहे. कोरोना काळातील कठीण परिस्थिती आणि त्यानंतरच्या युक्रेन युद्धाच्या प्रतिकूल वातावरणातून बेलारूस या देशाच्या सीमारेषेवर जीव धोक्यात टाकून परत येऊन पुन्हा शिक्षण घेताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. परंतु चिकाटी, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर त्यांनी यश संपादन केले. त्यांच्या या यशामुळे किनवट नगरीत सर्वत्र आनंदाचे वातावरण असून, वैद्यकीय सेवेतून समाजाला दिलासा देण्याच्या त्यांच्या पुढील प्रवासासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. या अभूतपूर्व यशाबद्दल आमदार भिमराव केराम यांनी विशेष सत्कार करून डॉ. शिवम यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले तसेच त्यांच्या पुढील वैद्यकीय सेवेसाठी शुभेच्छा दिल्या. याशिवाय माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, माजी उपनगराध्यक्ष अनिल तिरमनवार, सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास नेम्मानिवार, यशवंत जाधव, सुनील राव मामा, स्वागत आयनेनिवार, देवराव तिरमनवार, आशिष नेम्मानिवार तसेच पत्रकार कचरू जोशी यांनी देखील डॉ. शिवम यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. डॉ. शिवम जैस्वाल यांचे यश हे केवळ वैयक्तिक नाही तर संपूर्ण परिसरातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणारे आहे. त्यांच्या या कार्यामुळे किनवटच्या तरुणाईला नवे बळ व नवी दिशा मिळणार असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले आहे.

### पक्षवाढीसाठी पदाधिकाऱ्यांनी एकजुटीने काम करा : रावणगावकर

**मुदखेड -**राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाची आढावा बैठक ओमकार गार्डन मंगल कार्यालयात प्रदेश सचिव दादाराव पा ढगे यांच्या नेतृत्वाखाली या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष (अजित) जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील रावणगांवकर यांनी आपल्या भाषणाच्या सुरुवातीला नांदेड जिल्ह्यांतील मुखेड तालुक्यांत झालेल्या अतिवृष्टीत मृत्यू पावलेल्यालांना सर्व प्रथम भावपुर्ण आदरांजली देण्यात आली यानंतर राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना सांगीतले आहे की पक्षात काम करीत असताना नविन जुने गट-तट करू नका पक्षवाढीसाठी काम करा तळागाळातील कार्यकर्त्या पासुन ते पदाधिकाऱ्यांपर्यत सर्व जन एक जुटीने काम केलात तर आगामी जिल्हा परिषद निवडणूक ग्राम पंचायत निवडणूक आणि नगर परिषद निवडणूकीत राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचा झेंडा फडकवल्या शिवाय राहणार नाही. तसेच राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी तालूका व शहर कार्यकारणी बरखास्त करण्यात येत आहे आणि लवकरच नवीन कार्यकारणी निवड करण्यात येईल असे रावणगावकर यांनी आढावा बैठकीत सांगीतले. या बैठकीला राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश सचिव दादाराव पाटील ढगे यांच्यासह पक्षाचे पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती पण या बैठकीला मुदखेड तालुका अध्यक्ष यांच्या सह निष्ठावंत कार्यकर्ते व पदाधिकाऱ्याने या आढावा बैठकीकडे पाठ फिरवली असल्याचे दिसून आले.

# प्राणिताताई देवरे यांचा वाढदिवस अतिवृष्टीमुळे साधेपणाने साजरा होणार

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २३ ऑगस्ट -**

जिल्ह्यात विशेषतः मुखेड व देगलूर भागात अतिवृष्टीमुळे शेतीचे मोठे नुकसान झाले आहे तसेच मुखेड भागात जीवितहानी झाली या नैसर्गिक आपत्तीच्या पार्श्वभूमीवर भाजपा प्रदेश महिला आघाडीच्या उपाध्यक्षा प्राणिताताई देवरे चिखलीकर याचा २४ रोजी होणारा वाढदिवस साधेपणाने साजरा करण्यात येणार आहे. लोहा कंधार येथील संपर्क कार्यालयात सदिच्छा भेटीसाठी उपस्थित राहणार आहेत .पुष्पहार ,शाली आणूनयेत त्या ऐवजी अतिवृष्टीग्रस्तभागात मदत करण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात आले आहे.



जिल्ह्यात भाजपा पक्ष संघटन तसेच सामाजिक कार्यात सदैव अग्रेसर असलेल्या महिला आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षा प्राणिताताई देवरे चिखलीकर एका दशका पासून जिल्ह्याच्या राजकारणातसक्रिय आहेत. जिल्ह्याच्या सर्व भागात जोरदार पाऊस झाला. पुरामुळे पिकांची मोठीहानी झाली. शेतकरी अडचणी सापडला आहे. विशेषतः मुखेड-देगलूर भागात अतिवृष्टीमुळे मोठी जीवित हानी झाली लोहा कंधार भागातही पावसामुळे शेतीपिकांची प्रचंड हानी झाली आहे.या सगळ्या पार्श्वभूमीवर तरुणाईच्या प्रेरणास्थान भाजपा नेत्या प्रणिताताई देवरे-चिखली यांचा २४ रोजी वाढदिवस आहे. कोणताही जल्लोष,हारतुरे, फटाके, याचा वापर न करता साधेपणाने वाढदिवस करण्यात येणार आहे.

# किनवटजवळ रेल्वे अंडरपाससाठी १२ कोटी २८ लाखांची मंजुरी

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २३ ऑगस्ट -**

किनवट अंबाडी मार्गावरील (KNVTBX) वाहतुकीच्या समस्येवर तोडगा निघाला आहे. रेल्वे मंत्रालयाने दक्षिण मध्य रेल्वेला मोठा दिलासा देत छ१२ कोटी २८ लाख रुपयांच्या सुधारित अंदाजपत्रकास मंजुरी दिली आहे. या मंजुरीनुसार, किलोमीटर ११७/२-३ येथे असलेल्या मॅन्ड लेव्हल क्रॉसिंग (LC) क्रमांक १२ च्या जागी मर्यादित उंचीचा सबवे (भुयारी मार्ग) बांधण्यात येणार आहे. तसेच किलोमीटर ११७/६-७ येथे अतिरिक्त वेंटवे (वायुवीजन मार्ग) उभारण्याची तरतूदही करण्यात आली आहे.



रेल्वे बोर्डाने वित्त संचालनालयाची संमती घेऊन ही मंजुरी अधिकृतपणे जाहीर केली आहे. लवकरच या महत्त्वाच्या कामास प्रत्यक्ष सुरुवात होणार असल्याची माहिती मिळाली आहे. या अंडरपासच्या कामामुळे किनवट शहरातील व परिसरातील नागरिकांना सुरक्षित व सुलभ पातळी ओलांडणीची सुविधा मिळणार आहे. सध्या डउ क्रमांक १२ मुळे वाहनचालक व पादचारी यांना वारंवार वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत होता. नव्या भुयारी मार्गामुळे नागरिकांचा वेळ वाचणार असून रेल्वे प्रवास आणि स्थानिक वाहतुक अधिक सुरक्षित होणार आहे.

**आमदार केराम यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा**

या प्रकल्पासाठी आमदार भिमराव केराम यांनी मागील काही काळापासून सतत प्रयत्न केले. त्यांनी संबंधित विभागाशी चर्चा, प्रस्ताव पाठविणे, पत्रव्यवहार यासह दिल्ली येथे रेल्वे अधिकाऱ्यांकडे सातत्याने पाठपुरावा केला. याशिवाय, त्यांनी राष्ट्रीय जनजाती आयोगासह स्थळ पाहणी करून आदिवासी गावे, स.वि.म परिसर तसेच किनवट रेल्वे ब्रीज संदर्भात वाहतुकीच्या समस्यांकडे अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले होते. अखेरीस त्यांच्या या अथक प्रयत्नांना यश मिळाले असून केंद्राकडून निधीची मंजुरी मिळाली आहे.

या मंजुरीचे स्थानिक नागरिकांनी स्वागत केले आहे. आता वाहतुकीच्या दीर्घकाळाच्या समस्येतून सुटका होणार असून सुरक्षित मार्ग उपलब्ध होणार आहे, असे नागरिकांनी सांगितले. तसेच, हे काम लवकर पूर्ण व्हावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे. या प्रकल्पामुळे किनवट परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, विकासाच्या दृष्टीने हा उपक्रम मैलाचा दगड ठरणार आहे.

# राज्यात ओला दुष्काळ जाहीर करा : समनक जनता पार्टी



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २३ ऑगस्ट -**

गत काही दिवसांपासून सुरु असलेल्या अतिवृष्टीत मोठ्या प्रमाणात शेतपिकांचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी पन्नास हजार रुपयांची मदत करा.व राज्यात ओला दुष्काळ जाहिर करावा अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मुखेड तहसीलदारांमार्फत समनक जनता पक्षाच्या वतीने आज करण्यात आली.

गत काही दिवसात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी सूरू असल्याने त्यासह विविध जनसमस्याबाबत मुखेड तहसीलदार राजेश जाधव यांची भेटि दरम्यान मागण्या करण्यात आले

मुखेड तालुका ओला दुष्काळ जाहीर करा,सरसकट सर्व शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयाची मदत तात्काळ जाहीर करा,नदी-नाल्यालगत शेत जमीन खरडून गेली त्या शेतकऱ्यांसाठी विशेष पॅकेज जाहीर करावे तसेच मुक्र माबाद लेंडी प्रकल्पातील पूरग्रस्ताना तात्काळ मदत करावी. त्याचबरोबर,सुरु असलेल्या अतिवृष्टीत जनतेत आरोग्याच्या समस्या होऊ नये यासाठी खबरदारी घ्यावी, गावपातळीवर अधिकारी-कर्मचारी मुख्यालयी वास्तव्यास राहणे बंधनकारक करावे. आदी विविध मागण्या निवेदनातून करण्यात आल्या.याबाबत तातडीने लक्ष द्यावे अन्यथा तीव्र जनआंदोलन उभारु असा इशारा देण्यात आला.

यावेळी समनक जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रा. निळू पवार, अमोल राठोड, शिवा राठोड, संदीप राठोड व मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते,शेतकरी, जनता उपस्थित होते.

# आर. पी. कोकरे गुरूजी यांना तुफानातील दिवे पुरस्कार् जाहीर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २३ ऑगस्ट -**

सहयोग नगर नांदेड येथील उपा. आर. पी. कोकरे गुरूजी यांना या वर्षाचा तुफानातील दिवे पुरस्कार वामनदादा कर्डक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष संजय निवडंगे यांनी घोषित केले आहे.

# हजरत गैबीपीर बाबा येथे सभामंडप आणि स्वच्छताग्रहाची मागणी

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २३ ऑगस्ट -**

मुदखेड शहरातील भोकर रोड लगद असलेल्या प्रसिद्ध हजरत गैबीपीर बाबा येथे सर्व जाती धर्माचे लोक हजारोच्या संख्येने भाविक येत असतात. दर्ग्याला दरवर्षी भाविकांची संख्या वाढत असल्यामुळे जागा कमी पडत आहे. त्यामुळे दर्गा येथे सभामंडप व परिसरात येणारे भाविक महिलांसाठी स्वच्छताग्रह बांधकामासाठी निधी उपल्बध करून देण्यात यावे म्हणून माजी नगरसेवक इम्रान सेठ मच्छीवाले यांनी या भागाचे आमदार श्रीजया चव्हाण यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे.



हजरत गैबीपीर बाबा येथे दरवर्षी पोळ्याच्या दिवशी संदल होत असते या ठिकाणी मराठवाड्यासह तेलंगाणा, आंध्रप्रदेश, येथून भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी येत असतात विशेष म्हणजे महिलांची उपस्थीती जास्त प्रमाणात असते.

यावेळी आमदार श्रीजया चव्हाण यांनी दि.२२ ऑगस्ट रोजी दर्ग्याला भेट दिली असता दर्गा कमिटीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला व त्यांना एक सभामंडप आणि महिलांसाठी स्वच्छताग्रह बांधकामासाठी आमदार निधीतुन निधी उपल्बध करून द्यावे अशी मागणी माजी नगरसेवक इम्रान सेठ मच्छीवाले यांनी केली आहे.

# पत्रकार महेंद्र गायकवाड यांची फेर निवड

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २३ ऑगस्ट -**

सेवाग्राम वर्धा येथे झालेल्या पत्रकार संरक्षण समितीच्या राज्यस्तरीय संमेलनात पत्रकार महेंद्र गायकवाड यांची पत्रकार संरक्षण समिती नांदेड जिल्हाध्यक्ष पदी फेर निवड करण्यात आली. सदरील नियुक्तीचे पत्र संस्थापक अध्यक्ष विनोद पत्रे व राज्य उपाध्यक्ष जेष्ठ पत्रकार राम खुर्दळ यांच्या हस्ते महेंद्र गायकवाड यांना देण्यात आले.

पत्रकार संरक्षण समिती हि संपूर्ण महाराष्ट्रात शहरी व ग्रामीण भागातील पत्रकारांच्या न्याय, हक्कासाठी लढणारी नोंदणीकृत संघटना असून या संघटनेचे राज्यस्तरीय संमेलन सेवाग्राम वर्धा येथे पार पडले. या संमेलनात पत्रकार महेंद्र गायकवाड यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांची जिल्हाध्यक्ष पदी फेर निवड करण्यात आली. जिल्हातील शहरी व ग्रामीण भागातील पत्रकारांच्या अनेक समस्या, प्रश्न गायकवाड यांनी सोडविल्या असून पत्रकारांच्या न्याय, हक्कासाठी ते नेहमी लढत असतात. पत्रकारांवरील अन्याय, हल्ला विरोधात ते नेहमी आवाज उठवीत असता त्यांच्या कार्याची दखल घेऊन पत्रकार संरक्षण समितीचे संस्थापक अध्यक्ष विनोद पत्रे यांनी गायकवाड यांना पुन्हा संधी देत त्यांची नांदेड जिल्हाध्यक्षपदी फेर नियुक्ती केली आहे.

संस्थापक अध्यक्ष विनोद पत्रे यांच्या सुचनेनुसार पत्रकार संरक्षण समितीची धर्माबाद व देगलूर तालुका कार्यकारिणी वगळता संपूर्ण जिल्ह्यातील तसेच जिल्हास्तरीय कार्यकारणी बरखास्त करण्यात आली असल्याची माहिती नूतन जिल्हाध्यक्ष महेंद्र गायकवाड यांनी दिली

# माहूर पोलीसांनी केले मोहफुलाचे रसायन जागीच नष्ट

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २३ ऑगस्ट -**

गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्था भंग होऊ नये, शांतता अबाधित राखण्यासाठी माहुर पोलिसांनी अवैध गावठी दारू विक्रेत्यांविरुद्ध धडक कारवाईचा बडगा उगारला आहे. पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी माहुर पोलीस ठाणे हद्दीतील मौजे हिंगणी येथे दोन ठिकाणी रेड करून अंदाजे ७०० लिटर मोहफुलाचे फसफसते रसायन जप्त करून जागीच नष्ट करत याप्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उद्या शनिवार दिनांक २३ ऑगस्ट रोजी दुपारी १२:३० ते ०१:०० वा.च्यादरम्यान माहुर



पोलीस ठाणे हद्दीतील हिंगणी येथे गावठी दारू तयार करणाऱ्या दोन अवैध हातभट्टी अड्ड्यांवर पोलीसांनी छापेमारी करत अंदाजे ७०० लिटर मोहफुलाचे फसफसते रसायन जप्त करून ते जागीच नष्ट केले.

ही यशस्वी कार्यवाही पोलिस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनात पोउपनी संदीप अन्येबोईनवाड, नापोका प्रकाश गेडाम, पो.का. पवन राऊत, दत्ता सोनटक्के, संघरत्न सोनसळे, होमगार्ड उमेश भगत, किशोर जाधव, प्रवीण जाधव यांनी केली.

# विद्यार्थ्यांच्या समस्यांकडे तातडीने लक्ष द्या : अभाविप

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २३ ऑगस्ट -**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, नांदेड महानगरतर्फे स्वा.रा.ति.म. विद्यापीठातील विविध मूलभूत सुविधांबाबत विद्यार्थ्यांना जाणवणाऱ्या समस्यांवर उपाययोजना करण्याची मागणी प्र-कुलगुरूंना निवेदनाद्वारे करण्यात आली. हे निवेदन महानगर मंत्री ऋषिकेश काळे, विभाग छात्रा प्रमुख दिपाली चिट्टे, अजय ठाकुर यांनी दिनांक २२ ऑगस्ट रोजी सादर केले.

विद्यार्थ्यांच्या वस्तीगृह व परिसरातील समस्यांमध्ये प्रामुख्याने पिण्याच्या पाण्याची अडचण, फिल्टर व टाक्यांची स्वच्छता, वाय-फाय नेटवर्क नीट कार्यरत नसणे, जिम व इनडोअर हॉलचे जास्तीचे शुल्क, तसेच विद्यार्थिनींसाठी सॅनिटरी नैपकिन्स मशीन व डिस्पोजल यंत्रणा उपलब्ध नसणे या बाबींचा समावेश आहे.

याशिवाय वस्तीगृहाचे अपूर्ण बांधकाम लवकर पूर्ण करावे, ग्रंथालयात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, पोलीस भरती करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मैदान उपलब्ध करून द्यावे, मुलांच्या वस्तीगृहात पार्किंग सुविधा व गरम पाण्याची सोय करावी, अशा मागण्याही अभाविपने मांडल्या आहेत. या समस्या तातडीने सोडवाव्यात, अशी अपेक्षा अभाविपने व्यक्त केली आहे.

# राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन

**तभा वृतसेवा**
**माहुर, दि. २३ ऑगस्ट -**

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी कामावर नेमणूक केलेल्या कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्यासाठी अनेक आंदोलने मोर्चे काढून निवेदने देण्यात आली. शासनाकडून समायोजन करण्याचे आश्वासनही देण्यात आले.परंतु, त्यांचे शासकीय सेवेत अद्यापही समायोजन झाले नसल्याने राष्ट्रीय आरोग्य अभियान अधिकारी व कर्मचारी एकत्रीकरण समीती, महाराष्ट्र राज्य , राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी कामावर नेमणूक केलेल्या कर्मचाऱ्यांनी दि.१९ पासून बेमुदत काम बंद आंदोलन सुरू केले आहे.याचा आरोग्य सेवेवर विपरीत परिणाम होऊन रुग्णांसह नागरिकांना आर्थिक,मानसिक फटका बसत असल्याने शासनाने त्यांची मागणी तात्काळ मान्य करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांसोबतच आता नागरिकांमधून देखील होत आहे.



राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत पदावर काम करत कर्मचाऱ्यांनी शासकीय सेवेत सामावून घेण्याची मागणी केली होती दि. १४/०३/२०२४ रोजी राष्ट्रीय आरोग्य अभियान कर्मचारी यांना नियमित सेवेत समावेशन करणेसाठी शासननिर्णय निर्गमित झाला. सव्वा वर्षे कालावधी होवूनही अंमलबजावणी होत नसल्याने मानधनवाढ, लॉयल्टी बोनस, ईपीएफ, इन्शुरन्स,बदली धोरण मान्य होत नसल्याने तसेचआरोग्य मंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांनी दि.०८ व १० जुलै २०२५ रोजी संघटना शिष्टमंडळास समायोजन प्रक्रिया व विविध मागण्यांबाबत दिलेल्या आश्वासनाची पुर्तता न झाल्याने मंगळवार दि. १९/०८/२०२५ पासून कंत्राटी कामावर नेमणूक केलेल्या कर्मचाऱ्यांच्या वतीने बेमुदत आंदोलन करण्यात येत आहे.

त्यामुळे या कालावधी मध्ये माहूर तालुका अंतर्गत लसिकरण सत्र, विविध अहवाल तसेच ऑनलाईन व ऑफलाईन स्वरुपाची सर्व कामे बंद करण्यात आल्याने सर्व व्यवहार ठप्प झाले असून नागरिकांना आर्थिक,मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. तालुका आरोग्य अधिकारी माहूर यांना दिलेल्या निवेदनावर. वट्टमवार एन.जी. राठोड आय. यू ,झाडे डि.एम., एम. पी. सलाम, यांचे सह सर्व कर्मचाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत